कुल्के (1976) यांनी आपल्या द स्टेटस् ऑफ अनटचेबल्स मध्ये स्वातंत्र्योतर भारतामध्ये आणल्या गेलेल्या आरक्षण धोरणांचे जे कोणी लाभार्थी आहे त्यांचा अभ्यास केला आणि यामधून एकात्मपणा, तुटलेपणा आणि नकार अशा तीन पातळयावरती अभ्यास केला आहे. हा सगळा संदर्भ भारतीय हिंदू समाज हा दलितांना कसे सामावून घेतो, त्यांना कशा प्रकारे वागवितो वा त्यांना कसा नकार देतो याविषयी आहे.

आयझॅक यांनी (1965) इंडियाज एक्स अनटचबेल या अभ्यासात अनुसुचीत जातीतील शिक्षित आणि सुस्थितीत असलेल्यांचा अभ्यास केला. नवी दिल्ली, मुंबई, बंगलोर आणि म्हैसूर या शहरातील हे उत्तरदाते होते त्यांच्या

अनुभवावरुन असे निदर्शनास आले की, शहरी भागात सुध्दा त्यांना व त्याच्या समाजाला भेदभावाला सामोरे जावे लागत आहे

परांजपे ए.सी. यांनी (1970) कास्ट प्रीज्युडाइज ॲण्ड द इंडिव्हिडयूअल या अभ्यासात पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या जाती अभिवृत्ती, स्वप्रतिमा आणि आंतरजातीय संबंध या अनुषंगाने अभ्यास केला. अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना भेदभावाचे प्रसंग आणि अस्पृस्यतेचे पालन त्यांना वैयक्तिक व सामाजिकरित्या अनुभवास आले.

श्री मायकेल एस.एम. (1999) यांनी संपादित केलेल्या दलित इन मॉडर्न इंडिया:व्हिजन ॲड व्हॅल्यू या ग्रंथात दलितांच्या एकूण जीवन पैलूवर विविध दृष्टिकोनातून प्रकाश टाकला आहे. संबंधित क्षेत्रातील तज्ञाच्या लेखाचे संकलन प्रस्तुत ग्रंथात केले आहे. यातील लेख दलितांच्या विविध प्रश्नाच्या संदर्भात असून हा ग्रंथ चार भागात विभागला गेला आहे. पहिला भाग ऐतिहासिक पैलूंशी निगडीत आहे तर दुसऱ्या भागात भारतीय संस्कृतीतील अस्पृश्यतेचा उगम व विकास या संदर्भात चर्चा केली आहे. भारतीय समाजाकडे बघण्याची दलितांची दृष्टी ही उच्च हिंदु समाजाच्या दृष्टिपेक्षा वेगळी आहे. दुसऱ्या भागात महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलितांच्या विकासामध्ये असलेले योगदान या संदर्भात आहे. ज्यांनी दलितांच्या सामाजिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली व जे भारतीय सामाजिक क्रांतीच्या चळवळीचे प्रेरणा स्त्रोत आहे तिसऱ्या भागात सैद्धांतिक दृष्टिकोन आणि कार्यकारी पैलू यावर भर दिला आहे. यातील सर्व लेख हे आपल्याला पारंपारिक भारतीय समाजाचा चिकित्सक पैलू उपलब्ध करुन देतात की जे भारतीय समाजाकडे प्रामुख्याने सांस्कृतिक परिप्रेक्षातून पाहतात. यासगळ्या चिकित्सेमध्ये लेखक आपल्याला अशा एका पद्धतीचा उहापोह करतो जो हिंदु आणि भारतीय समाजाचे एकूणच गुंतागुंतीचे स्वरुप पाहता त्यांच्या अभ्यासाच्या संदर्भात एक पद्धती आपल्याला उपलब्ध करुन देते

श्रीमती पद्मिनी नारायणन (1986) यांनी रिजर्वेशन इन पॉलिटिक्स ॲड शेड्यूल कास्ट एलिट या अभ्यासात असे म्हटले आहे की,सध्याची राजकीय आरक्षणाच्या व्यवस्थेमुळे अनुसूचित जाती मधील अभिजनाचाच मोठा फायदा झाला आहे सर्वसामान्य दलितांचा नाही पुढे त्या म्हणतात की, दलितांचे प्रश्न व त्याच्या हितासाठी कार्य केले पाहिजे, तसे ते करुही शकतात परंतु अलिकडच्या काळात त्यांच्याकडून अनुसूचित जाती,जमातींना फारसा लाभ मिळत नाही. परिणामी दलितामधून अभिजन वर्ग उदयास आला आहे आणि ही व्यवस्था सर्वसामान्य अनुसूचित जाती,जमातींना त्यांच्या विकासासाठी प्रगतीसाठी फारसी पुढे येत नाही. अनुसूचित जातीतील नेते जे आरक्षित मतदारसंघातून निवडून आले ते ज्या पक्षामार्फत निवडून गेले त्या पक्षाच्या ध्येय धोरणावर ते अवलंबून असतात हे प्रतिनिधी दलित समूहाच्या हित संबंधाकडे लक्ष देत नाही. त्यांच्या हिताची वा कल्याणाची काळजी घेत नाही ते त्यांच्या पक्षीय हित संबंध व विचारसरणीशी अधिक बांधिलकी मानतात आणि उच्चजातीच्या हितासाठी अधिक प्रयत्न करतात जरी ते अनु जाती वर्गाचे प्रतिनिधित्व करत असले तरी अनुसूचित जातीच्या हितसंबंधाच्या दृष्टिने ते अधिक व उत्तम प्रकारचे कार्य करु शकत असले तरी सध्याची व्यवस्था यांच्या बाजूने फारशी अनुकूल नाही असे ते नमूद करतात. अशाप्रकारे राजकीय आरक्षणाचे फायदे व तोटे यासंदर्भात विश्लेषण नारायणन यांनी केले आहे.

श्री बंडोपाध्याय (1999) आपल्या लेखात म्हणतात की, स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजातील दलित हा नेहमीच अभिजन वर्गाच्या शोषणाला बळी पडला आहे. आपल्या देशातीच्या प्रशासकीय यंत्रणेमधील सामाजिक उत्तरदायित्वाच्या कमतरतेमुळे समाज विकासाच्या संदर्भात निराशेचे चित्र आहे. ही व्यवस्थाच अशा पद्धतीची तयार झाली आहे की ते बऱ्याचदा लोकांप्रती बेजबाबदारपणे वागतात असे असले तरी लेखकाला अपेक्षा आहे की, नवी पंचायत राज्यव्यवस्था ही स्थानिक पातळीवरील प्रशासनातील कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करेल निवडून आलेल्या लोक प्रतिनिधीनी यावर कटाक्षाने लक्ष ठेवण्याची गरज आहे. तसेच शासकीय लोकावर सुद्धा त्यांनी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. अभिजनांची लोकशाही ही सातत्याने दलितांच्या लोकशाही विरोधात असते असेही ते प्रतिपादन करतात.

श्री सुरेशकुमार (1997) इंडिया ॲट फिफ्टी:दलित सिच्यूएशन या लेखात म्हणतात की, वर्षानुर्षे दलितांचे नागरी आणि मानवी हक्क हिरावून घेतले जात असून त्यांच्यावरील अन्याय अत्याचारांच्या घटनात दिवसेदिवस वाढच होत आहे. सामान्य लोकसमूहापेक्षा ते साक्षरता आणि शिक्षणाच्या क्षेत्रातही फार मागे पडले आहेत. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्याचे प्रमाण दलितांमध्ये अधिक असून राज्याच्या संरक्षित भेदभाव धोरणाचा फारसा लाभ त्यांना मिळत नाही. परिणाम उच्च शिक्षकाच्या क्षेत्रातही ते मागे पडले आहेत. राज्याच्या सरंक्षित भेदभाव धोरणाच्या ज्या काही मर्यादा वा कमतरता आहे याला बाजूला करुन ते वेगवेगळ्या क्षेत्रात स्वंतत्र अस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. लेखकांच्या मते, दलितांमधील जागरुकता आणि प्रश्नाला वाचा फोडण्याची ताकद वाढत

असून त्यामूळे ते सर्व दलितांना संघटित करण्याचा प्रयत्न करतात वेगवेगळ्या आघाड्यावरही ते लढतात संघटित अस्मितेमुळे ते रचता सामूहिक कृतीद्वारे जाब विचारण्याचा प्रयत्न करत आहेत.

श्री सच्चिदानंद यांनी (1977) मध्ये बिहार राज्यातील अनुसुचित जातीतील अभिजनांचा व्यापक स्तरावर अभ्यास केला. त्यांचा हा अभ्यास हरिजन एलिट म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांनी त्यांच्या अभ्यासात चमार, दुसाध, मुसाहर, धोबी आणि पासी या महत्वपूर्ण जातीचा अंतर्भाव केला. सहेतूक नमुना निवडीच्या आणि कोटा सॅपलिंगच्या आधारे त्यांनी या जातीतील निवडक 200 शिक्षित अभिजनांची अभ्यासासाठी निवड केली. ज्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील नोकर (117) सामाजिक कार्यकर्ते (63) आमदार (20) याचा सामावेश होता. सविस्तर मुलाखती, व्यष्टी अध्ययन आणि निरिक्षणाच्या आधारे त्यांनी आपल्या संशोधनांचे निष्कर्ष मांडले हा अभ्यास दलिताच्या सामाजिक शैक्षणिक पातळीच्या संदर्भात दलित अभिजनांनी केलेल्या प्रयत्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतो या दलित अभिजनानी समाजातील जाती विषमतेच्या विरोधात चालविलेला लढा तसेच दलितांच्या मुला मुलीसाठी त्यांनी केलेली मदत यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच बरोबर जाती एकात्मतेच्या संदर्भातील दलितांची आकांक्षा वाढाविली तसेच त्यांच्यात राजकीय जाणीवा रुजविण्याचा पेरण्याचा प्रयत्न ही केला. आधूनिक संसाधनाच्या वापराबद्दल आणि पारंपरिक वर्तनबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केलेत एकूणच दलिताच्या सामाजिक□राजकीय पुनरुत्थानाच्या संदर्भातील जाणीवा व आकांक्षा वृद्धिंगत करण्याचा या अभिजनानी प्रयत्न केलेला दिसून येतो दलितांच्या सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भाने या दलित अभिजनाचे कार्य अतिशय व उल्लेखनिय महत्वपूर्ण आहे असे हा अभ्यास सांगतो. लोकप्रतिनिधी /सामाजिक कार्यकर्त्यापेक्षा सरकारी नोकर हे तुलनेने कमी प्रमाणात क्रियाशील आहेत याकडेही हा अभ्यास लक्ष वेधतो त्याच बरोबर दलित अभिजन आणि त्यांच्या सामाजिक समायोजना च्या संदर्भात ही लक्ष वेधतो विशिष्ट सामाजिक ध्येय प्राप्तीसाठी सामाजिक संपर्काचे स्वरुप आधुनिक दर्जा प्राप्तीसाठीचा प्रयत्न (स्वतःसाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी) आणि उच्चजातीच्या लोकांसोबत कशा प्रकारे संवाद साधला याकडे लक्ष दिले आहे. वैयक्तिक आणि सामाजिक गतिशिलतेच्या दृष्टिने त्यांनी केलेले अथक प्रयत्न यावरही सच्चिदानंदानी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. जाती संघटनाच्या मदतीने आणि जातीच्या कर्मचारी संघटनाच्या त्यांच्या आकांक्षा आणि त्यांचे झालेले सांस्कृतिक त्याबरोबरच पाश्चात्य मूल्यांचा त्यांनी केलेला स्वीकार कार्य करतांना दलित अभिजनांना आलेले समाज अनुभव याकडे ही त्यांनी लक्ष वेधले आहे.यासंदर्भात ते म्हणतात की *"Large number of the educated Harijan Elite oth in towns and in the villages show little active concern with bettering the Lot as their less fortunate caste fellows. Alienated from their own fase.... their major preoccupation appears to be that of meeting the needs of their immediate family and kin. Some of the elite who hape risen high in the serial hierarchy have cut their ties with their bleak past. They are out of tune with the mass of the community and seek alignment with status and power groups in the wider society."* (*The Harijan Educated elite, ICSSR Research Abstract Quarterly and (2 and 3) Jan- April. pp. 154-166.*)

प्रा. सुनंदा पटवर्धन (1973) यांनी चेंज अमॉग इंडियाज हरिजन महाराष्ट्राः अ केस स्टडी या अभ्यासात पुण्यातील अनुसूचित जातीच्या संदर्भात सामाजिक गतिमत्वाबाबत विष्लेषण केले. त्यांनी 360 कुटूंबाचा ज्यात महार, मांग, चांभार, ढोर होलार या जाती समूहाचा अभ्यास केला. वर्णनात्मक आणि सामाजिक सांस्कृतिक पातळीवर जे बदल झाले त्याचे विश्लेषण केले. भौतिक पातळी मध्ये आणि मूल्यव्यवस्थेत झालेल्या बदलाचाही आढावा त्यांनी घेतला गेल्याकाही काळात भारतीय सामाजिक व्यवस्थेतंर्गत मूल्ये कशी बदलत गेली या मूलभूत प्रश्नाचे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न पटवर्धन यांनी प्रस्तुत अभ्यासात केला.

भारतीय सामाजिक जीवनात झालेले बदल हे नव्या तंत्रज्ञानामुळे आणि नव्या संधी निर्माण झाल्यामुळे झालेले आहेत / अस्पृश्यातील उर्ध्वगामी गतिमत्वाचे विश्लेषणही केले आहे. व्यावसायिक शिक्षण, राजकीय सहभाग सांस्कृतिक आणि धर्मांतर जाती संबंध यातील बदलामुळे नियोजित विकास, सार्वजनिक सेवेतील पदाचे आरक्षण शैक्षणिक संस्था वाढता राजकीय सहभाग यामुळे सामाजिक गतिशिलतेची प्रक्रिया अधिक लवचिक झाली ती अनुसुचित जाती मध्ये वाढली पटवर्धन यांच्या मते भारतीय समाजात फार काळ बंदीस्त व्यवस्था (जाती व्यवस्था) टिकणार नाही समाज व्यवस्थेतील व्यापक बदलामुळे अनुसूचित जाती वर याचा मोठा परिणाम झाला आहे जातीची शुद्ध अशुद्ध ह्या कल्पना फार महत्वाचा राहणार नाहीत त्या बदलणार असे असेले तरी काही स्वरुपात त्या राहणार एकूणच त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या घटकाचे सहअस्तित्व आणि सातत्य याचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. संरचनात्मक स्थिरता आणि ताण, सहकार्य आणि संघर्ष

यांच्यातील संबंधही दाखवून दिले आहे. अनुसूचित जातीतील सामाजिक गतिशिल तो आणि परिवर्तनावरील अत्यंत सखोल असा परिपूर्ण अभ्यास या संशोधनाद्वारे त्यांनी केला आहे.

श्री. वसंत देशपांडे (1978) यांनी टूवार्डस् सोशल इंटिग्रेशनः प्रॉब्लेम ऑफ ॲडजेस्टमेंट ऑफ शेड्युल कास्ट एलिट या अभ्यासात अनुसूचित जातीतील अभिजनांना सामाजिक भेदभाव आणि त्यांना बदलत्या सामाजिक पर्यावरणात कशा प्रकारे जुळवून घ्यावे लागते या अनुषंगाने अभ्यास केला 29 उत्तरदात्यांच्या या अभ्यासातून त्यांनी मुख्यतः त्यांच्या जीवनाची वाटचाल करतांना समाजातून जे विविध अनुभव वा प्रसंग आले याचा परामर्श घेतला. त्याच बरोबर विविध सामाजिक प्रश्नाबददलच्या दृष्टिकोनाचाही अभ्यास केला. उत्तरदात्याच्या मुलाखतीद्वारे त्यांना आपल्या जातीमुळे कसे अपमान सहन करावे लागले विद्यार्थी जीवनात मिळालेली वागणूक याचेही त्यांनी विश्लेषण केले. फक्त एकाच उत्तरदात्याने असे सांगितले की, जातीमुळे त्यांना कोणत्याही प्रकारच्या सामाजिक भेदभावाचा प्रत्यक्ष प्रसंग वा अनुभव कधीही आला नाही. कारण त्यांची उत्तम सामाजिक पार्श्वभूमी ही त्याला जबाबदार आहे. ही उत्तरदाती व्यवसायाने वैद्यकिय क्षेत्रातली होती आणि तीने ब्राम्हणपुरुषाशी विवाह केला होता. सर्वसामान्यपणे जातीच्या आधारावरील भेदभाव हा ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये फारसा दिसून येत नाही. तथापि उच्च पदावरील उत्तरदात्यांना असे वाटते की, उच्चजातीतील लोकांनी त्यांच्या हाताखाली काम करु नये शासनातील आरक्षण धोरणामुळे उच्चजातीतील हिंदू आणि अनुसूचित जातीमध्ये वैरत्व वाढत आहे. उत्तरदात्यांची विविध राजकीय पक्षाशी निष्ठा आहे परंतु त्यापैकी अनेकजन विचार करतात की, राजकीय पक्ष हे जाती प्रथा नष्ट करण्याऐवजी त्यांची सत्ता कशी सुरक्षित वा अबाधित राहील याकडेच ते लक्ष देतात. अनेक उत्तरदात्यांनी त्यांना आलेले अनुभव, भेदभावाचे प्रसंग आदीच्या संदर्भाने माहिती दिली. प्राथमिक शाळेपासून ते अधिकारी स्तरांपर्यंत त्यांना आलेले अनुभव श्री. देशपांडे यांनी संकलित केले. काहीना त्यांच्या वर्गातील मित्रमंडळीपासून दूर बसविल्या गेले तर काहीना अतिशय हीनकस अशी वागणूक मिळाली

श्री मेंडेल सोहम (1983) यांनी मध्ये भारताच्या संसदेतील अनुसूचति जातीचे लोकप्रतिनिधी आणि बिहार राज्य विधीमंडळातील लोकप्रतिनिधी यांच्या संदर्भात अभ्यास केला आहे. ते आपल्या अभ्यासात काही निरीक्षणे नोंदवितात. ते म्हणतात की, अनुसूचित जातीतील संसद सदस्य हे त्यांच्यातील कार्यशुन्यतेमुळे आणि परिणामशुन्य भूमिकेमुळे ते प्रस्थापित हिंदू व्यवस्थेतील उच्चवर्णीय अभिजनांचे बाहूले बनले आहेत.

श्री सोरनसिंग (1987) यांनी उत्तरप्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीची बदलती सामाजिक आर्थिक स्थिती यासंदर्भात अनुसूचित जातीच्या (400) उत्तरदात्याचा अभ्यास केला. सामाजिक श्रेणी रचनेमध्ये अनुसूचित जातीची परिस्थिती लक्षणियरित्या सुधारली. त्याचप्रमाणे सामाजिक संपर्कातील सानिध्य आणि सामाजिक दृष्टिक्षेप व्यवसाय आर्थिक स्थिती, शिक्षण, आरोग्य, घरबांधणी यामध्येही आमुलाग्र बदल झाला आहे. या अभ्यासातील उत्तरदात्यापैकी अनेकांच्या त्यांच्या मुलांच्या नौकऱ्या संदर्भातील अपेक्षा ह्या उंचावल्या आहेत आणि त्यांची सामाजिक प्रतिष्ठा उंचावण्यासाठी ते प्रेरणास्त्रोत आहेत.

श्री. एस.एस.सिंग आणि श्री. सुंदरम (1987) यांनी उत्तरप्रदेशातील वाराणशीतील अनुसूचित जातीतील शिक्षित आणि अशिक्षित अभिजनांचा अभ्यास केला शिक्षित अनुजातीतील 38 उत्तरदाते हे तेथिल डिझेल लोकोमोटीव्ह या कंपनीत नोकरीला आहेत. 13 उत्तरदाते हे जीवन विमा निगम मध्ये तर 3 उत्तरदाते हे आयकर कार्यालयात व 4 उत्तरदाते हे विद्यापीठाच्या कार्यालयात आणि 21 उत्तरदाते हे ग्रामीण भागातील कृषिव्यवसायाशी निगडीत आहे. या अभ्यासातील निष्कर्ष असे सूचित करतात की सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ग्रामीण अभिजनाचा अधिक सहभाग आहे तसेच नव्या पिढीतील अनुजातीचे अभिजन हे तुलनेने जुन्या पिढीतील अभिजनापेक्षा त्यांच्या समूहांशी अधिक प्रमाणात बांधिलकी जोपासतात वा समाजाप्रति अधिक उत्तरदायित्वाची भावना बाळगून असतात.

श्री रामश्रेय रॉय आणि सींग व्ही.बी (1987) यांनी बिट्विन टू वर्ल्ड : अ स्टडी ऑप हरिजन एलिट मध्ये उत्तरप्रदेशातील आझमगढ जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील अभिजनाचा त्यांच्या स्वसमूहा प्रती बद्दलचा दृष्टिकोन या संदर्भात अभ्यास केला. 55 उत्तरदात्याच्या मुलाखती घेउन समाजाप्रतीचे त्यांचे विविध अनुभव संकलित केले. या उत्तरदात्यामध्ये प्रामुख्याने राजकीय नेते, संबधित जातीचे पुढारी, नोकरदार, डॉक्टर, अभियंता, वकील, शिक्षक आणि व्यावसायिक यांचा समावेश होतो. या उत्तरदात्यांनी असे स्पष्ट केले की, त्यांचा सद्याचा जो दर्जा आहे तो प्राप्त करण्यासाठी त्यांचा सद्याचा जो दर्जा आहे तो प्राप्त करण्यासाठी त्यांची प्रतिकुल सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमी हा प्रेरक शक्ती आहे. या अभ्यासातील असंख्य उत्तरदात्याची त्यांच्या कुटूंबाचा

पारंपारिक व्यवसाय स्वीकारला नाही त्याऐवजी इतर व्यवसायाची निवड केली. परिणामी समाजातील त्यांचा एकूणच सामाजिक दर्जा उंचावला तसेच हे उत्तदाते त्यांच्या जातीच्या व्यक्तिकरिता जेकी अजूनही मागासलेले आहे त्यांच्या उत्थानासाठी मदतीसाठी कोणत्याही प्रकारची मदत (सल्ला देते देणे वा अन्य मदत) करत नाही. या अभ्यासात अनुसूचित जातीतील अभिजन, त्यांचे कुटूंबीय, सामाजिक गतिशिलता, स्वसमूहाच्या प्रश्नाबाबत जागरुकता, आरक्षणाबाबत दृष्टिकोण आणि समाजविकासाकरिता सामाजिक आणि राजकिय प्रयत्न आदी बाबीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे

अे. एन. सिन्हा इन्स्टिट्युट ऑप सोशल स्टडीज, पाटना या संशोधनात्मक पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थेने अभिजनाचा अभ्यास यावर लक्ष केंद्रीत केले होते. शेड्युल कास्ट एलिट, ट्रायबल एलिट, मुस्लिम एलिट याबाबतचे संशोधनात्मक कार्य येथे झाले. तत्कालीन काळाची ती गरज होती यावर आधारित या संस्थेने अभिजनांची विकासात भूमिका यावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. वेगवेगळ्या सामाजिक व्यवस्थेतील अभिजन, त्यांची वैशिष्ट्ये वास्तव स्वरुप त्यांच्या कडूनच्या समाजाच्या अपेक्षा आणि प्रगती या मुख्य विषयावर आधारित हे चर्चासत्र होते. या चर्चासत्रात विविध समाजशास्त्रज्ञांनी आपले संशोधनात्मक लेख वाचले त्यातील महत्वपूर्ण लेखाचे संकलन श्री. सच्चिदानंद आणि अे.के. लाल यांनी एलिट ॲंड डेव्हलपमेंट या पुस्तकात प्रसिद्ध केले या पुस्तकात एकूण 16 लेख आहेत. एल.एन.शर्मा यांनी अभिजन सिद्धांत महत्व आणि उपयोगिता, शेवकुमार लाल यांनी अभिजनांच्या ओळखी संदर्भातील दृष्टिकोन, विश्वनाथ प्रसाद वर्मा यांनी आधुनिक भारतीय अभिजनातील गतिशिलता, एन.के.सिंघी यांनी नोकरशाहीतील अभिजन तसेच थॉमस पानथम, सुब्रता मित्रा, व्ही.बी.सींग राम आहूजा, पी.सी देव, बी.के.अग्रवाल, बुद्धदेव चौधरी, सुरज सिंग शर्मा, सुरेंद्र गोपाल, हेतुकर झा, निरंजन पंत, अे.के लाल, मनोहर लाल, अे.सी.सिन्हा यांनी आपल्या संशोधनात्मक लेखाद्वारे अभिजनांच्या भूमिकेवर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून प्रकाश टाकला. यातील (द एज्यूकेटेड हरिजन ॲज एलिट) हा त्यांचा शोध निबंध शिक्षित झालेल्या दलितांमधला नोकरदारवर्ग यांच्या संदर्भात आहे त्यांनी म्हटले आहे की, संख्येने अतिशय लहान असा हा वर्ग असून त्यांच्यावर त्यांना मिळालेली कामगिरी आणि समाजाच्या उन्नती संदर्भातील भूमिका यांची मोठी जबाबदारी आहे. राजकीय आणि सामाजिक जाणीवा ह्या शिक्षणाच्या विस्तारामुळेच समाजापर्यंत पोहचेल असेल त्यांना वाटते. सत्तारचनेमध्ये सक्रिय सहभाग हा शैक्षणिक विकासावर अवलंबून असून आर्थिक उन्नती, सबलता ही तुमची सामाजिक स्थान बळकट करते. याबरोबर अन्य सामाजिक–सांस्कृतिक घटकावर या लेखात प्रकाश टाकला आहे

रविप्रताप सिंह (1989) यांनी अनुसूचित जाती के विधान मंडलीय अभिजन या अभ्यासात उत्तर प्रदेश, बिहार व मध्य प्रदेशातील अनुसूचित जातीच्या विधान मंडळातील सदस्यांचा अभ्यास केला. या अभिजनानी सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेली प्रगती, बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये त्यांची सांस्कतिक व धार्मिक कार्याप्रतीची संवेदनशीलता त्याचबरोबर स्वसमूहाच्या संदर्भातील त्यांची सामाजिक बांधिलकी या बाबतचे विश्लेषण केले आहे. सामान्यतः अभिजन या श्रेणीपर्यंत आल्यानंतर हे अभिजन समाजापासून दूर जातात वा जेथून आपण आलो आहोत त्या परिस्थितीला विसरतात म्हणजेच ते स्वसमूहाप्रतीचे उत्तरदायित्व फारसे निभावत नाहीत. या अभ्यासात सिंह यांनी हे अभिजन बदलत्या सामाजिक सांस्कतिक परिस्थितीशी कशा प्रकारे जुळवून घेतात, त्यांची सामाजिक व व्यावसायिक गतिशीलता, नवी मूल्ये आणि राजकीय आकांक्षा यासोबतच शासनाची राष्ट्रीय कार्यक्रम नीति तथा विकास कार्य, अनुसूचित जातीच्या सक्षमीकरणासाठी असलेल्या विविध कार्यक्रमाची क्रियाशीलता याचेही सविस्तर विवेचन प्रस्तुत अभ्यासात केले आहे.

श्री. नंदूराम (1988) यांनी द मोबाइल शेड्युल कास्टः राइज ऑप अ मिडल क्लास या अभ्यासाद्वारे संरक्षित भेदभाव धोरणामुळे अनुसूचित जातीमधला संख्येने अगदी सुक्ष्म असा वर्ग जो की, मध्यमवर्ग म्हणून उदयास आला या संदर्भातले विवेचन केले आहे. नंदूराम यांनी उत्तर प्रदेशातील कानपूर शहरातील अनुसूचित जातीच्या 240 शासकीय नोकरदाराचा अभ्यास केला. ज्यात सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप आणि अनुसूचित जातीतील सामाजिक गतिमत्वाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम याबाबत त्यांनी चर्चा केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील अनुसूचित जातीतील नोकरदार हा आरक्षणाचा लाभ धारक असून त्यांची व्यापकता आणि समाजाप्रतीची समर्पकता याचे विचारमंथन या अभ्यासात त्यांनी केले आहे. पूर्वीच्या दलित समाजातील मध्यमवर्ग हा आधूनिक काळातील दलित मध्यमवर्गापेक्षा भिन्न स्वरुपाचा असून सामाजिक गतिमत्व आणि स्थान निश्चिती वा दर्जा ओळख या संदर्भात दलित नोकरदाराची जडण घडण या अभ्यासात विशद करण्यात आली आहे. त्यांच्या आक्षेप आणि आकांक्षा यावरही भाष्य करण्यात आले आहे. संरक्षित भेदभाव

धोरणामुळे दलित मध्यम वर्गात आत्मविश्वास आला आणि त्यांचा सामाजिक आर्थिक दर्जा उंचावण्यातही मोठी मदत झाली असून रोजगारप्राप्ती मुळे नोकरदारवर्गात त्यांचे स्थान निश्चित झाले आहे. वर्गसंरचनेमध्ये त्यांनी उर्ध्वगामी गतिमत्वाकडे वाटचाल करण्याबरोबरच कामाच्या ठिकाणी सामाजिक संबधाचे नवे प्रारुप दलित अभिजनांनी हळूहळू आत्मसात केले आहे. या संदर्भातली चर्चा ही या अभ्यासात त्यांनी सविस्तरपणे केलेली आहे

श्रीमती पार्वतम्मा (1989) यांनी शेड्यूल कास्टस् ॲट क्रॉस रोड या ग्रंथात भारतातील अनुसूचित जातीच्या संदर्भात अभ्यास करुन निरीक्षणे नोंदविली आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शासनाकडून अपेक्षित स्वरुपाची कामगिरी दलितांच्या संदर्भात झाली नाही व विकासाच्या बाबतीतील त्याचे प्रयत्न तुटपूंजेच राहिले. परिणामी सार्वत्रिकरित्या दलितांमध्ये शासनाकडूनच्या अपेक्षा मंदावल्या व त्यांच्यात निराशा आली. याबाबतचा लेखाजोगा त्यांनी विविध संशोधन प्रकल्प आणि ग्रंथातून घेतला आहे. त्या म्हणतात, कायद्याने अस्पृष्यता नष्ट झाली मात्र वास्तवात आजही याबाबतचे कटू अनुभव दलितांना येतात. दलित मध्यम वर्गाच्या भूमिकेचा परामर्श घेतांना त्या म्हणतात, कर्नाटकात आरक्षणामुळे अनुसूचित जातींना शासकीय दरबारी नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांची आर्थिक सुबत्ता वाढली,मात्र आरक्षणाचा हा मुठभर लाभधारक समूह सर्वसामान्य दलितांपासून फार दूर गेला आहे. अनुसूचित जातीतील राजकीय पुढारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता यांच्यात फार मोठी सामाजिक दरी निर्माण झाली आहे. परिस्थितीनुरुप दलितांमध्ये होणाऱ्या सामाजिक स्थित्यंतराची नोंद पार्वतम्मा यांनी घेतली आहे.

आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अनुसूचित जाती आणि जमातीच्या सदस्यांमध्ये झालेल्या सामाजिक स्थित्यंतराचा अभ्यास राजलक्ष्मी रथ यांनी केला मुलाखत अनूसुचि आणि व्यष्टी अध्ययन पद्धतीद्वारे दोनशे लाभार्थ्यांचा संशोधनाच्या उदिदष्टानुसार अभ्यास केला आणि व्यापक स्वरुपातले निष्कर्ष आपल्या संशोधनाद्वारे मांडले हा अभ्यास रिजर्वेशन ॲड सोशल ट्रान्सफॉरमेशन अमॉग शेड्युल कास्ट ॲड शेड्युल ट्राइब्ज या नावाने प्रसिद्ध आहे. ए.एन सिन्हा इन्स्टिट्युट ऑफ सोशल स्टडीज, पाटना आणि आय.सी. एस.एस आर यांच्या सहकार्याने त्यांनी हा अभ्यास पूर्ण केला आरक्षण धोरणाचा परिणाम आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणी या संदर्भातील विश्लेषन यात केले आहे नऊ प्रकरणामध्ये या संशोधनप्रकल्पाची विभागणी केली असून पहिल्या प्रकरणात उत्तरदात्याची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी, दुसऱ्या प्रकरणात आरक्षण धोरणाची सैद्धांतिक पार्श्वभूमी तसेच संशोधन पद्धती यांची चर्चा केली आहे तिसऱ्या प्रकरणात आरक्षण धोरणाची स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरची व्याप्ती तसेच आरक्षण धोरणाशी निगडीत राज्यघटनेत असलेल्या विविध तरतूदी याची सविस्तर चर्चा केली आहे. चौथ्या प्रकरणात उत्तरदात्याच्या सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमी सोबत त्यांच्या वडीलाचे शिक्षण, पारंपरिक व्यवसाय आर्थिक स्थिती इ. संदर्भात चर्चा केली आहे. पाचव्या प्रकरणात उत्तरदात्याच्या उर्ध्वगामी गतिमत्वाची व्यापकता याचे विश्लेषण आहे. अनुसूचित जाती जमातीमधील नव अभिजन वर्गाचा उदय आणि त्याचे स्वसमूहाच्या विकासाप्रतीचे योगदान याची चर्चा सहाव्या प्रकरणात केली आहे. सातव्या प्रकरणामध्ये आरक्षण धोरणाच्या भवितव्यासंदर्भात आणि या धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणी बाबतच्या सूचना याचा अंतर्भाव केला आहे. आठव्या प्रकरणामध्ये संशोधनाच्या मुख्य उदिष्टानुसार सखोल विचार मंथन करणाऱ्या पाच व्यक्तिचा व्यष्टिअध्ययनाद्वारे अभ्यास केला असून विविध उदिष्टांच्या आधारे आरक्षण धोरणाची फलनिषतीचे परीक्षण करण्यात आले आहे. शेवटी सारांश मध्ये अभ्यासलेल्या संशोधन प्रश्नाची व्यापक स्वरुपातली वैशिष्ट्ये व निष्कर्ष प्रतिपादन केला आहे

श्री. पांडे (1991) यांनी प्रोटेक्टिव्ह डिस्क्रीमिनेशन ॲण्ड सोशल अपलिफ्ट अमाँग शेड्यूल कास्ट या अभ्यासात राज्य घटनेमध्ये अनुसूचित जातींना दिलेल्या संधी व सवलतीमुळे आधुनिक भारतातील दलितांमध्ये जी सामाजिक गतिशीलता आली आणि त्याचे सक्षमीकरण झाले. या अभ्यासात अनुसूचित जातीचा पारंपरिक सामाजिक व्यवस्थेमध्ये झालेला उदय व विकास, सामाजिक श्रेणी, सामाजिक स्थान, सामाजिक संस्थाच्या विरोधात चालविलेली चळवळ, वर्तनबंध प्रकार, जीवन जगण्याची शैली सामाजिक संपर्क आणि उच्च जातींशी त्याची जवळीकता यासंदर्भात चर्चा केली आहे.

माजी खा. बुटासींग (2004) यांनी दलित ॲण्ड दलित अवेकनिंग इन इंडिया या ग्रंथात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडात दलितांच्या एकूणच सामाजिक, आर्थिक शैक्षणिक स्थितीमध्ये कशा प्रकारे बदल झाला याचा आढावा घेतला. या ग्रंथात त्यांनी जातींची उत्पत्ती, जातीव्यवस्था, अस्पृश्यता तसेच दलितांचा सर्वांगिण विकास आदी बाबींची सविस्तर चर्चा केली आहे. दलितांना प्राप्त परिस्थितीमध्ये केलेले प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेविरोधातला संघर्ष व यात त्यांना मिळालेले यश तसेच आधुनिक काळात दलितांनी केलेला सर्वांगिण

क्षेत्रातील प्रवेश या पैलूचाही परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

जोशी बार्बरा (1982) यांनी डेमोक्रसी इन सर्च ऑफ इक्वालिटी अनटचेबल पॉलिटिक्स ॲण्ड इंडियन सोशल चेंज या अभ्यासात अनुसूचित जातीचे विधान मंडळातील प्रतिनिधीची भूमिका आणि राजकीय क्षेत्रातील आरक्षणामुळे त्यांना मिळालेली संधी यांचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या असे लक्षात आले की, आरक्षणामुळे मिळालेल्या राखीव जागा या अनुसूचित जातीच्या सहभागासाठी व त्यांच्या उध्दारासाठी तसेच त्यांच्या एकूण समाज विकासाच्या अनुषंगाने त्या अपुऱ्या आहेत. परिणामी समाजाला पुरेशे प्रतिनिधीत्व न मिळाल्याने हा वर्ग सर्वांगिण विकासापासून वंचित राहिला व जे कोणी प्रतिनिधीत्व करतात त्यांची सुध्दा समाजविकासातील भूमिका फारशी समाधानकारक राहिलेली नाही.

डॉ. नरेंद्र गायकवाड (2001) यांनी न्यू बुध्दिस्ट एलिट : स्टडी ऑफ देअर रोल्स, स्टेटस ॲण्ड मोबिलिटी या अप्रकाशित पीएच.डी. संशोधनात महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाडा या विभगातील लातूर, नांदेड, औरंगाबाद विविध क्षेत्रातील बौध्द अभिजनाची ज्यामध्ये वकील, न्यायाधीश, प्राध्यापक, शासकीय अधिकारी, डॉक्टर, अभियंते, प्राचार्य आदींची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी तसेच त्यांच्या भूमिका, स्थान आणि सामाजिक गतिशिलता या बाजूने अभ्यास केला आहे बौध्दिक क्षेत्रात कार्य करणारे ज्याला त्यांनी बुध्दिवंत असे संबोधले असे 50 उत्तरदाते, प्रशासकीय क्षेत्रातील 74, व्यावसायिक क्षेत्रातील 46, राजकीय क्षेत्रातील 21 आणि धार्मिक क्षेत्रातील 9 अशा एकूण 200 उत्तरदात्यांचा एप्रिल 1997 ते नोव्हें. 1998 या कालावधीत हा अभ्यास केला संपूर्ण संशोधन कार्याची मांडणी त्यांनी पुढीलप्रमाणे केली आहे पहिल्या प्रकरणात उत्तरदात्याची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी आणि दलित अभिजनाच्या अभ्यासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रकरण दोनमध्ये संशोधन पध्दतीशास्त्र ज्यात संशोधनाची उद्दिष्टे संशोधन आराखडा, विश्व, नमुना निवड, तथ्य संकलनाची उपयुक्त साधने, तसेच अभ्यासाचे महत्व यासंदर्भात चर्चा केली आहे. पुढील प्रकरणात बौध्द अभिजनाचे स्थान, समाजाप्रतीचे उत्तरदायित्व व सामाजिक गतिशीलतेच्या संदर्भात सविस्तर चर्चा केली आहे. आरक्षणाचा लाभ घेऊन या बौध्द अभिजनांनी समाजाप्रतीचे उत्तरदायित्व दुर्लक्षीले असून, हा वर्ग आत्मकेंद्रीत बनला आहे, असे असले तरी काही प्रमाणात शक्य तेवढी मदत करण्याची भूमिका ही या अभिजनांची आहे. या अभिजनांना सामाजिक व्यवस्थेत मिळालेल्या भेदभावाच्या वागणुकी संदर्भातही हा अभ्यास लक्ष केंद्रीत करतो. या अभ्यासातील निष्कर्ष असे आहेत की, हा अभिजन वर्ग सर्वसामान्य समाजापासून दूर जात असून त्यांच्यात आणि सामान्य दलितांमध्ये एक प्रकारची सामाजिक दरी पडली आहे. अभिजनाचे समाजापासून दूर राहणे ही वैश्विक घटना असून भारतातील अनुसूचित जमातीमधील अभिजन आणि अमेरिकेतील निग्रो अभिजन यांच्या सारखीच परिस्थिती दलित अभिजनामध्ये आहे.

Volume - 02, Issue - 02, July - December, 2013 / ISSN 2278-3199

# महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास : एक चिंतन

**डॉ. एस. पी. झांबरे**, एस. एस. जैस्वाल, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अर्जुनी/मोर. जि. गोंदिया.

आज आपला देश महिला सबलीकरणाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवित आहे. समग्र विकास या संकल्पनेअंतर्गत बहूल ग्रामीण क्षेत्राच्या विकासात स्त्रीचे योगदान लक्षणीय असून गृहउद्योग, बचतगट, व्यवसाय यादृष्टीने स्त्री सक्षम होऊन कुटुंबातील सक्षमता वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रगत भारतातील महिला शक्तीचे एक गुलाबी चित्र सुखावणारे, महिला आघाडीवर सर्वकाही आलबेल आहे असे नाही. भारतातील सर्वच महिलांच्या वाटयाला ती समृद्धी आली आहे अगर त्यांच्या जीवनात प्रकाश पडला आहे असे नाही. तर त्या कहानीला एक काळी किणारही आहे. कारण याबाबतीत फार मोठी विषमता आढळून येते. देशातील श्रमीक महिलांची संख्या 12.72 कोटी असून ती एकूण महिलांच्या (49.6 कोटी) 25 टक्के असल्याचे माहिती कामगार मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. बहुसंख्य श्रमीक महिला ग्रामीण भागात आहेत. त्यापैकी 87 टक्के महिला शेतमजूर किंवा शेतीशी संबंधीत कामे करतात. शहरातील 80 टक्के श्रमीक महिला असंघटीत क्षेत्रात आहेत. वीज, गॅस, जलक्षेत्र, कारखाने अशा अनेकविध क्षेत्रात महिलांचे प्रमाण फारच कमी आहे. काही महिलांना रोजगार मिळाला असला तरी त्यांचा दर्जा, वेतन, सेवा–शर्ती व कामाची स्थिती यामध्ये पुरूषांच्या तुलनेत त्या पिछाडीवर असल्याचे दिसून येते. याबाबतीत सुधारणा करणे व त्यांची सौदाशक्ती वाढविणे यासाठी सरकारने अनेक कायदेशिर उपाययोजना केल्या आहेत. श्रमीक महिलांच्या शक्तीच्या उपयोगातून संपत्ती निर्माण होत असली तरी त्यांच्या जीवनमानात अद्याप फारसा गुणात्मक फरक पडलेला दिसून येत नाही. याची शासनाला जाणीव असल्याने केंद्रिय कामगार मंत्रालयातील स्वतंत्र विभागाद्वारे श्रमीक महिलांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कोणत्याही समाजातील स्त्रीचा दर्जा हा प्रामुख्याने समाजात त्या स्त्रीलाा पुरूषांच्या तूलनेत कौटुंबीक, शैक्षणिक, धार्मीक, सांस्कृतीक इ. पातळीवर मिळणा–या स्वातंत्र्यावर अवलंबून असते. बदलत्या परिस्थितीत विविध कारणांनी स्त्रियांचा दर्जा खालावत गेला परंतू सध्या स्त्रीयांच्या विकासासाठी स्वयंसेवी कार्यक्रम, स्त्री व बालकल्याण योजना, रोजगार व तांत्रिक शिक्षणावर भर, आरोग्य शिक्षणावर भर, समान वेतन कायद्याची निर्मिती, महिला विकास हे वेगळे खाते बचत गटांची निर्मिती, उद्योजकतेवर भर दिल्यामुळेच आज स्त्री संपन्न होत आहे. म्हणूनच 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले.

व्हिनेसा गिफेन यांच्या मते, स्त्री सक्षम झाली याचा अर्थ असा की, आता स्त्रिच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटीत करण्याची क्षमता आली. स्त्री दृष्टीकोणातून प्रश्नांची उकल करून आपली बाजू पटवून देण्याची क्षमता तिच्याजवळ आली. लोकांसमोर आपले मत प्रदर्शित करून ते पटवून देण्याची हिंमत तिला झाली. घरातील व समाजातील निर्णय प्रक्रियेत ती सहभागी होवू लागली. इतकच नव्हे तर एखादी योजना तयार करणे त्यासाठी योग्य तो निर्णय घेऊन संगठन करणे, कृतीशील कार्यक्रम घडवून आणणे, त्यासाठी योग्य तो लोकसंपर्क, संस्था संपर्क प्रस्थापीत करण्याची आवड व क्षमता तिच्याजवळ आली तर तिच्या सक्षमीकरणाला तीने सुरवात केली आहे, असे समजावे.

परंतू आधाुनिक भारतात आजही स्त्री सक्षमीकरणाचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास येत आहे. महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याने महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविते. त्यामध्ये प्रामुख्याने सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना (एस.जी.एस.वाय.), रमाई महिला सक्षमीकरण योजना (एस. सी.पी.), अनुसूचित व भटक्या जमाती पुर्नवसन योजना (टी.एस.पी.), तेजस्वीनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. तसेच अनेक संघटना स्त्रीच्या उन्नतीला सहाय्यभूत कार्य करीत असल्या तरी सुद्धा महिला सक्षमीकरणाचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास येत आहे.

**तक्ता क्र. 01**

| राज्य | विवाहित महिलांचे निर्णय घेण्याचे प्रमाण | आर.सी.एच. सेवेत सहभागी | | साक्षरता आणि रोजगार | | राहणीमानाचा दर्जा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरोग्य केंद्रात तिनदा भेट दिलेल्या गर्भवती स्त्रियांचे प्रमाण | जन्मदरात नियंत्रण करणा–या स्त्रियांचे प्रमाण | स्त्री साक्षरतेचे प्रमाण | स्त्रीयांचे रोजगारीतील प्रमाण | नळ असलेल्या घरांचे प्रमाण | स्वच्छतागृहे असलेल्या घरांचे प्रमाण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| तामीळनाडू | 49 | 96 | 60 | 74 | 28 | 80 | 49 |
| महाराष्ट्र | 45 | 75 | 65 | 75 | 25 | 70 | 53 |
| आंध्र प्रदेश | 41 | 85 | 67 | 60 | 28 | 70 | 50 |
| भारत | 37 | 52 | 49 | 65 | 19 | 43 | 43 |
| मध्य प्रदेश | 29 | 41 | 53 | 60 | 21 | 23 | 29 |
| छत्तीसगड | 27 | 54 | 49 | 61 | 23 | 21 | 24 |
| राजस्थान | 23 | 41 | 44 | 53 | 12 | 41 | 34 |

**स्त्रोत** : एन.आर.एच.एम.–3, सेन्सस ऑफ इंडिया 2011, भारतातील स्त्रियांची सांख्यिकी 2010, (एन.आय.पी.सी.सी.डी.) न्यु दिल्ली.

महिला सक्षमीकरणासंदर्भात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेअंतर्गत (एन.एच.आर.एम.) आर.सी.एच., साक्षरता व रोजगार तसेच राहणीमानाच्या दर्जाविषयी केलेल्या सर्वेक्षणात संपूर्ण भारतात देशातील 37 टक्के स्त्रीया सर्वेक्षणातील तीन्ही सेवेंबाबतीत स्वतः निर्णय घेतात. यामध्ये रोजगारातून वेतन प्राप्त करणा–या फक्त 19 टक्के स्त्रीया आहेत.

स्त्री सक्षमीकरणाविषयी करण्यात आलेल्या सरकारी पातळीवरील व खाजगी संस्थांच्या प्रयत्नानंतरही आज स्त्री सक्षमीकरणाचे प्रमाण कमीच आहे. नुकत्याच झालेल्या मेलबोर्न जागतीक आकडेवारीनुसार स्त्रीयांच्या आर्थिक सक्षमीकरणाबाबतीत 128 देशांपैकी भारताचा 115 वा क्रमांक लागतो. आज भारत एकीकडे जागतीक महासत्ता बनल्याकरीता प्रयत्न करीत असतांना या स्त्री सक्षमीकरणाच्या समस्येकडे सुद्धा लक्ष ठेवून या गंभीर प्रश्नावर सरकारचे पूर्ण लक्ष असायला हवे. जेणकरूण विकसित भारताच्या वाटयात आम्ही सहभागी होवू शकू.

याकरीता सरकारने एक पाऊल पुढे टाकून समाजातील स्वयंसेवी संस्थांना सोबत घेवून ग्रामीण पातळीवर स्त्री सक्षमीकरणासंदर्भात उपक्रम प्रकर्षाने राबवावेत. याकरीता शिक्षण, आरोग्य व प्रशिक्षण या त्रीसुत्रीवर विशेष भर देवून कायद्याने स्त्रीयांना आर्थिक निर्णय घेण्यात बळ देण्याची गरज आहे. स्त्रीयांच्या विकासाकरीता फक्त योजनांची घोषणा करण्यापेक्षा त्यांच्या अंमलबजावणी संदर्भात विशेष प्रयत्न करावेत. जेणेकरून त्या योजनेचा ग्रामीण भागातील शेवटच्या स्त्रिला लाभ मिळेल व आधुनिक भारतात स्त्री सक्षम होऊन देश मजबुत होईल. सोबतच महिलांचा स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोण तसेच इतरही सामाजिक घटकांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलून स्त्री ग्रामीण विकासात महत्वपूर्ण भूमिका पार पाडेल.

**संदर्भ** :–

1) जे. झेड. पाटील (2011) 'स्त्री शक्तीचे सामर्थ्य', महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद, पृ. 29.

2) Census of India, 2011 (censusindia.gov.in)

3) World wise Survey of Women's Empowerment in Melbourne.

4) डॉ. प्रभाकर देशमुख (2002) 'उद्योजकता विकास संकल्पना आणि व्यवहार', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर

# शैक्षणिक ग्रंथालयातील माहिती साक्षरतेचे महत्व

**प्रा. सौ. रंजना व्यवहारे (तायवाडे),** ग्रंथपाल, विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, न्यु नंदनवन, नागपूर.
E mail Id: taywadev@gmail.com

**प्रस्तावना** :– माहिती साक्षरता म्हणजे विविध क्षमतांचा एकत्रित परिणाम आहे सध्याच्या वेगाने बदलणा–या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती आवश्यकते पेक्षा मोठया प्रमाणावर उपलब्ध होत आहे अशावेळेस विद्यार्थ्यांकरिता माहिती साक्षरता फार महत्वाची वाटते माहिती ही विविध माध्यमांमध्ये उपलब्ध होत आहे उदा. ग्राफिक्स, आवाज आणि प्रत्यक्ष मजकूर या विविध माहितीतुन योग्य त्या महितीचे मुल्यमापन करुन ती समजणे कठिण जाते तसेच नविन तंत्रज्ञानावर आधारित माहिती मिळविणे विद्यार्थांना शक्य होत नसल्याने वेळोवेळी माहिती साक्षरता कार्यक्रम राबवून त्यात विद्यार्थांना सामील करणे आवश्यक झाले आहे. नविन नविन माहितीची त्यांना ओळख करुन देउन त्यांच्यात माहिती विषयीची जागृकता निर्माण करणे आवश्यक झाले आहे. शैक्षणिक वातावरणामध्ये किंवा शिक्षणाच्या सर्व स्तरावर माहिती साक्षरतेचे महत्व फार आहे यामुळे विद्यार्थांना माहितीच्या आशयावर तसेच संशोधनात माहितीवर प्रभुत्व मिळवू शकतील.

ग्रंथालय ही सेवाभावी संस्था समजल्या जाते आणि शैक्षणिक ग्रथालयातून या सेवेची पूर्णपणे पूर्तता केल्या जाते शैक्षणिक ग्रंथालयात 1. शालेय ग्रंथालये 2. महाविद्यालयीन गंथालये आणि 3. विद्यापीठ ग्रथालये यांचा समावेश होतो.

शालेय ग्रंथालयात येणा–या विद्यार्थांना क्रमिक पुस्तके, विज्ञान तंत्रज्ञानावरील पुस्तके, नकाशे, ललित साहित्य, आवश्यक असतात. याशिवाय अनेक संदर्भग्रंथ असतात जसे शब्दकोष विश्वकोष याचीही माहिती विद्यार्थाना देणे आवश्यक ठरते. विद्यार्थांमध्ये वाचनाची आवड निर्माण करुन त्याची दृष्टी व्यापक बनविणे हे ग्रंथालयाचे कर्तव्य असते.

महाविद्यालयात येणारा वाचक वर्ग हा तरुण असतो या ग्रंथालयात क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, ललित साहित्य, नियतकालिके, दृकश्रावे साधने, ऑडिओ व्हिडिओ कॅसेटस, प्रोजेक्ट इ. साधनाचा संग्रह असतात. महाविद्यालयात येणा–या विद्यार्थ्यांना सर्वप्रथम ग्रंथालयाची ओळख करुन द्यावी. ग्रंथालयाचे नियम ग्रंथालयातील वाचन साहित्याची ओळख करुण देणे आवश्यक आहे. त्यामूळे कोणत्याही प्रकारच्या माहिती उपयोगापासून विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता ग्रंथालयातील कर्मचा–यांनी घेतली पाहिजे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वाचकांना योग्य त्या सेवा पूर्ण करुन त्यांच्यात माहिती साक्षरता विषयाची जागृती निर्माण करणे गरजेचे झाले आहे.

**माहिती साक्षरता संकल्पना** :– सध्याच्या वेगाने बदलणा–या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जिथे माहितीच्या स्त्रोताचा पूर आला आहे अश्या परिस्थितीत माहिती साक्षरतेचे मोठे महत्व आहे या गुंतागुंतीच्या काळात या स्त्रोतामधुन निवडक माहिती शोधणे हे कठिण आहे. माहिती साक्षरतेने ते साध्य करता येते. माहिती ही विविध स्त्रोतात व मुबलक प्रमाणात उपलब्ध असली तरी ती दर्जात्मक व परिणामकारक असेलच कशावरुन? नेमकी व परिणामकारक माहिती ओळखता येणे हे विद्यार्थ्यां समोर मोठे आव्हान असते. माहिती साक्षरतेने हे काम सहज करता येते.

माहिती साक्षरता आणि माहिती तंत्रज्ञान यांचा जवळचा संबंध आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे संगणक सॉफटवेअर ॲप्लिकेशन्स डेटाबेसेस व इतर माहिती साधनाचा वापर करु शकतो त्यामुळे विद्यार्थांची शैक्षणिक व वैयक्तिक उद्दिष्टे साध्य होण्यास मदत मिळते.

**माहिती साक्षरता आणि शिक्षण** :– निरंतर शिक्षण घेणारा विद्यार्थी घडविणे हे उच्च शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्टे आहे महाविद्यालय आणि विद्यापीठात विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाचे तंत्र विकसित केल्या जाते. त्यामुळे त्यांच्यात स्वतःच्या बुध्दीच्या आधारे चिकित्सक विचार करण्याची क्षमता प्राप्त होते आणि याला माहिती साक्षरतेची जोड मिळल्यास विद्यार्थी माहितीसाक्षर नागरिक होणे शक्य होते. माहिती साक्षरतेमुळे विद्यार्थी सर्वसामान्य चौकटीच्या पुढे जाउन व्यावसायिक करिअरमध्येही प्रवेश करु शकतात. त्याकरिता आवश्यक ते ज्ञान कसे प्राप्त करावे व सर्व स्तरावरील जवाबदारी कशी सांभाळावी याचेही कार्य विकसीत केल्या जाते कारण माहिती साक्षरतेमुळे विद्यार्थांमध्ये नेमकी माहिती शोधुन त्या माहितीचे मुल्यमापन करणे, तिचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करुन ती वापरण्यास तयार करणे हे कार्य विकसीत होते. महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच माहिती साक्षरतेचे हे तंत्र विद्यार्थ्यांमध्ये आत्मसात व्हावे असे प्रकर्षाने जाणवल्या जात आहे. सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमातही माहिती साक्षरतेचा सर्वच स्तरांवर तसेच विद्यापीठाच्या सर्व

पातळीवर प्रभावीपणे समाविष्ट करायचा प्रयत्न केल्या जात आहे.

**माहिती साक्षरता आवश्यकता :–** आजच्या विज्ञान युगात प्रत्येक क्षणात नवीन माहिती उद्‌यास येत असून ती वेगवेगळया प्रकारात प्रकाशित होते. कोणती माहिती छापील प्रकारात तर काही माहिती ही द्रुकश्राव स्वरुपातही मिळत आहे. आजच्या तंत्रज्ञान युगात तांत्रीक स्वरुपातही माहिती मिळते. अशावेळेस माहितीचा वापर करणारे अडचणीत येते. पाहिजे असलेली नेमकी माहिती कोणती घ्यावी असा त्यांच्या समोर प्रश्न उपस्थित राहतो. अशा परिस्थितीत माहिती साक्षरता महत्वाची ठरते माहिती साक्षरतेमुळे वाचकास पाहिजे ती माहिती मिळविणे शक्य होते.

आधुनिक काळात ग्रंथालयाच्या संकल्पनेत बराचसा बदल झालेला दिसून येतो. पारंपरिक किंवा पुर्वीच्या ग्रंथालयाच्या पध्दतील बदल होउन आता नवीन व्यवस्थापन पध्दती, नवीन वाचन साहित्य निरनिराळया पध्दतीत उपलब्ध झालेले आहे. आधुनिक ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय झालेली दिसून येतात इंटरनेटच्या माध्यमातून ग्रंथ, नियतकालिके, जर्नलस पहायला मिळतात. यातूनच वाचक पाहिजे असलेल्या माहितीची गरज मागवू शकतात. यातुन त्याची मेहनत व वेळ वाचतो. इलेक्ट्रॉनिक साधनातून निवडलेली माहिती योग्यरित्या संकलित करुन तिची अचूक पध्दतीने मांडणी केल्यास दर्जेदार पध्दतीचे संशोधन होउ शकेल.

**शैक्षणिक ग्रंथालय आणि माहिती साक्षरता :–** शैक्षणिक ग्रंथालय आणि माहिती साक्षरता याचा घनिष्ठ संबंध आहे ग्रंथालयातून माहिती साक्षरतेचा विकास मोठया प्रमाणावर होताना दिसून येतो. शैक्षणिक ग्रंथालयात 1. शालेय ग्रंथालय 2. महाविद्यालय 3. विद्यापीठ ग्रंथलयाचा समावेश होतो.

विद्यार्थी शाळेत असताना सर्वप्रथम ग्रंथालयाचा उपयोग करण्यास सुरवात करतो. तेव्हाच विद्यार्थ्यांना ग्रंथालयाबाबत माहिती साक्षर केले पाहिजे. संपूर्ण ग्रंथालयाची ओळख करुन ग्रंथालयातील माहिती साधनाचा वापर कसा करावा, त्याच्या वाचनीय कोणकोणते साहित्य आहे, जास्तीत जास्त कोणत्या प्रकारचे ग्रंथ वाचली पाहिजे, किती दिवसा करीता पुस्तक नेता येईल, ग्रंथालयाचे नियम काय आहे ते त्यांना कसे पाळावे लागतील या सर्व बाबीचा यात समावेश होतो. संपूर्ण ग्रंथालयाबाबत विद्यार्थांना साक्षर करणे गरजेचे आहे.

महाविद्यालयात व विद्यापीठ ग्रंथालयात येणारे विद्यार्थी हे व्यावहारिक ज्ञान प्राप्त करणारे विद्यार्थी असतात. आजच्या या स्पर्धेच्या युगात प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झालेल्या असून विद्यार्थ्यांना त्या स्पर्धांचे आव्हाण पेलावे लागतात. यातून समोर जाण्याकरिता त्यांना योग्य मार्गदर्शनाची व तंज्ञाची आवश्यकता निर्माण झाली आहे त्यां त्यां विषयातील तंज्ञ त्यांना मार्गदर्शन करतात. परंतु स्वतः अभ्यास करित असतांना त्यांना ग्रंथालयाचा वापर करणे आवश्यक असतो. अशावेळेस ग्रंथालय, ग्रंथालयातील कर्मचारी त्यांचे मार्गदर्शक तंज्ञ बनू शकतात. त्यांना कोणत्या प्रकारच्या माहितीची गरज आहे, कोणते माहितीचे स्त्रोत ग्रंथलयात उपलब्ध आहे व त्यातून पाहिजे असलेली माहिती कशी शोधायची किंवा इंटरनेट वरुन कशी शोधायची त्यातूनही नेमकीच माहिती कशी घ्यायची याचे तत्परतेने मार्गदर्शन करावे जेणेकरुन विद्यार्थांची माहितीची गरज पूर्ण होवू शकेल.

**शैक्षणिक ग्रंथालये आणि माहिती साक्षरता :–** माहिती साक्षरता कार्यक्रम राबवितांना शैक्षणिक ग्रंथालयाचे स्थान महत्वाचे आहे माहिती साक्षरतेचा सर्वच स्तरांवर प्रभावी पणे समाविष्ट करायचा झाल्यास प्राध्यापक, ग्रंथपाल आणि प्रशासक या सर्वांचे सहकार्य व्हायला पाहिजे. प्राध्यापक विशिष्ट विषयाचे ज्ञान त्या विषयाबद्‌दलची ज्ञात नसलेली माहिती देतात. तर शैक्षणिक ग्रंथपाल हे त्यापुढील शिक्षणाचे तंत्र विद्यार्थ्यामध्ये विकसीत करतात. त्यात विद्यार्थी स्वतःची बौध्दीक संपदा वापरुन योग्य त्या माहिती साधनाची निवड करुन त्याचा उपयोग करण्यापर्यंतचे कौशल्य प्राप्त करतात. माहिती साक्षरतेची कौशल्य आत्मसात करतांना विद्यार्थांना स्वतःचाच स्वयंनिर्देशित ज्ञान संपादन करण्याची संधी प्राप्त होते यामूळे विद्यार्थी शिक्षणातील विविध स्तरांतून जातांना विविध माहिती स्त्रोतातून माहिती मिळविणे तिचे मूल्यमापन करणे आणि मिळविलेल्या माहितीचे योग्यरीत्या व्यवस्थापन करुन याचा वापर करणे हे योग्यरित्या करु शकतात.

**माहिती साक्षरतेचे फायदे :–** 1. माहिती साक्षरतेमुळे माहितीच्या आवश्यकतेची जाणीव समजू शकतात. 2. विद्यार्थी सतत ग्रंथालयाच्या संपर्कात राहतात. 3. हवी ती माहिती मिळवून त्या माहितीला परिणामकारकपणे वापर करणे हे कौशल्य आत्मसात करतात. 4. मिळविलेल्या माहितीचे योग्यरीत्या मूल्यमापन करु शकतात. 5. विद्यार्थांचे ज्ञान अद्यावत राहण्यास मदत होते. 6. मिळालेल्या निवडक माहितीचे ज्ञानभंडार स्थापन करणे. 7. उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग आपली ध्येय साध्य करण्यासाठी वापर करता येतो.

**निष्कर्ष** :— आजच्या या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक क्षणाला नविन माहितीची निर्मिती होत आहे या माहितीच्या स्फोटात विद्यार्थांना नेमकी व योग्य ती माहिती मिळविण्यासाठी शैक्षणिक ग्रंथलयातून माहिती साक्षरता राबविणे गरजेचे झाले आहे. शैक्षणिक ग्रंथलयात माहिती साक्षरता उपक्रम राबवून अद्यावत माहिती तंत्रज्ञानाबाबत माहिती देणे गरजेचे झाले आहे. विद्यार्थ्याचा सर्वांगीन विकास होण्यासाठी व त्यांचे बौध्दीक सामर्थ वाढविण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम राबविणे हे शैक्षणिक ग्रंथालयाचे महत्वाचे कार्य मानल्या जात आहे.

**संदर्भः—**

1. फडके द. ना. — ग्रंथालय, संगणीकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिव्हर्सल प्रकाशन पुणे 2010.
2. पवार एस. पी. — ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर 2009.
3. थोरात, प्रा. लक्ष्मण — ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2007.

# बालकांच्या अपंगत्वामुळे पालक—बालक संबंधावर होणारा विपरीत परिणाम

**प्रा. बी. डी. काटेखाये,** गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

**प्रस्तावनाः—** प्रत्येक स्त्रीला आपले अपत्य प्रिय असते. त्याच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न चाललेले असतात. आपल्या मुलांचे सर्वत्र कौतुक व्हावे. त्याला समाजामध्ये योग्य स्थान, सन्मान मिळावा अशी प्रत्येक आईवडिलांची इच्छा असते. या करिता ते प्रयत्नशिल असतात. मानवी जीवनाचा प्रारंभ एका जीव पेशीपासून होऊन त्याचे रूपांतर अनेक कला गुणांनी कौशल्याने युक्त अशा व्यक्तिमध्ये होत असते. हे परिवर्तन होत असतांना प्रथम कुटुंब, शाळा, सामाजिक वातावरण यांचा वाटा असून मातेचा सिंहाचा वाटा असतो.

शरीराच्या बाहेरच्या अवयवांत वैगुण्या आल्यास ते नजरेत भरते, कान, डोळे वाचा यांच्या वैगुण्याचा विचार यात करण्यात येतो हात व पाय हे चलनवलनाचे मुख्य अवयव. शारीरिक किंवा मानसिक बिघाडामुळे सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणे आपली दैनंदिन कामे करणे ज्यांना अशक्यप्राय किंवा दुष्कर झाले आहे, अशा व्यक्तींना 'अपंग व्यक्ती' असे म्हणतात.

क्रो ॲण्ड क्रो यांच्या मते, ''ज्या बालकास त्यांच्यातील शारिरीक दोषामुळे सर्वसाधारण क्रियामध्ये भाग घेण्यात अडथळे येतात किंवा मर्यादा पडतात अशा शारीरिकदृष्टया अकार्यक्षम असणाऱ्या बालकांना 'अपंग बालक' असे म्हटल्या जाते.''

मुख्यतः अनुवांशिक वारसा, अपघात किंवा रोग या तीन कारणांनी अपंगता निर्माण होऊ शकते. अपंगामध्ये आंधळे, मुके — बहिरे आणि हातापायाने लुळे असलेल्या किवां हातपायच नसलेले पांगळ—थोटे आणि मनाने दुर्बळ व्यक्ती यांचा समावेश होतो. हृदय, फुफ्फुस, डोळे, इ. महत्वाचे अवयव चिरंतन व्याधींमुळे अकार्यक्षम झालेली स्त्री—पुरूष व शैक्षणिदृष्टया कमकुवत असणारी मुले यांचाही अपंग व्यक्तीत समावेश करण्यात येतो.

दुसऱ्या महायुध्दापासून अपंगाच्या प्रश्नास असाधारण महत्व प्राप्त झाले. 1942 मध्ये अमेरिकेत अंबिलिटिस इकॉर्प्रेरिटेड नावाची अपंगाच्या पुर्नवसनासाठी एक संस्था काढली. भारतात 1946 मध्ये श्रीमती फतिमा इस्माईल यांनी मुंबईत एक संस्था स्थापून भारतातील अपंगांच्या पुर्नवसनाच्या समस्येस तोंड देण्याच्या प्रयत्नास चालना दिली.

अपंगत्वाचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास त्याचे दोन भागात विभाजन करता येईल.

1) जन्मजात अपंगत्व
2) जन्मानंतर झालेले अपंगत्व

लहान मुलात अपंगतेचे अस्तित्व ओळखणे अवघड असले तरी महत्वाचे असते. अपंगत्व आहे असे निश्चित झाले की, मुलाची शारीरिक, मानसिक व भावनात्मक तपासणी करून अपंगत्वाची व्याप्ती ठरविली जाते. व त्यानुसार कोणते उपचार करावे लागतील याचा अंदाज येईल.

**अपंग बालक आणि कुटुंब** : कायद्याच्या परिभाषेत पालक (गार्डियन) या संज्ञेला विशिष्ट अर्थ आहे. सर्वसामान्यपणे दुसऱ्याचे जो पालन करतो त्यास पालक असे म्हणतात. मुलांच्या व्यक्तीमत्व विकासात कौटुंबिक वातावरणाप्रमाणे पालक—बालक संबंध हा देखील महत्वाचा घटक आहे. आई—वडीलांनी अपंग मुलांचे संगोपन करण्याच्या जवाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. त्याला आवश्यक प्रेम आपुलकी, सहानुभूती, सुरक्षितता योग्य वेळी दिली जात आहे की नाही याकडे लक्ष देणे

आईवडीलांचे पहिले कर्तव्य ठरते. हे संबंध प्रेमाचे आपुलकीचे असतील तर ते व्यक्तीमत्व विकासाला पुरक ठरतात. परंतू हे संबंध जर संघर्षपुर्ण असमाधानकारक, नकारात्मक वृत्तीचे असतील तर मुलाच्या व्यक्तीमत्व विकासाला पोषक ठरणार नाही.

मुल ज्या कुटुंबात असेल त्या कुटुंबातील व्यक्तीची मनोभुमिका व आर्थिक स्थैर्य लक्षात घेणे ही आवश्यक असते. मुलाच्या व त्याच्या सर्वांगिण विकासासाठी त्यास जास्तीत जास्त संधी देणे हे त्याच्या पुर्नवसनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. तरीदेखील अशक्य गोष्टी साध्य होतील या भ्रमात त्याने किंवा त्यांच्या कुटुंबियांनी राहणे अनिष्ट असते.

अंपग मुलाचे संगोपन करणे फार कष्टदायक काम असते. त्याकरीता पालकांची मानसिक, शारीरिक व आर्थिक तयारी असावी लागते. अपंग मुलाचे फाजील लाड करण्याकडे सुस्थितीतील पालकांची प्रवृत्ती असल्यास मुले स्वावलंबी होत नाही.

अपंग मुलाबाबतचा दृष्टिकोण त्याचे जीवन घडविण्याच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचा असल्यामुळे त्याचा अभ्यास करणे अगत्याचे आहे. परंतू, त्या आधी शरीररचना आणि मनोरंजन हयांचा अपंगतेच्या संदर्भात परस्परांशी काय संबंध आहे हे बघणे आवश्यक आहे. काही विशिष्ट तऱ्हेच्या शरीररचनेमुळे वागण्यामध्ये काही वेगळेपणा येण्याचा संभव आहे? किंवा काय? याचा विचार पुर्वी पासून केला जात आहे. या शास्त्राला 'सोमॅटोसायकॉलॉजी' असे म्हणतात.

अपंग बालकास पुर्नवसनाची आवश्यकता असते. याबाबत पालकांना मार्गदर्शन केल्या जाते. यावरील उपचारपध्दती आर्थिकदृष्टया कनिष्ट स्तरावर असणाऱ्या कुटुंबातील पालकांना परवडण्यासारखी नसल्यामुळे या वर्गातील अपंग व्यक्तीचे पुर्णतः पुर्नवसने होऊ शकत नाही. त्यामुळे या वर्गातील कुटुंबात अपंग मुलाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. इंग्लड, अमेरिका सारख्या प्रगत देशात अपंगाना सर्व सोयी देण्याबाबत कमालीचा कटाक्ष असतो.

**अपंग बालक आणि समाजः—** अपंग बालकात आत्मविश्वास निर्माण करण्याकरीता कुटुंबाबरोबरच समाजातील इतर व्यक्तीनी देखील संधी उपलब्ध करून द्यावयास हव्या. समाजातील लोकांनी हयांच्या भावना योग्य प्रकारे हाताळल्यास ते निश्चितच जीवनात यशस्वी होऊ शकतात. त्यांना लोकांच्या सहानुभूतीची गरज नसते. सामाजिक व मानसिक विकासात शारीरिक दोषांमुळे अडथळे निर्माण होतात. इतर मुले अपंग मुलांना आपल्यात कितपत सामावून घेतील याची शंका असते. खोडकर मुले अपंगाच्या खोडया काढण्यात आनंद मानतात. अपंगाच्या सोयीकरीता सार्वजनीक ठिकाणी व मोठया डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये एस्केलेटर्स व लिफ्ट्स असाव्यात. जीवनातील आनंद उपभोगता यावा, अपंगानी स्वावलंबी व्हावे या हेतूने त्यांना कामाच्या विविध सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

मुलांमध्ये शारीरिक अपंगत्व निर्माण होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात जसे —

**जन्मजात अपंगत्वतेची सर्वसामान्य कारणेः—**

1. गर्भवती वारंवार आजारी पडणे, जर्मन गोवर यासारखा आजार झाल्यास बालकाला जन्मजात अपंगत्व येवू शकते.
2. सगोत्र विवाह.
3. अनुवांशिकतेमुळे संक्रमित झालेले व्यंग उदाः — नेत्रदोष.
4. गर्भपात करण्यास घरगुती उपायात अपयश येवून गर्भ वाढविल्या जातो त्यामुळे गर्भावर वाईट परिणाम होवून जन्मजात दोष निर्माण होतो. याशिवाय अपघात, उंचावरून पडणे, गाडीतून पडणे, हातपाय मोडणे, भाजणे, पोलिओ, तीव्र तापाने मेंदूवर परिणाम पडणे, मेंदूक्षय यासारख्या घटनांमुळे मुलांमध्ये अपंगत्व निर्माण होऊ शकते.

**शारीरिक अपंगत्वा मुळे मुलांमध्ये येणाऱ्या समस्या :—**

1. शारिरीक अपंग मुलांमध्ये आत्मविश्वास कमी दिसून येतो.
2. शारिरीक अपंग मुलांमध्ये काही प्रमाणात वर्तनसमस्या निर्माण होतात.
3. शारिरीक अपंग मुलांमध्ये जिद्द, चिकाटी कमी प्रमाणात आढळून येते.
4. घरातील व घराबाहेरील व्यक्तीव्दारे व्यंगाची वारंवार जाणीव होणे.
5. दुखापत अथवा अपघात झाल्यावर रागावणे, चिडणे.
6. शारिरीक व्यंग मुलांकडून फार मोठया अपेक्षा केल्या जातात.
7. मुलांच्या अपयशावर कुटुंबातील सदस्यांव्दारे आकांत तांडव केल्या जाते.
8. आई वडील यांच्यातील परस्पर संबंध ताण—तणावाचे असतील तर अशा वातावरणात मुलांना
9. असुरक्षितता जाणवते. त्यांची मनःस्थिती भांबांवल्या सारखी होते. आत्मविश्वास कमी होतो.

**शारिरीक अपंग मुलांच्या समस्येवर उपाययोजना** :– अपंग बालकाकरीता पुर्नवसन केंद्रे मार्गदर्शन करून मदत करतात त्यांच्यातील न्यूनतेची नेमकी स्थिती व उपाय सुचविल्या जातात. रेडीओ, दुरचित्रवाणी, चित्रपट इत्यादीच्या साहयाने अपंग मुलांच्या पालकांना शिक्षण देऊन मुलांचे संगोपन कसे करावे याविषयी योग्य ती माहिती देण्यात येते. सर्वसाधारण शिक्षणपध्दती व खास शिक्षणपध्दती यांचा वापर करून मुलांचे अपंगत्व जास्तीत जास्त प्रमाणात दूर करून त्यास स्वावलंबन, साध्य झाले तरच पुर्नवसनाचा मुलभूत उद्देश साध्य होतो.

**अपंग बालक आणि कुटुंबाची आर्थिक परीस्थिती** :– मुलांमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे शारिरीक व्यंग असेल तर त्याचा बौध्दिक, भावनिक व्यक्तिमत्व विकास सामान्य मुलांप्रमाणे होऊ शकतो. परंतु आंधळेपणामुळे हे सर्व विकास योग्य प्रकारे होऊ शकत नाही. कोणतीही गोष्ट सुरळीतपणे शिकविण्यासाठी त्याला प्रत्येक वेळेस दुसऱ्याचा आधार घ्यावा लागतो. त्यांच्यातील क्रियाशीलतेवर अनेक बंधने येतात. एखादे वेळेस वस्तूची मोडतोड झाल्यास त्यांना स्वतःची लाज वाटते आपण नेहमीकरीता दुसऱ्यावर भार म्हणून राहणार हयाची त्यांना खंत वाटते. तीव्र बुध्दिमत्ता असलेली मुले आपल्या अंधत्वावर मात करून जीवनात यशस्वी होतात. त्यासाठी पालकांचे सहकार्य, प्रोत्साहन, मुलांना योग्य संधीप्राप्त करून देणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वप्रथम मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. संधी उपलब्ध करून प्रेरणा देणे महत्वाचे आहे. याकरीता आईवडील, मित्र व समाजातील लोकांनी हयांच्या भावना योग्यप्रकारे हाताळल्यास ते निश्चितच जीवनात यशस्वी होऊ शकतात.

अपंगत्वामुळे मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊन त्यांचा स्वभाव लाजरा, बुजरा एकलकोंडा होतो. अशा मुलांना आईवडीलांच्या प्रेमाची अत्यंत आवश्यकता असते त्यांचे प्रेम मिळाल्यास ते कोणत्याही संकटाला हिंमतीने तोंड देऊ शकतात.

वैद्यकशास्त्राामधील नवनविन शोंधामुळे शारिरीक विती व दोषांवर उपाययोजना करता येतात, मुलांच्या शारिरीक दोषांची उपाययोजना करतांना घाईगर्दी व घायकुतेपणा करणे अयोग्य आहे. आई–वडीलांनी जर मन शांत ठेवले व धीराने एका डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्यांच्या सल्लानुसार उपाययोजना केल्यास शारिरीक अपंग मुलांच्या पालक–बालक संबंधात सुदृढता निर्माण होऊन परीणाम चांगला येईल. याकरीता पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**उपाययोजना :**

1. जर मुलांचे आईवडील शांत व संयमी असतील तर मुलांमध्ये हिंमत निर्माण होईल.
2. मुलांच्या मनात निग्रह चिकाटी व प्रयत्न, शांत व संयमी आईवडील चांगल्या रितीने करू शकतात.
3. अपंगत्व आलेल्या मुलासाठी जिद्द असलेले धडपडणारे मुलाची अस्मिता जागृत ठेवणारे त्यांचा
4. आत्मविश्वास वाढविणारे आईवडील हवेत.
5. पंगू मुल मनाने शरीराने जिद्दीने पुढे यायचा प्रयत्न करू शकतात, फक्त त्यांच्या आईवडीलांनी हातपाय
6. गाळायला नकोत. आईवडिल मनाने पंगू झाले तर अशा मुलाने कुठल्या आशेने पुढे यायच?

**सारांश** – अपंग मुलाच्या पालकांनी आदर्श निर्माण करून त्यांच्या विकासाकरीता सतत प्रयत्न केल्यास पालक–बालक संबंधात सुधारणा होऊ शकेल.

---

**संदर्भ ग्रंथ** –


1. मातृकला, प्रा. प्रिंयवंदा रा. लाठकर
2. छोटी सी बात, राजीव तांबे
3. बालविकास शास्त्र, ज्योती गायकवाड
4. अड्गुल मडगुल, श्रीकांत चोरघडे
5. मुले व त्यांचे प्रश्न, डॉ. चंद्रकांत शंकर वागळे
6. मराठी विश्वकोष खंड 1, पान क्रं. 236 ते 271
7. बालविकासाची मुल तत्वे, त्रिवेणी फरकाडे/सुलभा गोंगे
8. महिला एंव बालविकास, सुबुध्दि गोस्वामी
9. बाल मानसशास्त्र, प्रेमला काळे
10. श्री. ईश्वर कृपलानी, सचिव उमेद परिवार (वार्षिक अहवाल 1994–95) प्रकाशक, पुणे
11. संपादक :– श्री. जयप्रकाश शेंडे, श्री. शर्मा, श्री.पिसे (पृ.क्रं.6)

Volume - 02, Issue - 02, July - December, 2013 / ISSN 2278-3199

# इस्लाम (मुसलमान) धर्मातील लिंग विषमता.

**प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे,** इंदिरा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर मो. 9850526319

मुलसलामन कोण ? मुसलमानी धर्मावर म्हणजेच (1) ईष्वर एकच आहे. व (2) महंमद त्याचा प्रेषित आहे, या त्या धर्माच्या पाचाभूत तत्वावर श्रध्दा बाळगणारी व्यक्ती मुसलमान होय. त्यासाठी कोणत्याही संस्काराची किंवा समारंभाची आवश्यकता असत नाही, (श्रीखंडे : 1976).

**लिंग विषमता अर्थ** :– लिंगानुसार पुरूषांचा दर्जा श्रेष्ठ तर स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. अशाप्रकारे स्त्री आणि पुरूषांमध्ये असलेली विषमता म्हणजे लिंग असमानता अथवा लिंग विषमता होय. (कऱ्हाडे. 2010).

इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर असून 'कुराण' हा इस्लाम धर्माचा पवित्र धर्मग्रंथ होय. महंमद शब्दापासून मुसलमान शब्दाची उत्पप्ती झाली. 1937 साली भारतातील मुसलमानासाठी 'मुस्लीम पर्सनल लॉ. अप्लीकेशन ॲक्ट' केंद्रिय कायदे मंडळाने मंजूर केला. मुस्लीम कायद्यानूसार मुस्लीमांना केवळ मुस्लीमांसोबतच विवाह करण्याचा आदेश दिला आहे. स्त्री व पुरूषांच्या बाबतीत हे नियम वेगवेगळे दिसून येतात. स्त्रीला मुसलमान पुरूषाव्यतिरिक्त इतर धर्मीय पुरूषांशी विवाह करण्याचे नाकारले. तसे करायचे असल्यास त्या मुलाला मुस्लीम धर्म स्वीकारावा लागतो (गोयल : 1969).

**अ)पत्नींची संख्या** :– इस्लामपूर्व काळी अरबस्तानात कितीही बायका करता येते होत्या. या स्वैर अधिकारावर व बायकांच्या संख्येवर इस्लामने नियंत्रण घातले आहे. इस्लामप्रमाणे मुसलमान पुरूषाला एकाच वेळी जास्तीत जास्त चार बायका करता येतात. एक मेल्यास किंवा विवाह विघटनामुळे तिचे पत्नीत्व संपुष्टात आल्यास तिची जागा भरून काढता येईल. थोडक्यांत पत्नींची संख्या एकाच वेळी चारपेक्षा अधिक असणार नाही. पण त्याने चार बायका जिवंत असतांना पाचवी केली तर तिच्याबरोबर केलेला विवाह शून्य नसून केवळ 'फासिद' (नियमबाहय) असतो.

**ब) बहुपतित्व** :– मुसलमान स्त्रीला एकाच वेळी एकापेक्षा अधिक पती असू शकत नाहीत. पहिला पती जिवंत असतांना व त्याच्याबरोबरच्या विवाहाचे विघटन झाले नसतांना अशा स्त्रीशी केलेला विवाह शून्य असतो. अशी स्त्री भारतीय दंड संहितेच्या 494 कलमाखाली द्विपरिणयाच्या गुन्हयाबद्दल दंडास पात्र होते, आणि अशा विवाहापासून झालेली संतती अनौरस ठरते. तिला अभिस्वीकृतीने औरसत्व देता येत नाही.

भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियम (1872 चा 15 वा) भारतात मुसलमान पुरूष व ख्रिस्ती स्त्री यांच्यामधील विवाह भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियमाच्या कलम 5 (4) मधील उपबंधाप्रमाणेच व्हावा लागतो, म्हणजे तो त्या अधिनियमाखाली नेमलेल्या विवाह प्रबंधकानेच किंवा त्याच्या समक्ष लावावा लागतो. तसे न घडले तर विवाह बातल (शून्य) होतो. पण मुसलमान स्त्रीला ख्रिस्ती पुरूषाशी विधिग्राहय विवाह करताच येत नसल्याने तसा विवाह या अधिनियमाखाली लावता येणार नाही असे दिसते.

शिया विधीप्रमाणे मुसलमान पुरूष व मुसलमानेतर स्त्री यांच्यामधील आणि त्याचप्रमाणे मुसलमान स्त्री व मुसलमानेतर पुरूष यांच्यामधील विवाह बातल आहे. पण, मुसलमान पुरूष मुसलमानेतर स्त्रीशी निकाह लाऊ शकला नाही तरी मुता म्हणजे काही मुदतीपुरता (तात्पुरता) विवाह लाऊ शकतो.

विघटन न्यायालयाचा अवलंब न करता होऊ शकते किंवा न्यायालयामार्फत करता येते. न्यायालयबाहय विघटन करण्याचा अनन्य अधिकार पतीलाच असतो. तशा विघटनाला तलाक म्हणतात. विघटनासंबंधीचा पत्नीचा अधिकार फारच नियंत्रित असतो. न्यायालयबाहय विघटन पतीच्या खुशीमुळे, पतिपत्नीच्या संयुक्त संमतीने करता येते. न्यायालयीन विघटनही दोघांना एकत्रपणें मिळवता येते किंवा पत्नीने केलेल्या कारवाईमुळेही मिळू शकते. पतीला विघटन देण्याचा निरंकुश अधिकार असल्यामुळे त्याला विघटनासाठी न्यायालयाची पायरी चढण्याचे कारण पडत नाही.

दुसरी गोष्ट पुरूषांच्या बाबतीत काही सवलती दिसून येतात. पुरूषांना ईसार, पावती वा यहुदी स्त्रियांशी विवाह करण्याची मोकळीक दिसून येते. एवढेच नव्हे तर महंमद एका पुरूषाला चार स्त्रियांसोबत विवाह करण्याची मोकळीक देतो. पण स्त्रीयांना हा अधिकार नाकारल्याचे दिसून येते. (वात्स्यायन : 962).

मुसलमान स्त्रीला एकाच वेळी एकपेक्षा अधिक पती असू शकत नाहीत. पती जिवंत असतांना वा त्यांच्याबरोबरच्या विवाहाचे विघटन झाले असतांना अशा स्त्रिशी केलेला विवाह शून्य असतो. अशी स्त्री भारतीय दंड संहितेच्या 494 कलमाखाली द्विपरिणयाच्या गुन्हयाबद्यल दंडास पात्र होते, आणि अशा विवाहापासून झालेली संतती अनौरस ठरते. मुसलमान पुरूष

मुसलमानेत्तर स्त्रीशी, जर ती किताबिया असेल तर विवाह करू शकतो. पण ती मूर्तिपूजक किंवा अग्निपूजक असेल तर नाही. मुसलमान स्त्री मात्र मुसलमानेत्तर पुरूषाशी, मग तो पुरूष किताबी असला तरीही, विवाह करू शकत नाही (श्रीखंडे : 1976).

रविंद्रनाथ मुखर्जी (1969) यांनी त्यांच्या ग्रंथांत मुस्लीम घटस्फोटांच्या प्रकारांचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते मुस्लीमांमध्ये बिनान्यायालय घटस्फोटाचा प्रकार आढळून येतो. हा अधिकार केवळ पुरूषालांच आहे. स्त्रिया केवळ पतीच्या सहमतीनेच घटस्फोट घेवू शकतात. हा अधिकार स्त्रीला विवाह प्रसंगीच मिळवावा लागतो. कोणत्याही प्रकारचे कारण न सांगता पती पत्नीला तलाक देवू शकतो. विवाह विघटनाच्या बाबतीत मुस्लिम पुरूष सर्वशक्तीमान असल्यामुळे त्याला न्यायालयांकडे धाव घेण्याचे कारणच पडत नाही. पत्नीची गोष्ट वेगळी आहे. तलाक देण्याचा अधिकार पत्नीला कराराने मिळाला असेल तरच ती तलाक देवू शकते अन्यथा न्यायालयाकडे गेल्याशिवाय तिला गत्यंतर नसते. पण तिकडे जाऊनही काही विवक्षित कारणे दाखवल्या शिवाय तिला घटस्फोट मिळत नाही.

याव्यतिरिक्त मुस्लीम समुदायातच अनेक वाईट प्रथा आहेत जसे पडदा पध्दती, मशिद मध्ये नमाज केवळ पूरूषच पडू शकतात. स्त्रीयांना हा अधिकार नाही. धार्मीक पूरोहीत, मुल्ला मौलवी किंवा काझी होण्याचा मान, अधिकार केवळ पूरूषांना असतो. मय्यतमध्ये स्त्री सहभागी होवू शकत नाही. इत्यादीसारख्या प्रथा दिसतात ज्यातून विषमता प्रगट होते.

**संदर्भग्रंथ :**

1. श्रीखंडे सदाशिव नागेश, मुस्लिम विधी, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती, पायल प्रकाशन, नागपूर 1976.
2. कऱ्हाडे बी.एम., भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
3. बाहस्यायन, भारतीय समाज और संस्कृती, केदारनाथ रामनाथ, मेरठ, 1962.
4. कपाडिया के. एम., भारत वर्ष में विवाह एवं परिवार, सुंदरलाल जैन, दिल्ली, 1963.
5. फरकाडे, गोंगे, विवाह आणि कौटुंबिक संबंध, विद्या प्रकाशन नागपूर 2003.

# भटक्या जमातीची –उत्पत्ती व संकल्पना

**प्रा. डॉ. दिपक कृष्णराव पवार,** समाजशास्त्र– विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स, 310–ब, नविन नंदनवन, नागपूर–09 Email:profdipakpawar@rediffmail.com Mobile: 9423405816

उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून मानवाने दोन पायावर चालण्यात सुरुवात केली. त्यानंतरच्या प्रक्रियेतून माणूस सुधारणांच्या विविध टप्प्यातून जात, आजचा आधुनिक माणूस बनला आहे. आजही माणूस उत्क्रांतीवादी सुधारणेच्या विविध टप्प्यांतून जात आहे. माणसांच्या शारीरिक उत्क्रांतीच्या टप्प्यांबरोबर त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनातील घटकांमध्ये देखील बदल झाला आहे. आजचा प्रगत मानवी समाज हे त्याचेच रुप आहे. आदिकालापासून मानवाला प्रश्न होता तो म्हणजे आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा, त्याकरीता त्याला उदरनिर्वाह करणे व संरक्षण मिळविणे आवष्यक होते. मानवाने इतर प्राण्यांपेक्षा त्याला मिळालेल्या बुध्दीचा वापर करीत आपल्या अस्तित्वाकरिता अनेक गोष्टी शोधून काढल्या. सुरुवातीला अन्न मिळविणे आणि इतर वन्य प्राण्यांपासून संरक्षण करण्याकरिता दगड, हाडे व लाकडी औजारे वापरायचा. विषेशतः शिकार करुन तो उदरनिर्वाह करायचा,ही मानवाची शिकारी अवस्था होय. वन्य प्राण्यातील काही अहिंसक प्राण्यांना पाळून व काही हिंसक प्राण्यांना माणसाळावून त्या प्राण्यांच्या दुधदुभत्यावर आणि मासांवर उदर निर्वाह करणारी ती माणसांची पशुपालक अवस्था. जमिनीवर बी पेरले की ते पावसाच्या पाण्याने उगवते, हे माहीत होऊन शेतीचे ज्ञान अवगत झाले. अशी अन्न हे धान्याच्या रुपात माहिती झालेली शेती अवस्था होय. व त्यानंतरची विकसीत झालेली अवस्था, ती नागरी अवस्था आहे.

पण संपूर्ण मानवी समाज विकसीत होतांना संपूर्ण एकसारख्या अवस्थेतून विकसीत झाला नाही. तो राहत असलेल्या भोवतालच्या नैसर्गिक उपलब्धदतेनुसार किंवा अभावानुसार व परिस्थितीनुसार वेगवेगळया अवस्थेत राहिला. त्यातुन मानवाने आदिवासी पशुपालक गाव करुन राहिलेले व शेती करणारे शेतकरी ते ग्रामीण आणि

ज्यांच्यात जलद कला, कौशल्य व तंत्र याचा विकास होऊन नगरात राहणारे नागरी असे भाग पडले.

मानववंशशास्त्रज्ञांच्या मतानुसार भारतात मुळ रहिवासी हे द्रविड असून आर्य, मंगोलियन आणि शिथीअन या वंशाचे लोक त्यांच्या भिन्न भिन्न संस्कृतिसह नंतर आलेले आहेत. यातील आर्यांच्या टोळया सुमारे पाच हजार वर्षापुर्वी भारतात मध्ये आल्या. आर्यांच्या टोळया या एकाचवेळी भारतात आल्या नाही तर

सर्वसाधारणपणे सातशे ते आठशे वर्ष पर्यंत त्या क्रमाक्रमाने भारतात हिमालयाच्या खैबर खिंडीतून सिंधूतिरावर येऊन धडकत होत्या. येथील मुळ रहीवासी लोकांबरोबर लढाई करुन हळूहळू स्थाईक झाल्या. भारतातील मुळ अनार्य किंवा द्रविड ज्यांना दास, दस्यू, अही, पणी, नाग, राक्षस, असूर, कालकेय, किरात अशा अनेक नावांनी ओळखले जात होते. ते मुलतः सुसंस्कृत शांतताप्रिय, कालवे काढुन शेती करणारे, धरणे बांधणारे, नगरे बांधणारे, स्थापत्यविशारद, गोपालक, वृषभपूजक, शेतकरी व कारागीर होते.[1] त्यांची शेती सुपीक होती. भरपूर धनधान्य पिकत होते. निरनिराळया कलाकुसरीच्या वस्तू, भांडी, मसाल्याचे पदार्थ इत्यादी गोष्टी निर्माण करण्याची त्यांची क्षमता होती. त्यांचा व्यापार इजिप्त, मेसोपोटेमिया, बाबिलोनिया इत्यादी राष्ट्राशी चालत असे. कालवे आणि रस्ता वाहतूकेने ते मालाची ने आन करीत असे. याच काळात त्यांची नागर संस्कृती इतकी विकसीत झाली होती की मोहोंजोदडो व हडप्पा यासारखी शहरे त्यांनी वसविली होती. परंतू आर्यांनी येथील मुळ रहीवाशांवर आक्रमण केले त्यांची नगरे, कालवे, पाणीपुरवठा, इत्यादी गोष्टी उध्वस्थ केल्या. आर्यांच्या टोळया असंस्कृत, रानटी, कलाकौशल्यविहीन होत्या. त्याच बरोबर स्त्रिविहीन होत्या. शांत, सुखी, आणि सुसंस्कृत मुळ रहिवासी द्रविड त्यांच्या हल्लांचा प्रतिकार करु किंवा लढू शकत नव्हते. अशा या रानटी आर्यांना बघितल्याबरोबर नगरातील लोक जंगलामध्ये पळून जात. कारण मोहोंजोदारो, हडप्पा व नर्मदा नदीच्या खोऱ्या सापडलेल्या नगरांच्या अवशेषांमध्ये मानवी प्रेताची संख्या अत्यंत कमी आहे. त्याच्यामध्ये युध्द करतांना मेलेले लोक फारसे आढळत नाही. याचा अर्थ असा आहे की, परचक्राच्या आगमनाबरोबर गावातील लोक आपली मालमत्ता व घरेदारे सोडून जंगलामध्ये परागंदा होत असत आणि त्या नगराचा ताबा आर्य घेत असावेत.[2] पण आर्याकडे कुशल शेतकरी व कारागीर नसल्यामुळे व सेवा देणारी माणसे हवी असल्यामुळे, तसेच परागंदा झालेले उदरनिर्वाहाकरिता कामधंदयाच्या आशेने परत येत. व आर्य त्यांना गुलाम किंवा शुद्राच्या रुपाने गावाच्या बाहेर किंवा गावाच्या परिघाला लागून वस्ती करण्याला परवानगी देत. त्यामुळे आर्याच्या आक्रमणामुळे प्रामुख्याने समाजरचनेत बदल घडून आला. आक्रमणकारी आर्य सत्ताधारीझाले, शरण आलेले मुळ रहिवासी गुलाम झाले तर जे शरण आले नाही, ते दुर जंगलात लपत, छपत फिरत राहुलागले. ते विस्थापित झाले. कंदमुळे फुले गोळा करुन व प्राण्यांची शिकार यावर उपजिविका करुन टोळयांच्या रुपात फिरुन जगु लागले. त्यामुळे मुळ रहिवाशांच्या सामाजिक–सांस्कृतिक वर्तन प्रणालीत फरक पडत गेला. जे आर्याच्या सोबत राहिले ते संख्येनी जास्त होते तो बहुजन समाज, आर्य–अनार्य संकरातून तयार झाला. तर जो दूर गेलेला, विस्थापित झालेला भटका समाज त्याच्या मुळ सामाजिक–सांस्कृतिक प्रतिमानांचे जतन करीत राहीला.

भारतीय समाजामध्ये कालांतराने काही विस्थापित झालेले काही भटके पुन्हा भटकेपणाला कंटाळून किंवा इतर कारणाने आर्यांना येऊन मिळाले. पण आर्यांनी त्यांना पुर्वीच्या शरण आलेल्यांमध्ये किंवा गावामध्ये स्थान दिले नाही. तर त्यांना गावकुसाबाहेर राहायला भाग पाडले. तत्पुर्वी एक जो समाज होता. तो दूर घनदाट जंगलात वस्ती करुन राहणारा. कोणत्याही प्रकारचा संस्कृती संकर न झाल्यामुळे रहिवाशांचा ज्यांच्यावर आर्यांच्या आक्रमणचाही फरक पडला नाही. ज्याची सामाजिक व्यवस्था व संस्कृती वेगळी होती व त्याचे तो अनुसरण करीत होता. तो म्हणजे आदिवासी समाज. अषाप्रकारे इंग्रजांच्या आगमनापुर्वी भारतीय समाजात खालील प्रकारची समाज व्यवस्था होती.

1. आक्रमक आर्य जे स्थिर होऊन सत्ताधारी झालेले. जे गावाच्या मध्यभागी राहतात. हा वर्ग इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ मानला जातो. तो म्हणजे सवर्ण वर्ग.
2. आर्यांना शरण येऊन, आर्यांशी संकर झालेला गावगाड्यात राहणारा वर्ण व्यवस्थेतला बहुसंख्य असलेला शूद्र वर्ग.
3. उषिरा शरण आलेला पण वर्णव्यवस्थेच्या व गावडाड्याबाहेर आश्रय घेतलेला, अतिशूद्र किंवा अस्पृश्य.
4. जंगलात राहणारा व इतर समाजाच्या संपर्कात न आलेला, स्थिर असलेला व स्वतःची जीवन पध्दती व संस्कृती जतन करुन असलेला आदीवासी समाज.

5. दूर जंगलात, डोंगर कपारीत लपत–छपत फिरत असलेला, विस्थापित झालेला, आपआपल्या जमातीची फिरती राष्ट्रे बनवून फिरत राहणारा व ज्यांची स्वतंत्र संस्कृती असणारा, भटका समाज.

भटका वर्ग, हा आदिवासी आणि अस्पृष्य समाजापेक्षा वेगळा आहे, त्याला घर ना दार, शेत ना गांव ! त्याला वस्तीकरुन एकाच ठिकाणी राहणे शक्य झाले नाही. पोटासाठी डोक्यावर बिऱ्हाड घेऊन त्यांना सदैव भटकंती करावी लागली. आजपर्यंत कोणाचेही विषेष लक्ष या समाजाकडे गेले नाही. आणि लक्ष गेले तरी त्यांच्या उत्थानाकरीता प्रयत्न झालेच नाही. 'मात्र युरोप खंडातील काही देषांनी अषा भटक्या टोळयांची भटकंती थांबवून त्यांच्या जीवनात स्थैर्य आणले आहे. त्यांचे पुनर्वसन केले आहे. नागरी जीवन जगण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे.'[3]

**भटका समाज**(Nomad Society) :- 'भटक्या' समाजाची व्याख्या आणि व्युत्पत्ती या संर्दभात वेगवेगळया विचारवंतानी वेगवेगळी मते मांडली आहेत. भारतीय समाजविज्ञान कोश खंड–3 मध्ये ''कोणत्याही एके ठिकाणी स्थायी स्वरुपाची वस्ती न करता उपजीविकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणाऱ्या जमाती म्हणजे भटक्या जमाती''.[4]

उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या किंवा तसे करण्यास भाग पडलेल्या व्यवसायानिमित्त तसेच उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधात भटकत राहणाऱ्या लोकांना भटके म्हणतात. इंग्रजीत भटक्या शब्दाला Nomad असे म्हणतात.

According to, the American Heritage Dictionary of the English Language

Nomad means

i) A member of a group of people who have no fixed home and move according to the Seasons from place to place in search of food, water and grazing land.

ii) A person with no fixed residence who roams about, a wanderer"[5]

भटका हा शब्द ग्रीक भाषेतील Nomad या शब्दापासून आला असून या शब्दाचा अर्थ Wandering in search of pasture असा होतो. यावरुन असे म्हणता येते की, ज्यांचे स्वतःचे कायम स्वरुपाचे घर किंवा शेतजमीन नाही, परंतु गुरांचे कळप आहेत. असे लोक गुरांसाठी चराऊ कुरणांच्या शोधार्थ सतत भटकत असतात. अशा भटकंती करणाऱ्या लोकांना किंवा समुहांना भटक्या (Nomad) असे कालांतराने संबोधण्यात आले.

हा शब्द किंवा संकल्पना फक्त जंगलात भटकणाऱ्या लोकांसाठीच वापरली जाते असे नाही, तर एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकंती करणाऱ्या लोकांसाठीही ती वापरली जाते. खेचरे, गाढवे तट्टु, घोडे, उंट इत्यादींवर आपली मालमत्ता लादून स्वतःच्या इच्छेनुसार किंवा परिस्थितिच्या दडपणामुळे चांगली उपजिविका होऊ शकेल. अशा ठिकाणांच्या शोधात असे लोक सतत स्थलांतर करीत राहतात. डोंबाऱ्याचे खेळ, जादूचे खेळ, साप व मुंगुसाची लढाई, भविष्य कथन, किरकोळ व्यापार, कारागिरी, वैद्यकी, जंगलातील वस्तूंची विक्री इत्यादी व्यवसाय ते करतात. सतत भटकत राहतात, सामानासह सतत स्थानांतरण करतात पण वर्षाच्या काही विशिष्ट दिवशी किंवा काळाकरिता कुठल्यातरी जत्रे करिता किंवा श्रध्देपोटी नवस फेडणे वगैरे गोष्टी करीता एकत्र येतात.

The Roayal Anthropalogical Institute of Great British या संस्थेने भटक्यांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "Nomadic People are those who depend principally on Huning or Collecting for their supplies having no permanent addres"[6].

अर्थात भटके लोक हे प्रामुख्याने आपल्या जीवनोपयोगी वस्तू गोळा करण्याकरिता व शिकारीकरिता भटकत राहणारे असून त्यांच्या समुहाला स्थिर असे कोणतेही ठिकाण नाही, ते सतत भटकंती करीत असतात.

डॉ. व्ही.एल. मेहता यांनी भटक्यांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे."He describes Nomad as Grasstenders and Cattle breeders further He describes Nomadisum as regular, Seasonal cyclic movement of Groups for substance. According to food supply it may assume different forms depending upon go Geography and climet. There are Nomads who Hunt and who collect food as well as pastoral and even Agricultural Nomads are usually found in Small Kinbands. There are not only grasslanders but takes to Nomadic title on account of Economic in Security and lack at will for social adjustment"[7].

वरील व्याख्येवरुन असा अर्थ स्पष्ट होतो की, काही भटके समुह असे आहेत की, जे सतत गुरे–ढोरे चारण्याचे काम करीत असून ऋतूमानाप्रमाणे एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी भटकत असतात. तर काही भटके समुह गुरे–ढोरे बाळगून शेतीचा व्यवसाय काही काळ करतात व त्यानंतर ते गुराढोरांना घेऊन भटकंती करीत असतात.

पहिल्या समुहात असुरक्षितता आहे, त्यांना सतत भटकंती करावी लागते. परंतु दुसरा समुह शेती

व्यवसायामुळे काहीसा स्थिर वाटत असला तरी त्यांना आर्थिक सुरक्षितता व स्थिरता लाभलेली नाही. त्यामुळे दोन्ही समुह सामाजिक दुष्टया असुरक्षित आणि भटकेच आहेत.

श्री. व्ही. रघवय्या यांनी त्यांच्या 'नोमॅड' या ग्रंथात भटके लोक भारतातच नव्हे तर जगात सर्वत्र आढळतात असे म्हटले आहे. अमेरिका आणि युरोप खंडात असे भटके जीवन जगणाऱ्या जमातींना 'जिप्सी' म्हणतात. जिप्सी हा शब्द इजिप्शियन या शब्दांचा अपभ्रंश आहे. असे काही तज्ञांचे मत आहे. पण भिक्षु चमनलाल यांनी 'जिप्सी'चे मुळ स्थान भारतीय आहे असा दावा केला आहे. त्यांनी युरोपियन जिप्सी आणि भारतीय भटक्या जमाती यांच्यात साम्य दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'जिप्सी' हे मुलतः भारतातुन आले असावेत असे, इतर ही तज्ञांचे मत आहे. भारतातून सुमारे दोन हजार वर्षापुर्वी, त्यांनी युरोप अमेरिकेकडील देशात स्थलांतरण केले असे म्हटले आहे. जुलमी आक्रमणाला शरण न जाता त्यांनी आपले अस्तित्व टिकविण्यासाठी व स्वाभिमानाला कायम ठेवण्याकरिता जिप्सींना स्थालांतरण करावे लागले.

अशाप्रकारे भटक्यांना उदरभरणाचे कोणतेही निश्चित साधन नसल्याने कायम फिरावे लागत असे. आजही कायमस्वरुपी चरितार्थाची साधने उपलब्ध नाहीत. परिणाम स्वरुप त्यांचे जीवन मागासलेले, अस्थिर, दरिद्री व दुर्लक्षित झाले आहे. या परिस्थितीत आजच्या घडीला फारसा फरक पडला नाही.

**महाराष्ट्रातील भटक्या जमाती** :– भारतात सरकारी आकडेवारी नुसार 198 विमुक्त जमाती (ज्या भटक्या जमातींना गुन्हेगारी जमाती कायदा 1871 अन्वये गुन्हेगार म्हणून सेटलमेंटमध्ये डांबून ठेवले व स्वातंत्र्यानंतर विमूक्त करण्यात आलेल्या जमाती) आणि 147 भटक्या जमाती आहेत. त्यांची लोकसंख्या संपूर्ण भारतात 10 कोटीच्या आसपास आहे. अर्थात ही संख्या अगदी काटेकोरपणे सांगता येत नाही. कारण ते कोणत्याही एके ठिकाणी स्थिर नाही व सरकारने भटक्या–विमुक्तांची कधीही स्वतंत्रपणे 'जनगणना' करण्याचा प्रयत्न केला नाही. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या भटक्या–विमुक्तांच्या यादीत विमुक्तांच्या प्रमुख 14 जाती व भटक्यांच्या प्रमुख 29 जाती मिळून भटके विमुक्त 43 मुख्य जातीत विभागले आहेत या दोन्ही जमातीच्या 35 किंवा पोटजातीची संख्या 140 व सर्व मिळून 183 जाती/उपजातींना महाराष्ट्र शासनाची मान्यता असून त्यांची राज्यातील एकुण लोकसंख्या 40 लाख आहे. असे असले तरी अनेक खऱ्या–खुऱ्या भटक्या–विमुक्त जातींचा समावेष झालेला नाही.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार गोसावी, बेलदार, भराडी, भुते, वगळले, चित्रकथी, गारूडी, घिसाडी, गोल्ला, गोंधळी, गोपाळ, हेळवे, जोषी, काषी कापडी, कोल्हाटी, मैराळ, मसनजोगी, नंदी–वाले, पांगूळ, रावळ, सिक्कलगर, ठाकर, वैदू, वासुदेव, भोई, बहूरूपी, ठेलारी, ओतारी, धनगर या भटक्या जमाती आहे. तर बेरड, बेस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभाट, कटाबू, बंजारा, पालपारधी, राजपारधी, राजपूत भामटा, रामोषी, वडार, वाघरी, छप्पर बंद या विमूक्त जाती आहेत. तसेच या प्रमुख भटक्या–विमूक्त जमातीच्या काही उपजमाती देखिल आहेत.

**संदर्भः–**


1. माने लक्ष्मण, विमुक्तायन,(महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास), प्रकाशक : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबइ–21, 1977, पृष्ठ क्र. 76.
2. बावणे डॉ. लीनकुमार, भटक्यांचा भग्न संसार व संस्कृती,सुधीर प्रकाशन, वर्धा, 2006, पृष्ठ क्र. 222–223
3. माने लक्ष्मण, विमुक्तायन, (महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास), प्रकाशक : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबइ–21, 1977, पृष्ठ क्र. 76
4. बावणे डॉ. लीनकुमार, भटक्यांचा भग्न संसार व संस्कृती, सुधीर प्रकाशन, वर्धा, 2006, पृष्ठ क्र. 223
5. देवगांवकर डॉ. एस.जी., महाराष्ट्रातील निवडक जाती–जमाती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर–2009. पृष्ठ क्र. 355
6. गारे डॉ. गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2002, पृष्ठ 176
7. माने लक्ष्मण, विमुक्तायन,(महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास), प्रकाशक : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबइ–21, 1977, पृष्ठ क्र. 226

Volume - 02, Issue - 02, July - December, 2013 / ISSN 2278-3199

# भारताच्या अंतर्गत व बाहय सुरक्षिततेच्या संदर्भात यशवंतराव चव्हाण

**प्रा. राजेंद्र ओ. बेलोकार,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर कॉलेज, तुमसर जि. भंडारा.

**प्रस्तावना** :– यशवंतराव चव्हाण हे नाव केवळ महाराष्ट्राच्या पायाभरणीसाठी व उभारणीसाठी नव्हे तर संपूर्ण देशाच्या अखंडतेच्या संरक्षणासाठी देखील ओळखले जाते. १९६२ च्या चीन आक्रमणाने नेहरू पार हादरून गेले होते. तेव्हा देशाचे संरक्षण हा कळीचा मुददा बनला होता. अशा स्थितीत देशाच्या संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी नेहरूंनी यशवंतराव चव्हानावर सोपविली. अगदी जमीनीशी नाते असणरे यशवंतराव आपल्या प्रषासकीय अनुभवाने जिददीने कामाला लागले. सीमावर्ती भागांचे दौरे करून संरक्षण व्यवस्था व सेनादलाच्या समस्या व उणीवांचा बारकाईने अभ्यास केला. सेनादलाच्या आधुनिकीकरणाची त्यांना तीव्र जाणीव झाली व त्यांनी संरक्षण व्यवस्था अद्ययावत करण्याच्या दिशेने पाऊले उचलली. यंशवतरावाच्या अशा मुत्सददी निर्णयामुळे१९६५ चे भारत –पाक युध्दात भारतीय सेनादले आत्मविश्वासाने लढूलागली. या युध्दात मिळविलेला विजय हा यशवंतराव चव्हाणांच्या दुरदृष्टीवर शिक्का मोर्तब करणारा ठरला. यशवंतराव चव्हाणांनी केवळ संरक्षणमंत्री म्हणूनच नव्हे तर देशाचे गृहमंत्री, अर्थमंत्री म्हणून देखील देशाच्या उभारणीत मोलाची कामगीरी बजावली. प्रस्तुत शोध पत्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी देशाच्या संरक्षण व विकासासाठी दिलेल्या योगदानाची शास्त्रशुध्द मांडणी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्राच्या मातीतुन यशवंतरावांच्या व्यक्तीमत्वाची जडण घडणझाली महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक संकटाला संधीत रूपांतरीत करून यशवंतरावचे नेतृत्व तावून सलाखून निघत असतानाच केंद्रपातळीवर चीनच्या आक्रमणामुळे एक मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला होता व त्याने खुदद नेहरूंच्याही नेतृत्वाला हादरे दिले होते. संक्षणमंत्री कृष्ण मेनन यांना काढून टाकण्याची मागणी सत्तारूढ व विरोधी दोन्ही पक्षगटांनी केली होती. नेहरूंची इच्छा काहीही असली, तरी त्या मागणीचा जोर वाढल्यावर त्यांना पर्यायच उरला नव्हता. त्यानीलालबहादुर शास्त्रींशी नव्या संरक्षण–मत्र्यांच्या निवडीबददल चर्चा केली. टी. टी. कृष्णम्माचारी, बिजु पटनाईक व यंशवंतराव चव्हाण ही नावे चर्चेत पूढे आली. या पदावरची व्यक्ती वादातीत असावी, प्रशासकीय कौशल्य तिने सिध्द केलेले असावे आणि तिला बळकट राजकीय पाठिंबा असावा, या तिन्ही निकषांच्या कसोटीला नेहरू–शास्त्रींच्या मते फक्त चव्हाणच उरत होते. चव्हाणांनी नेहरूंना नम्रपणे सांगितले, की आपल्याला लष्करी बाबींचा पूर्वपरीचय नाही आणि राष्ट्रभक्तीखेरीज त्या पदाला लागणारी गुणवत्ताही नाही. पण नेहरूंचा निर्णय कायम राहीला. १४ नोव्हेंबर १९६२ रोजी चव्हाणांची संरक्षण मंत्री पदावरील नियुक्ती जाहीर झाली. आणि त्यांच्या राजकीय जिवनातील नव्या पर्वाला प्रांरभ झाला.

यशवंतराव चव्हाणांनी संरक्षण मंत्रीपदाचा प्रभार स्विकारल्या नंतर लवकर त्या खात्याचा कारभाराची माहीती बारकाइने करून घेतल, नेफा व लड्डाख सीमांना भेटी देऊन युध्दाचे बारकावे समजावून घेतले. लष्करी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केल्या सैनिकांच्या आधिच्या काही घडामोडीमुळे डळमळीत झालेला आत्म विश्वास त्यांनी पुन्हा बळकट केला. याच्यातील हताशपणाची भावना पुसून त्यांची नितीधैर्य वाढवले. चव्हाणांनी आधी ज्या पदांच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या, त्या पेक्षा अगदीच वेगळया प्रकारच्या जबाबदाऱ्या या नव्या पदावरून त्यांना पत्करायच्या होत्या इथल्या समस्यांचे स्वरूप मुलतः निराळे होते. त्यांची परीभाषा, सोडवण्याची रीत आणि आयाम–सारेच काही एकदम वेगळया प्रकारचे होते. पण अंगभूत चिकाटी, व्यासंगी वृत्ती व कार्य निष्ठा या गुणांच्या बळावर चव्हाणांनी नव्या पदासाठी आवश्यक असलेली नवी पात्रता आत्मसात केली. संरक्षण ही केवळ लष्करांशी संबंधीत बाब नसुन तिला महत्त्वाचे राजकीय, आर्थिक व मानसशास्त्रीय पदर असतात, याचे भान ठेवून त्यांनी संरक्षण खात्याचा कारभार चालविला.

यशवंतराव अंत्यत मुत्सद्दी, अभ्यासू वृत्तीचे असल्यामुळे संरक्षणाशी संबंधीत विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र समित्या चव्हाणांनी नेमल्या. विविध क्षेत्राचा व खात्यांचा परस्परांशी जो संपर्क व सुसंवाद संरक्षण दृष्टया आवश्यक असतो, तो प्रस्तापित करण्यासाठी पावले उचलली. जनसामान्यांमध्ये लष्कराच्या भुमिकेसंबंधीची जाण वाढवण्याचे प्रयत्न केले. लष्करी दलांची फेररचना व शस्त्रसज्जता या बाबतीत त्यांनी स्वतः तर हस्तक्षेप केलाच नाही, पण अन्य कुणालाही करू दिला नाही. लष्कराच्या आधुनिकीकरणाचे उपाय त्यांनी तातडीने योजिले परदेशांकडुन साहीत्य व शस्त्रसामग्री मिळवली. आधीच्या संरक्षण मत्र्यांच्या तुलनेत त्यांनी संरक्षण विषयक प्रश्नांबाबत संसदेला व सर्वसामान्य जनतेला अधिक विश्वासात घेतले, असा अभिप्राय वृत्तपत्रांनी व्यक्त केला होता. यशवंतरावांना त्यांचा प्रशासकीय पूर्वानुभवाचा व

कार्यक्षमतेचा खूप उपयोग झाला. आव्हाने पाहुन उफाळणाऱ्या त्यांच्या आत्मविश्वासाने व महत्वाकांक्षेने त्यांना उत्तम साथ दिली.

चीनच्या आक्रमणाने नेहरूंना तो धक्का बसला त्याने ते सावरू शकले नाही. नेहरूनंतर लालबहादुर शास्त्री देशाचे प्रधानमंत्री बनले. शास्त्रीबरोबरच संरक्षणमंत्री चव्हाण यांची कीर्ती या काळात जगभर पसरली. चव्हाणांचे नेतृत्व राष्ट्रव्यापी होण्यास आणि त्यांच्या गुणांचा लौकीक सर्वत्र पसरण्यास पाकिस्तानचे १९६५ चे आक्रमण मोठया प्रमाणवर कारणीभुत ठरले. चव्हाणांच्या समर्थ राजकीय नेतृत्वाखली भारतीय सेनादलांचे नीतिधैर्य या लढयाच्या वेळी खूपच उंचावलेले होते. आक्रमणाला जोरदार प्रतिसाद या दलांनी दिला, त्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी राजवटीचे धाबेच दणाणले. हवाई दलाने लष्कराला दिलेल्या उत्तम साथीमुळे ते पाकिस्तानचा पाडाव करू शकले. युध्देबंदी झाली, तेव्हा पाकिस्तानने व्यापलेल्या भारताच्या प्रदेशापेक्षा तिपटीहून जास्त पाकिस्तानचा प्रदेश भारताच्या ताब्यात होता.

४ जानेवारी १९६६ राजी शास्त्री–अयुबखान बोलनी ताश्कंदमध्ये सुरू झाली. चव्हाण शास्त्रींच्या सोबत होते. युध्दभूमीवर यशातुन जसे चव्हाणांचे संरक्षणमंत्री म्हणुन गुण दिसुन आले होते, तसे समेटाच्या वाटाघांटीच्या बैठकीत त्यांचे राजनयनैपुण्य सिध्द झाले. प्रधानमंत्र्यांच्या अतिविश्वासाचे सहकारी ते यामुळे ठरले. पुढे शास्त्रीजींच्या निधनानंतर इंदिरा गांधी देशाच्या प्रधानमंत्री बनल्या तेव्हा गृहमंत्रीपदाची जबाबदारी कोणाकडे सोपवावी हा प्रश्न निर्माण झाला. त्या खात्यावर अनेक मंत्र्यांचे डोळे होते. चव्हाण फारसे उत्सुक नव्हते पण श्रीमती गांधीनी ते त्यांना द्यायचे ठरविले. स. का. पाटील यांनी चव्हाण हे प्रादेशिक नेते आहेत, सबब. त्यांना गृहमंत्र्यालयाची जबाबदारी देऊ नये. त्यांना ति दिल्यास आपण राजीनामा देऊ. पण त्यांचे काही चालले नाही. यशवंतराव गृहमंत्री झाले. गृहखात्याचा व्याप प्रचंड मोठा होते. राष्ट्रजिवनाच्या सर्वच बाजूूंशी त्याचा संबध होता. कायदा व सुव्यवस्था अबादित ठेवण्यापासुन आंतरराज्य सबंधापर्यंत प्रत्येक क्षेत्रात असंख्य गुंतागुंतीचे संबंध प्रश्न उदभवलेले असताना यशवंतरावांच्या हाती त्या खात्याची सुत्रे आली.

हे वर्ष भारतीय राजकारणात एकुणच तीव संघर्षाचे होते. हिंदुचा व शिखाचा जीर्णोध्दारवाद भरीव आला होता, भाषिक–प्रादेशिक अस्मिता धारदार झाल्या होत्या, राजकीय गदारोळ स्पष्ट झाला होता. सत्तारूढ पक्षातही जिथे कोणाचा पायपोस कोणाला नव्हता. तिथे विरोधी पक्षाबद्दल विचारायलाच नको, विद्यार्थ्यांची आंदोंलने उग्र होत चालली होती गोहत्त्या बंदीच्या मागण्यासाठी सांधुनी केलेल्या बंडाला शंकराचार्यांचे आशिर्वाद लाभले होते. आत्मदहनाच्या धमक्या देऊन संत फत्तेसिंग व अन्य आठ शीख नेते गृहंत्रालयाला आवाहन देत होते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व बिहारात विद्यार्थी असंतोष दडपण्यासाठी पोलीस खाते अमानुष पातळी गाठीत होते. चव्हाणांनी प्रभार घेतल्यावर तिनच दिवसांनी विद्यार्थ्यांचा जुलूस लोक सभेवर चालुन आला होता. चव्हाणांनी आपल्या खास शैलीने या प्रश्नांना हात घातला. विद्यार्थ्यांचा असंतोष हा केवळ कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ठरवून त्यांच्याशी दंडेली करणे हा उपाय प्रभावी ठरू शकत नाही, हे ओळखुन विद्यार्थ्यांच्या समस्यांचा खोलात जाऊन विचार करायचे चव्हाणांनी ठरवले. मंत्रालयाशी सलग्न असलेल्या परामर्शदायी समितीला त्यांनी या असंतोषाच्या मुळाशी असलेला सवांद भंग ( कम्युनिकेशन गॅप ) आणि इतर सामाजिक आर्थीक परिस्थितीचा संदर्भ देऊन विचार करण्यास सुचवले. प्रासंगिक उठावाचे दमन हा कोणत्याही प्रश्नाच्या निर्णायक सोडवणुकीचा मार्गच असु शकत नाही, अशी चव्हाणांची पक्की धारणा होती. विविध समित्या नेमून त्यांनी एकेका प्रश्नांची मूलग्राही चिकित्सा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली, पोलीसांच्या उठावाचाही त्यांनी आस्थेवाईक पध्दतीने निपटारा केला

**निष्कर्ष** :– उपरोक्त तथ्यांच्या विश्लेषणावरून यशवंतराव चव्हाणांनी दिलेल्या भरीव योगदानाची महत्ता पटते. देशाच्या सेनादलांना आधुनिक शस्त्राच्या प्रशिक्षणासह सज्ज करणे, सेनादलांच्या आर्थिक समस्यांचे निराकरण करणे, सेनादलांचे मनोबल वाढविणे व सैनिकांमध्ये देशभक्तीची ऊर्जा निर्माण करण्याचे त्यांनी कसोटीने प्रयत्न केले व त्यामध्ये ते यशस्वी देखील झाले. १९६२ मध्ये चीनने केलेल्या आक्रमणामुळे देशाची संरक्षण व्यवस्था नामोहरण झाली होती. तेव्हा तीला सावरण्याचे काम यशवंतराव चव्हाणांनी केले. १९६५ मधील भारत पाक युध्दात भारताने मिळविलेला विजय हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील दैदिप्त्यमान काळ होता. यंशवंतराव चव्हाणांच्या दुरदृष्टीमुळेच त्यानंतर झालेला बांग्लादेश मुक्ती लढा ( १९७१ ) व कारगिल संघर्षामध्ये ( १९९९ ) भारताची विजयी परंपरा सुरू झाली केवळ बाहय सुरक्षा नाही तर गृहमंत्री म्हणून त्यांनी अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला देखील अतिशय मुत्सददी व समजूतदारपणाने हाताळले. यशवंतराव चव्हाणांचे हे योगदान देशाच्या अंतर्गत व बाहय सुरक्षिततेसाठी मार्गदर्शक म्हणून आजही प्रांसगीक आहे.

**संदर्भ सूची** :–


१) भोळे भा. ल., 'यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य', सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, ति. आ. २००७, पृ. ५७
२) उपरोक्त, पृ. ५८
३ ) उपरोक्त पृ. ५९
४) उपरोक्त.
५ ) उपरोक्त, पृ. ६१
६ ) उपरोक्त पृ. ६१,६२

# सर्वसमावेशी विकास आणि शिक्षण एक विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. अरूण भावसिंग चव्हाण,** (सहा. प्राध्यापक), अर्थशास्त्र विभाग, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा.

**प्रस्तावना :** 'There is in our time no well educated literate population that is poor there is no literate population that is other than poor.' - (John Kenneth Galbraith)

वरील संदेश जो स्पष्ट करतो की, शिक्षणामुळे समाजामधील विषमता आणि दारिद्रय कमी होण्यास मदत होते. प्रो. सेन, म्हणतात अर्थव्यवस्थेच्या सर्वसमावेशक वृद्धींचे शिक्षण हे एक महत्वपूर्ण सूचक आहे. पुढे सार्वजनिक शिक्षणाच्या संदर्भात ते म्हणतात, 'सार्वजनिक शिक्षण हे सार्वजनिक आरोग्यासारखे महत्वपूर्ण आहे.' –(Prof. Sen - 2008)

समावेशी विकास अशी विकास प्रक्रीया आहे ज्यामध्ये फक्त आर्थिक लाभाच्या वितरणाचाच नाही तर लोकांच्या सामाजीक जिवनाला लाभदायक करण्यासाठी त्यांच्या सुरक्षा तसेच सक्षमीकरणाशी संबंधीत आहे. समावेशी विकास हा नविन विचार नसून एक नविन संकल्पना आहे. 'ऑक्सफर्ड शब्दकोषाने' समावेशी विकासाला स्पष्ट करतांना म्हटले आहे की, ही एक समान विकास रणनिती आहे. ज्यामध्ये विकासासोबत न्याय, समता, वितरण तसेच गरीबाचा विकास संबंधीत आहे.

देशाच्या आर्थिक विकास हा मानव विकासावर अवलंबून असतो आणि मानवी विकास, शिक्षण, आरोग्य, सफाई अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो. या मधला मानवी विकासावर प्रभाव टाकणारा महत्वपूर्ण घटक शिक्षण असतो. कोणताही देश असो विकसीत अथवा अविकसीत त्यांचा विकास हा मानवी विकासातून होत असतो.

UNDP च्या 2013 मध्ये प्रदर्शित झालेल्या मानव विकास निर्देशांकामध्ये ज्या तीन देशांना उच्च स्थान देण्यात आलेले आहेत त्यामध्ये (1) नार्वे (2) ऑस्ट्रेलिया आणि (3) संयुक्त राज्य अमेरीका आहे. नार्वेचा शिक्षणाचा सकल नामांकन दर हा 97 टक्के आहे. तसेच ऑस्ट्रेलिया व अमेरीकेचा शिक्षणाचा सकल नामांकन दर अनुक्रमे 108. 0 टक्के आणि 98 टक्के आहे. मध्यम मानवी विकास झालेल्या देशाच्या श्रेणीमध्ये चिन, दक्षिण आफ्रीका आणि भारत यामध्ये चिनचा शिक्षणाचा सकल नामांकन दर 70 टक्के आहे तर भारताचा 65 टक्के आहे. यावरून हे स्पष्ट होते की, मानवी विकास आणि शिक्षण यांचा सकारात्मक सहसंबंध असतो.

**शिक्षणाचे समावेशन** (Inclusion of Education) :– भारतीय अर्थव्यवस्था ही जवळपास 8 टक्के प्रतिवर्ष इतका उच्च दर साध्य करीत असली तरी या विकासाने समाजातील दूर्बल घटकांकडे दूर्लक्ष केले असे समजल्या जाते. कारण आजही भारतीय लोकसंख्येत एक मोठा भाग दारिद्रयात जिवन जगतो आहे. जर दारिद्रय कमी करायचे असेल तर गरीबाच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले पाहिजे.

समावेशी विकासामध्ये समावेशी शिक्षणाचा विचार केला जातो. एक चांगल्या दर्जाचे शिक्षण सर्वांना मिळावे याकडे विशेष लक्ष दिले जाते. समावेशी विकासाचे स्वरूप हे स्वतः शिक्षणामध्ये होणा–या प्रगतीला अनुसरून असते. योजना आयोगाने अस स्पष्ट केले आहे की, सर्वसमावेशी विकासाची व्यूहरचना ही मुख्यत्वे करून शैक्षणिक वृद्धीवर अवलंबून आहे.

**भारतामधील शिक्षणाची स्थिती :–**

1) भारतामध्ये प्राथमिक शाळांची संख्या जी 2001–02 मध्ये 6.64 लाख होती त्यामध्ये वाढ होऊन 2004–05 मध्ये 7.68 लाख झाली तसेच उच्च प्राथमिक स्तरावर एकूण नामांकन 2001–02 तूलनेत जे 11.4 कोटी होते ते वाढून 2005 मध्ये 13.1 कोटी झाले.

2) प्राथमिक स्तरावर एकूण नामांकन (वर्ग 1 ते 8) जे 2001–02 मध्ये 15.87 कोटी होते त्यामध्ये वाढ होऊन 2004–05 मध्ये 18.12 कोटी झाले. ज्यामध्ये 2.33 कोटी वाढ झाली.

3) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणाचा विचार केला तर 14–18 या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण हे 2001 मध्ये 10.7 कोटी होते त्यामध्ये वाढ होऊन 2006 मध्ये 11.97 कोटी झाले. त्याचे 2004–05 मध्ये 1.02 लाख माध्यमिक शाळा आणि 0.50 लाख उच्च माध्यमिक शाळामध्ये नामांकन हे अनुक्रमे 2.45 कोटी आणि 1.27 कोटी होते. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर एकूण नामांकन हे 3.7 कोटी होते.

4) व्यवसायीक शिक्षण : 2004–05 मध्ये राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या माहितीच्या आधारे असे निर्देशनास आले की, 19–24 वयोगटाच्या 5 टक्के व्यक्तींनाच भारतामध्ये व्यवसायीक शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचे कौशल्य विकसीत करता आले. जे 1966 च्या शिक्षण आयोगाच्या अंदाजापेक्षा कमी होते. (1986 पर्यंत कमीत कमी 25 टक्के)

5) उच्च शिक्षण : उच्च शिक्षण ज्यामध्ये स्नातक, स्नातकोत्तर, संशोधन पदविका तसेच प्रमाणपत्राच्या संबंधीत अभ्यासक्रमाचा समावेश केला जातो. उच्च

शिक्षणामध्ये एकूण नामांकन जे 1984–85 ला 34 लाख होते ते वाढून 1990–91 मध्ये 49.2 लाख झाले. त्यामध्ये सतत वाढ होऊन ते 2005–06 मध्ये 116.3 लाख झाले.

शिक्षण घेण्याच्या टप्प्यानूसार विचार करायचा झाल्यास 2006 मध्ये स्नातक स्तरावर 98.2 लाख, स्नातकोत्तर स्तरावर 10.4 लाख, संशोधनामध्ये 0.7 लाख आणि पदविकाच्या संदर्भात अभ्यासक्रमामध्ये 1.1 लाख नामांकन झालेले होते. टक्केवारीनुसार यांचा विचार केल्यास स्नातक 88.9 टक्के, स्नातकोत्तर 9.4 टक्के, संशोधन 0.6 टक्के तर पदविकेचे प्रमाण 1.1 होते.

**भारतीय शिक्षणाचे अपयश** :– अपयश हे ठळकपणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) स्वातंत्र्याचे 60 वर्षे उलटून गेल्यानंतरही भारतामध्ये प्राथमिक स्तरावर शिक्षणाचे सर्वव्यापीकरण करता आले नाही. आजही प्राथमिक शाळांच्या बाहेर असणा–या मुलांचे प्रमाण जास्त आहे.

2) प्राथमिक स्तरावर शाळा सोडण्याचा दर (Drop-out Rate) ज्यामध्ये पहिली ते आठवी पर्यंत हा 2004–05 मध्ये 50.8 टक्के होता.

3) अनुसूचित जाती व जमातीमध्ये शाळा सोडण्याचा दर हा आणखी जास्त असलेला आढळतो. हा दर अनुसूचित जाती (SCs) मध्ये 57.3 टक्के तर अनुसूचित जमातीमध्ये (STs) 65.9 टक्के आहे.

4) माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात जर विचार केला तर ही अवस्था शिक्षण सोडण्याची अवस्था नव्हे तरीपण पहिली ते दहावी पर्यंतच्या स्तरावर शाळा सोडण्याचा दर हा मुलींमध्ये जवळपास 62–64 टक्के होता तर मुलांमध्ये जवळपास 60 टक्के होता.

5) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर एकूण नामांकन 2004–05 मध्ये फक्त 39.9 टक्के होते. त्यामध्ये मुलांचे 44.3 टक्के तर मुलींचे 35.1 टक्के होते.

**निष्कर्ष** :– वरील सर्व स्पष्टीकरणावरून असे दिसून येते की, भारतामध्ये अजुनही शिक्षणाचे सर्वव्यापीकरण झाले नाही. समाजातील दूर्बल घटकांचा विचार केला तर त्यामध्ये शाळा सोडणा–या मुला–मुलींचे प्रमाण हे अतिशय जास्त आहे. तसेच भारतामधल्या विभिन्न राज्याचा शिक्षणाच्या संदर्भात विचार केल्यास केरळ, मिझोरम हे राज्य शिक्षणाच्या दृष्टीने समोर आहेत तर बिहार, झारखंड, आंध्र प्रदेश सारखे राज्य मागे आहे. याचा अर्थ भारतामध्ये आजही शिक्षणामध्ये सर्वसमावेशकता झालेली नाही.

**उपाययोजना** :– मानवी विकास अहवाल 2001 नुसार भारतामध्ये जगातील एकूण निरक्षरापैकी 33.3 टक्के निरक्षर राहतात. तर जगातील एकूण सहा निरक्षरापैकी एक निरक्षर हा भारतीय आहे. यावरून असे स्पष्ट होते की भारतामध्ये शिक्षण क्षेत्रावर जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. या संदर्भात काही उपाययोजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) शिक्षणावर होणा–या सार्वजनिक खर्चामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. भारतामध्ये 1991 ते 2004–05 या कालावधीसाठी हे प्रमाण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या 3.8 टक्के होते. परंतू शिक्षण आयोग (1964–65) च्या शिफारशीनुसार हे प्रमाण सकल देशिय उत्पादनाच्या 6 टक्के पर्यंत असायला हवे.

2) माध्यमिक शिक्षणाच्या सर्वव्यापीकरणावर लक्ष केंद्रीत केल्या गेले पाहिजे. त्यासाठी आवश्यक त्या भैतिक आणि मानवी आधार संरचना शाळामध्ये निर्माण कराव्या लागेल.

3) शासन अनुदानित शाळांमध्ये परवडण्यासारखे शुल्क आकारल्या जावे, ज्यामधून चांगल्या प्रकारच्या सोई सुविधा निर्माण करता येतील.

4) उच्च शिक्षणामध्ये सकल नामांकन दर वाढविण्यावर भर देण्यात यावा जो सध्या 11 टक्के आहे आणि हा दर जागतीक सरासरी जी 23.2 टक्के पेक्षा कमी आहे.

5) तसेच सामाजीकदृष्टया दूर्बल असणारे घटक ज्यामध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. त्या घटकावर केल्या जाणा–या सहाय्यामध्ये वाढ करण्यात यावी.

6) व्यवसायीक अभ्यासक्रम घेणा–यांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी देण्यात येणा–या अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी, ज्यामुळे व्यवसायीक शिक्षणाकडे त्यांचा कल वाढेल.

**संदर्भ सुची** :


1. भारतीय अर्थव्यवस्था, रूद्रदत्त, के. पी. एम. सुंदरम, एस. चंद प्रकाशन, नवी दिल्ली
2. आर्थिक समिक्षा 2011–12, भारत सरकार वित मंत्रालय
3. वार्षिक अहवाल 2004–05, मानव संसाधन विकास मंत्रालय
4. मानव विकास अहवाल 2013, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम
5. वार्षीक अहवाल 2005–06, विद्यापिठ अनुदान आयोग
6. शिक्षण–आर्थिक आणि सामाजिकदृष्टया मागासलेल्या समाजासाठी समावेशक विकास निती, शोधनिबंध, डॉ. मिरा लाल
7. स्मावेशी विकास आणि शिक्षण, जे. बी. जी. तिलक, Economic & Political Weekly - सप्टेंबर 22, 2007
8. दृष्टीपत्र, अकरावी पंचवार्षीक योजना, योजना आयोग, भारत सरकार
9. दृष्टीपत्र, बारावी पंचवार्षीक योजना, योजना आयोग, भारत सरकार

# मानवी स्थलांतर व स्थलांतरितांची स्थिती

**डॉ. राहुल भगत,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा.

आधुनिक काळात स्थलांतराची प्रक्रिया सर्वच देशात मोठया प्रमाणात आढळून येते. मानवी समाजातील स्थलांतर हे मुख्यतः दोन प्रकारचे असते. देशाच्या एका भागातील लोक दुस–या भागात स्थलांतर करतात त्याला देशांतर्गत झालेले स्थलांतर असे म्हणतात. तर जेव्हा एका देशातील लोक दुस–या देशात स्थलांतर करतात तेव्हा त्या स्थलांतराला आंतरराष्ट्रीय स्थलांतर असे म्हणतात. स्थलांतर व स्थलांतरीतांची सर्वसामान्य काही वैशिष्टे आढळुन येतात. या वैशिष्ट्यांचा थोडक्यात उल्लेख खालील प्रमाणे करता येईल.

1) स्थलांतराचे एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे स्थलांतर निवडण्याचा काळ होय. सामान्यतः तरुण व प्रौढ वयातील लोकांचे स्थलांतरीतांमध्ये जास्त प्रमाण दिसुन येते. याची तिन महत्वाची कारणे आहेत.

अ) या वयोगटातील लोक अधिक गतीशिल असतात.

ब) रोजगारासाठी होणारे स्थलांतर मुख्यतः याच वयात होत असते. ह्या ठिकाणी महत्वाची निदर्शनास येणारी गोष्ट म्हणजे एकुण स्थलांतरीत लोकसंख्येमध्ये श्रमशक्तीचे प्रमाण अधिक असते. व

क) स्त्रियांचे स्थलांतर– विवाहानंतर होणारे स्त्रियांचे स्थलांतर हे सामान्यतः तरुण किंवा सुरुवातीच्या प्रौढ वयातच होते.

अशाप्रकारे किशोरावस्थेच्या शेवटच्या काळातील आणि तिशीतील लोकांमध्ये एका ठिकाणाहुन दुस–या ठिकाणी जाण्याची प्रवृत्ती इतर वयातील लोकांपेक्षा अधिक असते. व हे स्पष्टपणे जीवनचक्राशी संबंधित आहेत. ह्याच वयात भावंड विवाहासाठी घर सोडतात व स्वतःचे कुटूंब बसवितात. ह्या पूर्वीच्या व नंतरच्या काळामध्ये कौटूंबिक जबाबदारी गतिशिलता रोखते.[1] म्हणजेच स्थलांतर करणारे लोक हे मुख्यतः तरुण व प्रौढ साधारणतः 16 ते 39 या वयोगटातील असतात.

2) स्थलांतर प्रक्रियेत आढळुन येणारे दुसरे वैशिष्टय म्हणजे स्थलांतराची श्रृंखला (Chain Migration) हे होय. सामान्यतः लोकांची स्थलांतरणाची दिशा ही ज्या ठिकाणी त्यांचे संबंधित लोक आहेत किंवा आधीचे स्थानांतरणीय लोक नवीन स्थलांतरीतांसाठी संबंध निर्माण करु शकतात आणि अशा प्रकारे जी स्थलांतराची साखळी तयार होते त्याला श्रृंखलेत होणारे स्थलांतर (chain migration) असे म्हणतात.[2]

3) आतापर्यंतची सर्वेक्षणे व स्थलांतराचा जीवन इतिहास स्थलांतराचे तिसरे वैशिष्टय असे दर्शविते की, लोक शहराकडे आंधळेपणाने धाव घेत नाहीत. साधारणतः त्यांच्याकडे नातेवाईकांची श्रृंखला आणि मदत करणारे मित्र असतात. असे निदर्शनास आले आहे कि, सुरुवातीच्या स्थलांतरीत लोकांचा उद्देश कोणताही असला तरी एकाच भौगोलिक क्षेत्रातील लोक किंवा नातेवाईक यांच्यात एकमेकांना सहकार्य करण्याचा प्रयत्न जो सरळसरळ आर्थिक घटकांशी संबंधित आहे. त्यामुळेही पुढील साखळी स्थलांतर घडत असते.

4) अनेक स्थलांतरीत प्रवाह हे एकमेकातील जवळीक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व भाषिक संबंध दर्शवितात. उदा. अल्जेरियन्स हे दुस–या तिस–या ठिकाणी न जाता फक्त फ्रांसलाच जातात. ऑस्ट्रियन्स हे फेडरल रिपब्लिकन ऑफ जर्मनी व स्वित्झरलॅड ला जातात. आणि फीन्स हे फक्त स्विडनलाच जातात. अशाप्रकारे स्पॅनिश व पोर्तुगिज स्थलांतरीत हे लॅटिन अमेरिकेत आकर्षित होतात व भाषिक, पारंपारिक सारखेपणामुळे आयरीश लोक अमेरिकेकडेच आकर्षित होतात.[3]

5) ब–याच वेळा एका क्षेत्रातील अनेक स्थलांतरीत लोकांचे स्थलांतराचे एकच ठिकाण नसते तर एकच व्यवसाय सुध्दा असतो. उदा. असे आढळुन येते की, जयपुरच्या अनेक उपहारगृहातील कर्मचारी हे कुमाऑ (Kumaoh) या क्षेत्रातील असतात. तर कोलकात्याच्या ज्युट उद्योगधंद्यात बिहार व उत्तर प्रदेशातील मुस्लिम स्थलांतरीत लोक आहेत. कोलकात्यातील रिक्षाचालक हे सामान्यतः बिहार व ओरिसातुन आलेले आहेत. तसेच नळ दुरुस्ती व्यवसाय, घरगडी, पानवाला इत्यादी मध्ये ओरिसातील लोकांचेच प्राबल्य आहे. मुंबईमध्ये कापड उद्योगात सामान्यतः महाराष्ट्रातील रत्नागिरी, सांगली व सातारा जिल्ह्यातील लोक आहेत. बांधकाम उद्योगात आंध्रप्रदेशातील कामगार आहेत. तर उपहारगृह व भोजनालयात उडिपी, कर्नाटक येथील तरुण स्थलांतरीत लोक आहेत. याचाच अर्थ असा की, अनेकदा स्थलांतर करणारे लोक हे एकाच क्षेत्रातील आणि एकच व्यवसाय करणारे आढळुन येतात.

**आशिया खंडातील प्रमूख स्थलांतरे** :– स्थलांतराच्या जागतिक इतिहासात आशिया खंडात झालेले आंतरराष्ट्रीय स्थलांतरे यांचा थोडक्यात उल्लेख करणे, आवश्यक आहे. स्थलांतराचा जागतिक इतिहास पाहतांना

असे निदर्शनास येते की, आशिया खंडात आंतरराष्ट्रीय स्थलांतरे कमी प्रमाणात झाली आहे. कारण आधुनिक काळात स्थलांतरितांचे आकर्षण केंद्र असलेल्या प्रगत देशांनी पहिल्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर बंधणे घालणारे कायदे केल्यामुळे आशियातुन दुस–या खंडात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होऊ शकले नाही. परंतु पहिल्या महायुध्दा पुर्वी जवळ–जवळ 60–70 वर्षे आशियातुन बाहेर जाणारा मोठा प्रवाह म्हणजे, करारनामा करुन ठराविक मुदतीसाठी आशियातुन नेलेल्या श्रमिकांचा होय. फिजी, मॉरिशस, त्रिनिनाद, टोबॅगो व गियाणा या देशामध्ये असे स्थलांतर करुन गेलेले व नंतरही स्थायिक झालेले आशियायी लोक विशेषतः भारतीय हे अजुनही तेथील महत्वाच्या अल्पसंख्यांक जमाती आहेत.

जागतिक स्थलांतराच्या इतिहासातील दुसरा महत्वाचा स्थलांतर प्रवाह म्हणजे, जपानमधुन 19 व्या शतकाच्या शेवटी अमेरिका व 20 व्या शतकात ब्राझिलमध्ये झालेले स्थलांतर हा होय. आशिया खंडातील स्थलांतर प्रवाहातला अगदी अलीकडचा एक महत्वाचा प्रवाह म्हणजे दुस–या महायुध्दा नंतर इंग्लंड मध्ये मोठ्या संख्येने स्थलांतर केलेल्या भारतीय व पाकिस्तानी लोकांचा होय. ब्रिटिश होम ऑफिसच्या नोंदणी वरुन असे निदर्शनास येते की, 1955 ते 1962 या काळात जवळजवळ 1.5 लाख लोक भारत व पाकिस्तानातुन इंग्लंड मध्ये आले.[4] केवळ संख्येचा विचार न करता केवळ गुणवत्तेच्या व परिणामाच्या दृष्टीने पाहिले तर महत्वाचा प्रवाह म्हणजे, स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळात आशियातील काही देशांमधुन डॉक्टर्स, ईंजिनियर्स, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ अशा विशिष्ट व्यवसायाचे उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांनी युरोप व अमेरिकेत स्थलांतर केले.

आशिया खंडातील स्थलांतर प्रवाहात आशियामध्येच एका राष्ट्रातुन दुस–या राष्ट्रामध्ये झालेले स्थलांतर हा सुध्दा एक महत्वाचा प्रवाह आहे. मांच्युरिया, दक्षिण आशिया व आग्नेय आशिया हे प्रदेश गेल्या शतका पासुन आशियातील आस्थलांतरीचे आकर्षण विभाग आहेत. आग्नेय आशियातील सर्वच देशांमध्ये चीनमधुन स्थलांतरीत आलेले दिसुन येतात. तसेच ब्रम्हदेश, श्रीलंका व मलेशिया येथे मोठ्या प्रमाणात भारतीय स्थलांतरीत आढळुन येतात. कारण 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात व 20 व्या शतकाच्या सुरुवातीला चहाच्या, कॉफीच्या व रबराच्या मळ्यामध्ये काम करण्यासाठी मोठ्या संख्येने भारतीय मजुरांनी स्थलांतर केले. दुस–या महायुध्दापुर्वी आशियामध्ये असे आढळुन आले की, जवळजवळ 10 ते 20 दशलक्ष लोक आपल्या स्वतःच्या देशाबाहेर स्थायिक झालेले होते. दुस–या महायुध्दानंतर अनेक देशांनी आस्थलांतरावर बंधने घालणारे कायदे केल्यामुळे मजुरीसाठी, रोजगारासाठी स्थलांतर करणा–यांची संख्या कमी झाली.

आशिया खंडातील स्थलांतर प्रक्रियेला गती देणारा एक महत्वाचा घटक म्हणजे राजकिय घटक होय. राजकिय कारणामुळे आशिया खंडात पुढील महत्वाचे स्थलांतर प्रवाह निर्माण झालेले होते.

1) आशिया खंडातील सर्वात मोठे स्थलांतर म्हणजे, भारतीय व पाकिस्तानी जनतेचे फाळणीनंतरचे स्थलांतर होय. 1947 च्या भारत–पाकिस्तान फाळणीमुळे अनेकांना आपला देश सोडून दुस–या देशात जाऊन राहावे लागले. 1951 मध्ये पाकिस्तानात 7.2 दशलक्ष निर्वासित होते. व भारतातही जवळजवळ तेवढेच निर्वासित होते. जरी पाकिस्तानातुन भारतात व भारतातून पाकिस्तानात जाणा–या लोकसंख्येच्या आकड्यांत फारसा फरक नसला तरीही दोन्ही देशांतील लोकसंख्येचा भौगोलिक विभाजनावर त्याचा मोठा परिणाम झाला. ("The partition of the Indian subcontinent in 1947 precipitated a fratricidal conflict between Hindus and Muslims which resulted in a mass migration of millions of people."[5])

''आंतरराष्ट्रीय मजुर संघटनेच्या (ILO) अंदाजाप्रमाणे 1951 ते 1956 या काळात पाकिस्तानातुन भारतात 1.5 दशलक्ष हिंदु लोक आले तर बिसारीयाच्या अंदाजाप्रमाणे, 1951 ते 1961 या काळात पाकिस्तानातुन भारतात 1.32 दशलक्ष हिंदु आले.[6]

2) आशिया खंडातील स्थलांतराचा दुसरा प्रवाह म्हणजे, दुस–या महायुध्दानंतर 1946 च्या अखेर पर्यंत 5 दशलक्ष लष्करी व मुलकी जनता जपानमध्ये परत पाठविली.

3) 1947 मध्ये पॅलेस्टाईनच्या फाळणी नंतर जवळजवळ 7.5 लाख अरब निर्वासित स्थलांतर करुन सध्याच्या ईस्राईलच्या सीमेबाहेर शेजारच्या जॉर्डन, सिरिया, लेबनॉन इत्यादी देशात गेलेत.

4) चीन मधुन हॉगकॉग मध्येही अनेक लोकांनी स्थलांतर केले होते. हे स्थलांतर एकुण संख्येच्या दृष्टीने मोठे नसले तरीही हॉगकॉग सारख्या छोट्या देशात अतिरिक्त लोकसंख्या सामावून घेण्याच्या दृष्टीने ते मोठे होते. 1961 च्या हॉगकॉगच्या जनगणनेत असे दिसुन आले की, तेथील जवळजवळ अर्धि लोकसंख्या परदेशात जन्मलेली होती.

5) आशियातील स्थलांतर प्रक्रियेत बांगलादेशीय लोकांच्या स्थलांतर प्रक्रियेचाही विशेषत्वाने उल्लेख करता

येतो. 1971 ला पश्चिम पाकिस्तान व पुर्व पाकिस्तान यांच्यामध्ये जे युध्द सुरु झाले होते त्यात भारताने प्रत्यक्ष युध्दात भाग घेऊन पुर्व पाकिस्तानला म्हणजेच आत्ताच्या बांगलादेशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. व त्यासोबतच लाखो बांगलादेशी नागरिकांना आपल्या देशात सामावून घेतले होते.

अशा प्रकारे आशिया खंडातील काही स्थलांतर प्रवाह म्हणुन वरील प्रवाहांचा उल्लेख करता येतो. उपरोक्त प्रवाहा व्यतिरिक्त युध्दोत्तर काळात नव्याने स्वतंत्र झालेल्या अनेक आशियायी राष्ट्रांनी आस्थलांतरावर बंधने घातल्यामुळे नवीन स्थलांतर तर थांबलेच पण पुर्वीचे स्थलांतरीत सुध्दा परत पाठविण्यात आले. जसे 1961 मध्ये इंडोनेशिया मधुन चीन मध्ये 1 लाख लोकं परत पाठविले गेले तसेच भारतीयांचे सिलोन, ब्रम्हदेश व मलेशिया मधील स्थलांतरही जवळजवळ थांबलेलेच आहे. थोडक्यात, जगाच्या इतिहासात स्थलांतराची प्रक्रिया फार मोठया व विस्तृत प्रमाणात घडून आली आहे व अजुनही ती घडुन येत आहे. ही जागतिक स्थलांतराची प्रक्रिया मुख्यतः राजकिय व युध्द कारणांमुळे मोठ्या प्रमाणात घडुन आली आहे.

**आंतरराष्ट्रीय स्थलांतरः—** ''आंतरराष्ट्रीय स्थलांतर म्हणजे एका राष्ट्रातील नेहमीचे राहण्याचे ठिकाण सोडून त्या राष्ट्राची सीमा ओलांडुन दुस—या राष्ट्रातील एखाद्या ठिकाणी वास्तव्यासाठी जाणे होय.''[7]

याचाच अर्थ जेंव्हा व्यक्ती किंवा व्यक्तीसमुह एका राष्ट्राच्या राजकिय सीमा ओलांडुंन दुस—या राष्ट्रात तात्पुरत्या किंवा कायम वास्तव्यासाठी स्थलांतर करतात तेंव्हा त्या स्थलांतरास आंतरराष्ट्रिय स्थलांतर असे म्हणतात.

आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर एकोणीसाव्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत पाहिजे तेवढे कठोर निर्बंध नव्हते. त्यामुळे संपुर्ण जगात आंतरराष्ट्रीय स्थलांतरे या काळापर्यंत फार मोठया प्रमाणात झालीत. तथापी आधुनिक काळात मात्र आंतरराष्ट्रिय स्थलांतर हि घटना अत्यंत नियंत्रित व काटेकोर झाली आहे. पहिल्या व दुस—या महायुध्दानंतर जगातील अनेक राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर निर्बंध घातले व यामुळेच 1950 नंतर आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे जागतिक प्रमाण कमी झाले. परंतु तरीही राजकिय कारणांमुळे व युध्दामुळे आंतरराष्ट्रीय स्थलांतरे आजही घडुन येतातच. जगाच्या इतिहासात राजकिय कारणांमुळे घडुन आलेले आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे प्रमाणही बरेच मोठे आहे. जसे —

1) जर्मनीत हिटलर सत्तेवर आल्यानंतर 1930 —40 या दशकात लाखो ज्यू लोक आपला वंश विनाश होईल या भितीने अमेरिकेत व युरोपात पळून गेले. व तेथेच स्थायिक झालेत.

2) दुस—या महायुध्दाच्या काळात व त्यानंतर पराभूत झालेल्या राष्ट्रातील हजारो मुलकी व लष्करी राजकिय कैद्यांची सक्तीने युध्दासाठी भरती करुन त्यांना जहाजातून रशियाच्या आशियायी भागातील छावण्यात पाठविण्यात आले.

3) दुस—या महायुध्दा नंतरच मांच्युरिया, कुरिया, तैवान व पॅसिफिक महासागरातील पश्चिमेकडिल बेटातुन तीस लाख जपानी लोकांना परत पाठविण्यात आले.

4) 1947 च्या भारत व पाकिस्तान यांच्या फाळणी नंतर 70 लाख मुसलमान भारतातुन पाकिस्तानात व 85 लाख हिंदु पाहिस्तानातुन भारतात आले.[8]

5) साम्यवादी चीनच्या उदयानंतर 10 लाख चिनी सैनिक व जनता तैवान मध्ये पळून गेली व तिथेच स्थायिक झाली.

6) कोरियन युध्द काळात 10 लाख निर्वासित उत्तर कोरियातून दक्षिण कोरियात पळून गेले.

7) इंडोनेशियातून चिनी लोकांना मोठ्या प्रमाणात देशाबाहेर जावे लागले.

8) दुस—या महायुध्दाच्या काळात ईस्राइल मधुन हजारो अरब पळून गेले व निर्वासित झाले. अगदी अलीकडे म्हणजे 1967 पर्यंत असे सुमारे 10 लाख लोक व त्यांची मुले ईस्राइलच्या सीमेवर युनाईटेड नेशन्स च्या संरक्षणाखालीच राहात होते.

9) आणि अगदी अलीकडच्या काळात म्हणजेच 1971 च्या भारत पाकिस्तान युध्द काळात लाखो बांगलादेशीयांचे भारतात झालेले स्थलांतर हे सुध्दा राजकिय कारणांमुळेच घडुन आलेले आहे.

**भारतातील स्थलांतराची स्थिती :—** भारतातील आंतरराष्ट्रीय स्थलांतराच्या इतिहासाचे स्वातंत्र्यपुर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळ असे दोन भाग करता येतात. स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील स्थलांतरितांची स्थिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

**स्वातंत्र्यपुर्व काळ :—** स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात फारच कमी लोकांचे स्थलांतर झाले. स्वातंत्र्यपुर्व काळातील आंतरराष्ट्रीय स्थलांतराचा अचुक अंदाज येण्यासाठी विशेष माहिती उपलब्ध नाही. तथापी जी माहिती उपलब्ध होती तिचा अभ्यास करुन 1931 पर्यंतच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतराचा अभ्यास करुन किंग्सले डेव्हिस यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, 1891 ते 1931 या

काळात आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांचे भारताच्या लोकसंख्येतील प्रमाण फक्त 0.2 टक्के इतके होते.[9]

याचाच अर्थ स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात स्थलांतरितांची लोकसंख्या अगदीच कमी होती. वास्तविकतः स्वातंत्र्यपुर्व भारतात इतर देशातुन नागरिक स्थलांतरीत झाले नाही कारण स्वातंत्र्यपुर्व काळात भारत हा गरीब व अविकसित देश म्हणून गणला जात होता. तथापि असे असले तरीही 1891 ते 1931 या काळात भारतातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे 0.2 टक्के म्हणजे 5.5 ते 6.5 लाख परकिय लोक भारतात होते. 1931 मध्ये त्यापैकी सुमारे 81 टक्के आशिया खंडातील इतर देशातुन व 16 टक्के युरोप खंडातून आलेले होते. याच काळात भारतात आलेल्या स्थलांतरींची देशनिहाय संख्या पुढिलप्रमाणे होती. नेपाळ 44.7 टक्के, इंग्लंड 14.7 टक्के, फ्रेंच व पोर्तुगीज 12 टक्के, अफगाणिस्तान 11.9 टक्के, ब्रम्हदेश 3.6 टक्के व अरबस्तान 3.5 टक्के इतके होते. यापैकी इंग्लंडचे लोक हे राज्य करण्यासाठी आलेले होते. नेपाळी लोक विवाह या कारणामुळे आलेले होते, तर अफगानी लोकांचे स्थलांतर मुख्यतः व्यापारासाठी होते.[10]

एकंदरीत स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील स्थलांतरितांचे प्रमाण फारसे नव्हते. कारण याच काळात जसे इतर देशांतून लोक भारतात येत होते तसेच भारतातूनही इतर देशात लोक जात होते. ज्यांना उत्स्थलांतरी असे म्हटले जात होते. एकुणच 1834 ते 1937 या शंभर वर्षात जवळपास 30 दशलक्ष उत्स्थलांतरी भारताबाहेर गेले व जवळजवळ 24 दशलक्ष परत भारतात आले. यापैकी 1834 ते 1908 या काळात उत्स्थलांतरीच्या संख्येत वाढ होत होती. कारण करारनामा करुन विशिष्ट मुदतीसाठी परदेशात मजुर भरती करण्याच्या पध्दतीवर जवळजवळ नियंत्रणे नव्हतीच. त्यामुळे भारतातील लोक मोठया प्रमाणावर देशाबाहेर गेले. तथापी 1908 ते 1923 या काळात मात्र या पध्दतीवर नियंत्रण आणल्या गेल्यामुळे तसेच याच कालावधित पहिले जागतिक महायुध्द झाले त्यामुळे भारतातुन बाहेर देशात जाणा—या उत्स्थलांतरीचे प्रमाण कमी झाले. 1922 सालच्या कायद्यामुळे मजूर भरतीच्या पध्दतीवर नियंत्रणे आली तरी स्थलांतर करणा—या मजुरांना सरकारी संरक्षण मिळाले. तसेच 1922 नंतर जगात आर्थिक परिस्थितीत थोडी सुधारणा झाली. त्यामुळे 1922 ते 1930 या काळात पुन्हा भारतातुन बाहेर देशात जाणा—यांचे प्रमाण बरेच वाढले. तथापी 1930 नंतर मात्र प्रथम जागतिक मंदी व नंतरच्या दुस—या महायुध्दामुळे प्रत्यावर्ती स्थलांतर (रिटर्न मायग्रेशन) हेच उत्स्थलांतरापेक्षा जास्त होते. म्हणजेच जागतीक मंदी व पहिल्या महायुध्दामुळे भारतातून गेलेले लोक परत भारतात आले.

अशा प्रकारे केवळ उत्स्थलांतराचा म्हणजेच भारतातुन इतर देशात जाणा—या लोकांचा विचार केला तर यांची संख्या 1900 नंतर खुप वाढलेली दिसते. 1834 ते 1900 या काळात ही संख्या दरवर्षी सुमारे 2 लाख एवढी होती. तर 1900 ते 1937 या काळात ही संख्या दरवर्षी सुमारे 4 लाख इतकी होती. परंतु 1900 नंतर भारतात परत येणा—यांचीही संख्या इतकीच होती व यामुळेच निव्वळ आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते.

उपरोक्त विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्यपुर्व काळात भारतीय लोकांचे देशाबाहेर जाणे किंवा इतर देशातील लोकांनी भारतात येण्याचे प्रमाण जवळपास सारखेच होते. यामुंळेच स्वातंत्र्यपूर्व काळात निव्वळ आंतरराष्ट्रीय स्थलांतर कमी होत गेले.

**स्वातंत्र्योत्तर काळ** :— स्वातंत्र्योत्तर काळात भारतात स्थलांतरीत होणा—या लोकांचे प्रमाण स्वातंत्र्यपुर्व काळाच्या तुलनेत बरेच लक्षणीय आहे. कारण स्वातंत्र्योत्तर काळात भारतातुन बाहेर जाणा—या उत्स्थलांतरितांचे प्रमाण खुपच कमी झाले. तथापी आताही भारतातुन बाहेर जाणा—यांची संख्या कमी नाही. परंतु आताचे उत्स्थलांतर हे बुध्दिवंतांचे उत्स्थलांतर आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतात स्थायिक झालेल्या स्थलांतरितांच्या संख्येचा आढावा लक्षात घेता असे निदर्शनास येते की, 1901,1911,1921 व 1931 या चारही जनगणनांच्या वेळी भारतात स्थलांतरित झालेल्या परदेशीय व्यक्तींची संख्या जवळपास 6 ते 7 लाख होती. व त्यांचे लोकसंख्येतील प्रमाण 0.2 टक्के एवढे होते.

तथापि 1951 मध्ये स्थलांतरितांची लोकसंख्या 87 लाख झाली व त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण 2.4 टक्के एवढे झाले. 1951 मध्ये स्थलांतरितांची लोकसंख्या वाढण्याचे एक मुख्य कारण म्हणजे 1947 ची भारत—पाक फाळणी होय. भारत—पाकिस्तान फाळणीच्या वेळी भारतातून पाकिस्तानात व पाकिस्तानातून भारतात स्थलांतर करणा—यांची लोकसंख्या प्रचंड होती. यावेळेस जेवढे लोक भारतातून पाकिस्तानात गेले त्यापेक्षा जास्त लोक पाकिस्तानातून भारतात आले व यामुळेच भारतातील स्थलांतरीतांची लोकसंख्या वाढल्याचे निदर्शनास येते.

1961 मध्ये भारतातील स्थलांतरितांची संख्या 9.5 दशलक्ष होती तर 1971 मध्ये ती 9 दशलक्ष झाली. यापैकी 87 ते 90 टक्के लोक पाकिस्तान व बांगलादेशातील होते.[11]

Gilles Boquerat यांनी, 'Geopolitics of Refugee Flows In India', या संशोधन निबंधात स्वातंत्र्योत्तर भारतातील स्थलांतरितांच्या प्रवाहाचे चिकित्सक विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, भारताने स्वतंत्र झाल्यापासून अवघ्या 50 वर्षांच्या काळात कितीतरी परदेशी लोकांना आपल्या भुमीवर सामावुन घेतले आहे. (In the first fifty years of its existence, independent India has on severel occasions received on its social displaced populations, whether it be a matter of people of Indian origin who have become undesirable in the host country, or indeed foreign communities who have been victims of repressive discriminatory treatment or who have fled a situation endangering the lives of their members. [12])

Department of Rehabilitation, Ministry of Supply and Rehabilitation, Goverment of India, च्या अहवालानुसार, भारतात पूर्व पाकिस्तान (आत्ताचा बांगलादेश) मधून 1946 ते 1984 पर्यंत एकुण 52 लाख, 30 हजार, 958 इतके स्थलांतरीत झाले. याच अहवालात 1971 ला बांगला देशातुन येणा–या निर्वासितांची संख्या 8,276 इतकी दाखविली आहे. यासोबतच 1971 च्या भारत–पाक युध्दात निर्वासित होऊन भारतात आलेल्या बांगलादेशीयांची संख्या 53 हजार इतकी होती असेही दर्शविले आहे.[28] व याच अहवालात पूर्व पाकिस्तानातून म्हणजेच बांगला देशातून आलेल्या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी 1984–85 पर्यंत 676.44 कोटी व बांगलादेशी निर्वासितांसाठी 291.14 कोटि रुपये खर्च केल्याचे दर्शविलेले आहे.[13]

भारत सरकारच्या अहवालानुसार 1946 ते 1984 पर्यंत भारतात बाहेर देशातून 1,06,48,534 लोक स्थलांतरित म्हणुन व 53 हजार लोक हे 1971 च्या भारत–पाक युध्दातील निर्वासीत म्हणुन आलेत. त्यात पाकिस्तानातून– 47 लाख, 40 हजार बांगलादेशातून – 52 लाख, 30 हजार, 958 बर्मा मधून – 2 लाख, 8 हजार, 970 श्रीलंकेतून – 4 लाख, 58 हजार, 368 युगांडा मधून– 5 हजार, 775 झायरे मधून – 110 व्हियतनाम मधून – 2 हजार, 53 मेझांबिकेतून – 2 हजार, 300 होते. याचाच अर्थ 1 कोटी, 6 लाख, 48 हजार, 534 व युध्द निर्वासित म्हणुन 53 हजार असे एकुण 1 कोटी, 7 लाख, 1 हजार, 534 इतके परदेशी नागरिक भारतात होते.[14]

उपरोक्त आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की, भारतात स्वातंत्र्योत्तर काळातील स्थलांतरितांची लोकसंख्या बरीच मोठी होती.

**Refrances:-**


1. Zelinsky, w. - "The hypothesis of the mobility transition", Geographical Review 61 (2), 1971. cited by Mei Lung Young, " Circular mobility and its policy". In United Nations, Third Asian and Pacific Population Conference - selected papers (New York: United Nations, 1984) p.202, Quoted by Francis Cherunilam in his book - "Migration" (causes, correlates, consequences, trends and policies.), Himalayan Publishing House - Bombay 1987. Page No. 6
2. H. C. Upreti, Social Organization of a Migrant group (Bombay: Himalaya publishing House, 1981) p.243 Quoted by Francis Cherunilam - "Migration" (causes, correlates, consequences, trends and policies.), Himalaya Publishing House - Bombay 1987. Page No.6
3. Francis Cherunilam - "Migration" (causes, correlates, consequences, trends and policies.), Himalaya Publishing House - Bombay 1987. Page No.7.
4. Quoted by Sumati Kulkarni and Tara Kanitkar in their book, 'Loksankhyashastra', shri. Vidhya prakashan, Pune-1979. p. 414.
5. Encyclopedia of Britannica. Volume 19 p. 71.
6. United Nations, The Determinants and Consequences of Population trends. Vol. I, ST / SOA / SER. A / 50-1973.p.234. Quoted by, Sau. Tara Kanitkar and Sau. Sumati Kulkarni in their book - Loksankhyashastra, shri. Vidhya prakashan, Pune-1979. p. 414.
7. Quoted by, Saul. Tara Kanitkar and Sau. Sumati Kulkarni in their book - Loksankhyashastra, shri. Vidhya prakashan, Pune-1979. p. 324.
8. Warren S. Thompson and David Lewis, Population problems, 5th ed. New York, McGraw Hill, 1960,pp. 474-501 Quoted by Saul. Tara Kanitkar and Saul. Sumati Kulkarni in their book - Loksankhyashastra, shri. Vidhya prakashan, Pune-1979. p. 414.
9. Kingsley Davis, Population of India and Pakistan, New York, Russell and Russell. 1950, p. 93, p. 97. Quoted by Saul. Tara Kanitkar and Saul. Sumati Kulkarni in their book - "Loksankhyashastra", shri. Vidhya prakashan, Pune-1979. p. 419.
10. Kingsley Davis, "Population of India and Pakistan", New York, Russell and Russell. 1950, p. 94. Quoted by Saul. Tara Kanitkar and Saul. Sumati Kulkarni in their book - " Loksankhyashastra ", shri. Vidhya Prakashan, Pune-1979. p. 420.
11. Ibid. p. 420.
12. Gilles Boquerat - Geopolitics of refugee flows in India ("research paper") published on Internet Website. Www.
13. Handbook on Social Welfare Statistics - 1986. Published by Government of India Ministry of Welfare, New Delhi, p. 101.
14. Ibid. p. 102.

# एकविसाव्या शतकातील विद्यार्थी आणि शिक्षकांकरीता भावनीक बुध्दिमत्तेचे महत्व.

**प्रा. सुनिता राठोड**, गृहअर्थशास्त्र विभाग, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा

व्यक्तीविकासात भावनांना अग्रगण्य स्थान आहे. भावनांच्या जोरावरच मनुष्य अनेक क्रिया करण्यास उद्युक्त होतो. आपल्या मनात विविध भावनांचे खेळ चालू असतात व त्यानुसार आपले व्यक्तीमत्व तयार होत असते. म्हणून योग्य भावना निर्माण करणे, त्यांना वळण लावणे व भावनांची समतोलत्व साधणे हे महत्वांचे कार्य ठरते. ज्याप्रमाणे मुलांचा सामाजीक किंवा शारिरीक विकास हळूहळू विशिष्ट स्वरूप धारण करतो, त्याचप्रमाणे भावनात्मक विकासही वयानुसार व अनुभवानुसार हळूहळू विशिष्ट रूप धारण करू लागतो. लहान मुलांमधिल भावनांचे स्वरूप कसे असते ? त्यांना वळण कसे लावले पाहिजे ? व भावनांचे महत्व काय ? हे पालकांनी तसेच शिक्षकांनी जाणले पाहिजे व मुलांना योग्य वळण लावले पाहिजे.

मुलांचा भावनीक विकास झाल्यास त्यांचे शारिरीक कार्य सुरळीत चालण्यास मदत होतो. शरीरांतर्गत ग्रथींचा स्त्राव योग्य होतो. चांगल्या भावनांचा विकास झालेल्या व्यक्ती उत्साही, खेळकर, आनंदी, धीट, साहसी, चांगले समायोजन झालेल्या आढळून येतात. योग्य भावनीक विकास झालेला विद्यार्थी जिवनामध्ये यशस्वी ठरतो. त्याचप्रमाणे जीवन जगतांना आलेल्या समस्यांना धीटपणे सामोरे जावून त्यातून मार्ग काढू शकतो. स्वतःच्या समस्या सोडविण्यास तो समर्थ ठरतो. अशाप्रकारे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास चांगला होण्याच्या दृष्टीने भावनेला मानवी जीवनात अतिशय महत्वाचे स्थान आहे.

**भावनात्मक बुध्दिमत्ता** :– बुध्दिसंबंधीचा संशोधनात ज्याप्रमाने बुध्दिगुणांक ही संकल्पना मांडण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भावनांच्या बाबतीत भावनेत गुणांकाची संकल्पना काही अमेरीकन मानसशास्त्रज्ञांनी प्रसृत केली आहे. व्यक्तीच्या भावनात्मक बुध्दिमत्तेचे सापेक्ष मापन भावना गुणांक होय. व्यक्ती जेव्हा जन्माला येते तेव्हाच तिची बुध्दिसंबंधी काही सुप्त कार्यशक्ती अस्तीत्वात असते. व्यक्तीला जे अनुभव प्राप्त होतात त्यांच्या आधारे आणि व्यक्तीच्या परीपक्वतेनुसार ही सुप्त शक्ती वाढत जाते. भावनेच्या बाबतीतही असाच काहीसा प्रकार आहे. काही एका प्रमाणात भावनात्मक बुध्दिमत्ता घेऊन व्यक्ती जन्माला आलेली असते. हया भावनात्मक बुध्दिमध्ये व्यक्तीची वेदनक्षमता भावनात्मक स्मृती आणि भावनात्मक संस्कारक्षमता व शिक्षण समता यांचा समावेश होतो. मात्र केवळ बुध्दि आणि भावनात्मक बुध्दी यात एक महत्वाचा फरक आहे. भावनात्मक बुध्दिमत्तेला योग्य अनुभवांची जोड मिळाली तर ही बुध्दिमत्ता वाढीला लागते. आणि उलटप्रकारे जर वातावरणीय अनुभव जर अयोग्यप्रकारचे असतील तर या भावनात्मक बुध्दिमत्तेचा –हास होऊ शकतो सर्व सामान्य बुध्दिमित्तेच्या बाबतीत मात्र जगाच्या कसेही अनुभव आले तरी –हास होत नाही.

मनुष्याच्या भावनात्मक सुप्तशक्तीचे सापेक्ष मापन काही प्रकारच्या चाचण्यांनी होते. हया चाचण्या जीवनविषयक काही परिस्थितींशी संबंधीत असतात. अशा चाचण्यांनी व्यतीच्या भावनात्मक बुध्दिमत्तेचे मापन केले जाऊ शकते आणि भावनात्मक गुणांना त्यातून प्राप्त होतात हया दृष्टीने विचार करता भावनात्मक गुणांक हे भावनात्मक बुध्दिचे एक सापेक्ष माप होय असे म्हणता येईल. हे माप वेळोवेळी परिवर्तनक्षम असू शकते. विपरीत अनुभवांनी भावना गुणांक कमी होउ शकतो तर अनुकूल अनुभव मिळत गेल्यास तो वाढतो.

**भावनात्मक बुध्दिमत्तेची व्याख्या** :– भावनात्मक बुध्दिमत्तेची संकल्पना सर्वप्रथम डॉ. जॉन मायर आणि डॉ. पीटर सलोव्हे हयांनी इ.स.1990 मध्ये प्रचलित केली. भावनांच्या बाबतीत लोकांच्या क्षमतेत जी भिन्नता आढळून येते. त्या भिन्नत्तेचे शास्त्रीय मापन करण्याच्या संबंधात ही संकल्पना त्यांनी प्रथम अस्तित्वात आणली. मात्र ही संकल्पना लोकप्रिय करण्याच्या कामी डॅनियल गोलमन यांचे कार्य अधिक महत्वाचे ठरते.

जॉन मायर आणि पीटर सलोव्हे हयांनी 1995 मध्ये भावनात्मक बुध्दिमत्तेची व्याख्या पुढील प्रमाणे केली : 'जीवनविषयक चार वेगवेगळया क्षेत्रात भावनेचे तार्किक परीक्षण करणे म्हणजे भावनात्मक बुध्दिमत्ता होय. ही चार क्षेत्रे म्हणजे भावनेचे संवेधन, विचाराशी त्या भावनेचे एकात्मीकरण, भावनेचे स्वरूप समजून घेणे, आणि व्यवस्थापन ही होय.' भावना हाताळण्यासंबंधी प्रत्येक मानसाची योग्यता आणि सुप्त शक्ती वेगवेगळी असते. हया योग्यतेच्या स्वरूपावर आपली भावनात्मक बुध्दिमत्ता उच्च दर्जाची आहे की कमकुवत आहे हे आपल्याला समजुन येते. अर्थात हे सापेक्ष माप असल्यामुळे आपल्या

समाजातील अन्य लोकांशी तुलना करून भावनात्मक बुध्दिमत्तेचा स्तर ठरविला जातो.

भावनांच्या दृष्टीने एखादी व्यक्ती बुध्दिमान आहे असे म्हणता येण्यासाठी खालील कसोटया आवश्यक आहे :

(1) इतर व्यक्तीच्या चेह—यावरून, शरीरस्थितीवरून त्यांच्या भावना ओळखणे, त्यांच्या चेह—यावरून त्यांच्या मनातील भाव ओळखता येणे.

(2) स्वतःच्या भावभावनांचा निकटपणे अंदाज घेता येणे.

(3) स्वतःच्या जाणवलेल्या भावनांचे विचारांमध्ये समावेशन करता येणे. हयाचा अर्थ असा की स्वतःच्या भावनांचा उपयोग वैचारीक विश्लेषण, समस्या समाधान, आणि निर्णय घेणे यासाठी व्यक्तीला करता आला पाहीजे.

(4) आपल्या भावनांचे स्वरूप, त्यांची तिव्रता आणि संभाव्य परीणाम हयांचे निट आकलन होणे.

(5) भावनांच्या प्रकटीकरणावर सुयोग्य नियंत्रण आणि नियमन करता येणे. हयाचा अर्थ असा की स्वतःच्या संबंधात किंवा अन्य व्यक्तींच्या संबंधात भावनांचा उपयोग अशा रीतीने करता आला पाहीजे की जेणे करून सुसंवाद आणि शांतता प्रस्थापित होऊ शकेल. थोडक्यात असे म्हणता येईल की व्यक्तीला भावनांचा विधायक उपयोग करता आला पाहीजे.

भावनात्मकदृष्टया बुध्दिमान समजल्या जाण्यासाठी व्यक्तीला चार गोष्टींबद्दल दक्षता बाळगावी लागते.

(1) भावनांची जाणीव,

(2) त्यांचे स्वीकरण,

(3) भावनासंबंधी सुयोग्य अभिवृत्ती

(4) भावनांना अनुसरून क्रियाशीलता,

जाणीव म्हणजे जेव्हा तुमच्या मनात भावना उद्‌भवतात तेव्हा आपल्याला नक्की कोणत्या भावनांचा अनुभव येत आहे हे ओळखणे. स्वीकरणे म्हणजे असा ठाम विश्वास बाळगणे की भावना म्हणजे शरिरांतर्गत ज्या जैव प्रक्रिया होतात त्यांच्यातून उत्पन्न झालेल्या असतात आणि त्या नेहमीच तर्काला अनुसरून असतात असे नाही. अभिवृतीचा संबंध भावनेला कोणता अर्थ दिला जातो हयांच्याशी असतो. पुष्कळदा आपल्या जीवनात अभिवृतींनी आपल्या भावनांना वेगळा रंग चढतो हयाची जाणीव असणे. म्हणजे अभिवृती बदलल्या शिवाय भावनांचा प्रभाव तसाच कायम राहील आणी तो प्रभाव एकाच दिशेने जाणवत राहील. क्रियाशीलता म्हणजे भावना आणी अभिवृतींच्या आधारे घडणारे प्रत्यक्ष वर्तन होय.

वर जे निवेदन करण्यात आलेले आहे त्यातून असे सूचवीण्यात आलेले आहे की प्रथमतः व्यक्तीला स्वतःच्या आणि इतरांच्या भावनांची चांगली जानकारी असली पाहीजे आणी त्याला हयाही गोष्टीचे आकलन झाले पाहीजे भावनात्मक वर्तन पुष्कळदा तर्काला सोडून घडत असते आणी त्यामुळे भावनांत्मक वर्तन करण्यापूर्वी व्यक्तीने चांगली दक्षता बाळगायला हवी. दूसरी गोष्ट अशी की भावनांचा यथायोग्य उपयोग करता येण्यासाठी व्यक्तीने भावनांच्या बाबतीत विवेक बाळगावा आणी योग्य ती अभिवृती धारण करावी. भावनांत्मक वर्तनातून स्वतःमध्ये आणी इतरांमध्ये एक प्रकारचे सामंजस्य प्रस्थापीत होईल अशा प्रकारचे वर्तन घडावे.

वरील सर्व विचारांचे तात्पर्य असे की भावनांत्मक बुध्दीमत्ता ही एक अशी योग्यता आहे की जीचा उपयोग भावनांचे स्वरूप ओळखण्यासाठी भावनांच्या अस्तीवाची जाणीव होण्यासाठी आणि भावनावीषयक सुयोग्य निर्णय करण्यासाठी होऊ शकेल सुयोग्य उपयोग तेव्हाच म्हणता येईल की जेव्हा वैचारीक प्रक्रियेशी भावनांत्मक प्रक्रीयेचा सहयोग प्रस्तापित होऊन सर्वांच्या सुखासाठी तिचा उपयोग केला जाईल.

**भावनात्मक बुध्दीमत्तेचे महत्व** :— भावनात्मक बुध्दिमत्तेची किंवा भावना गुणांकाची माहिती असणे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया महत्वाचे ठरते. वैयक्तिक आणि सामाजिक जीवन सुखपूर्ण असण्यासाठी ही गोष्ट महत्वाची आहे. भावना गुणांकाचे महत्व सर्व समाजांना पटलेले आहे. आणि त्याचा व्यावहारीक उपयोगही आज करण्यात येऊ लागला आहे. आणि भावनात्मक बुध्दिमत्तेचे महत्व लोकांच्या नजरेस आणून दिले आहे. डॅनियल गोलमनने पुढील गोष्टींवर जोर दिला आहे.

1) आतापर्यंत बुध्दिगुणांक संकल्पनेला बहुतेक सर्व क्षेत्रात महत्व देण्यात येत होते परंतु जीवनात यश संपादन करण्यासाठी बुध्दिगुणांकाचा जवळपास शेकडा वीस प्रमाणात कार्यभाग असतो. भावनात्मक बुध्दिमत्ता मात्र बुध्दिगुणांकापेक्षा अधिक महत्वाची सिध्द झालेली आहे. यश संपदन करण्यासाठी भावना गुणांकाचा महत्वाचा वाटा असतो.

2) आयुष्यात यश संपादन करण्यासाठी बुध्दिगुणांकापेक्षा भावनागुणांकाचे अधिक महत्व असते इतकेच नव्हे तर यशाचे सर्वोत्कृष्ट गमक म्हणजे भावनागुणांक होय. ज्या व्यक्ती भावनात्मक दृष्टया अधिक बुध्दिमान असतात त्यांना स्वतःच्या अंगीकृत कार्यात सफलता मिळण्याची शक्यता पुष्कळच जास्त असते.

3) बुध्दिगुणांक सहसा दोनचार अंकांच्या पलीकडे कमीजास्त होत नाही. परंतु भावनागुणांक मात्र योग्य ते शिक्षण देऊन वाढविता येतो. लहान वयातच मुलांना योग्य

शिक्षण देण्याचे त्यांची बौध्दिक परिपक्वता आणि त्यामुळे बुध्दिगुणांक वाढू शकतो. भावनागुणांकाच्या वाढीने मुलाचे किंवा कोणत्याही व्यक्तीचे कार्यकौशल्य वाढीला लागते. आणि त्यामुळे त्यांचे जीवन अधिक सुदृढ, आणि सुखपूर्ण होऊ शकते.

4) भावनागुणांकाची संकल्पना केवळ नवीन आहे म्हणून स्वीकारली जावी असे नाही. तर ही कल्पना आपणा सर्वांच्या दृष्टीने महत्वाची सिध्द झालेली आहे आणि म्हणून तिचा स्वीकार केला जाणे अगत्याचे आहे. आपले जीवन अधिक सुखपूर्ण आणि विधायक होत जाण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यांचे मुख्य मर्म म्हणजे भावनागुणांक होय.

5) बुध्दिगुणांकाच्या आणि तसेच उपलब्धी मापनाच्या वेगवेगळया कसोटयांनी व्यक्तीच्या जीवनातील यशाचे पूर्वकथन होतेच असे नाही. केवळ इतकेच नव्हे तर भावनात्मक जीवनातील यशाचे पूर्वकथन भावनात्मक बुध्दिमत्तेला अधिक चांगल्या रीतीने केले जाऊ शकते. भावनात्मक बुध्दिमत्ता या दृष्टीने अधिक महत्वाची ठरते.

6) कार्यसंबंधी परिस्थितींमध्ये देखील व्यक्तीच्या बौध्दिक सामर्थ्यापेक्षा किंवा बुध्दिगुणांकापेक्षा भावनात्मक बुध्दिमत्ता अशासाठी अधिक सहाय्यक ठरते. व्यावसायीक कौशल्ये आणि सक्षमतेपेक्षा देखील भावनागुणांक यशासाठी अधिक महत्वाचे ठरतात. समजा एखादी व्यक्ती व्यावसायिक दृष्टया अत्यंत सक्षम असली तरी जर त्या व्यक्तीची भावनात्मक बुध्दिमत्ता निकृष्ट दर्जाची असेल तर ती व्यक्ती इतरांशी योग्य संबंध ठेवण्याच्या दृष्टीने अपयशी ठरेल आणि त्यातून व्यक्तीची व्यावसायिक सफलता देखील धोक्यात येऊ शकेल.

7) भावनात्मक बुध्दिमत्ता व्यक्तीला सर्व क्षेत्रात यश संपादन करण्यासाठीही सहाय्य ठरते. भावनात्मक बुध्दिचे वर जे घटक सांगण्यात आलेले ओहेत त्या घटकांच्या मदतीने मनुष्य कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो. कारण भावनात्मक बुध्दिमत्ता ज्या व्यक्तीमध्ये अधिक असते ती व्यक्ती अन्य व्यक्तींशी अधिक चांगले संबंध सांभाळू शकते आणि त्यामुळे त्या व्यक्तीला योग्य ती सफलता प्राप्त होऊ शकते.

डॅनियल गोलमनने वर जो दृष्टिकोन मांडला आहे त्याचे बरेच व्यापक परिणाम घडून आलेले आहेत. मुलांचे संगोपन, कौटुंबिक संबंध, शालेय वातावरण, आणि व्यावसायिक कार्याचे व्यवस्थापन या सर्व बाबतीत आजच्या दृष्टिकोनात बराच फरक पडलेला आहे. भावनात्मक बुध्दिमत्तेचे महत्व सर्व क्षेत्रात आज वाढीला लागले आहे. याखेरीज शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यविषयक कार्यक्रमांमध्ये आणि त्याचप्रमाणे व्यक्तींना मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात भावनात्मक बुध्दिमत्तेचे योगदान महत्वाचे ठरले आहे. व्यक्तीच्या भावनात्मक घडणीचा तिच्या जीवनावर, प्रगतीवर आणि सामाजिक समायोजनेवर अत्यंत महत्वाचा प्रभाव पडतो. अन्य व्यक्तींशी चांगले संबंध ठेवता येणे आणि स्वतःच्या भावनांचा योग्य त्या रीतीनेच उपयोग करता येणे हे भावनात्मक बुध्दिमत्तेचे महत्वाचे गमक होय. व्यक्तीच्या सर्वांगीण यशासाठी ही संकल्पना फार महत्वाची ठरली आहे. जीवनात अनेक प्रकारच्या समस्या पुन्हा पुन्हा उद्‌भवतच असतात. कौटुंबिक समस्या कुटुंबात सर्वांनाच जाणवतात. आणि त्याचप्रमाणे व्यक्ती ज्या कार्यक्षेत्रात असेल तिथेही ब—याचशा समस्या उद्‌भवतात. काही समस्या प्रादेशिक असतात तर काही समस्या आंतराष्ट्रीय स्वरुपाच्या असतात. या सर्व समस्यांचे मूळ संबंधित व्यक्तींच्या किंवा समूहांच्या किंवा समाज आणि राष्ट्रांच्या संबंधात चुकीच्या भावभावना आणि स्थिरवृत्तींमधून उद्‌भवलेल्या असतात. भावनांच्या प्रशिक्षणाचे योग्य ते प्रयत्न जर सुरवातीपासूनच केले आणि भावनात्मक बुध्दिमत्तेच्या सुप्त शक्तीचा विकास लोकांच्या मनात घडवून आणला तर त्यातून लोकांमध्ये सामंजस्य उत्पन्न होऊ शकेल आणि त्यातून अनाठायी भावलनोद्रेकाचे प्रसंग आपोआप टळतील. भावनांच्या प्रशिक्षणामुळे लोकांची आकलनशक्ती वाढून त्यांच्या ह्रदयात तदनुभूतीचा विकास होऊ शकेल. आणि त्यामुळे त्या व्यक्तींकडून उचित यप्रकारचेच वर्तन घडून येईल.

स्वतःची प्रगती साध्य करणे आणि इतरांची प्रगती होऊ देणे, आपले जीवन व्यवस्थितपणे जगणे आणि दुस—यांना सुखसमाधानाने जगु देणे, हीच शिक्षणाची मूळ उद्दीष्टे असतात. हयासाठी भावनात्मक बुध्दिमत्तेच्या सुप्त शक्तींचा विकास घडवून आणणे अगत्याचे आहे.

**संदर्भ सूची** :

1. बालविकास — डॉ. नलिनी वराडपांडे
2. मानव विकास — सौ. लिना कांडलकर
3.शैक्षणिक मानसशास्त्र — र. वि. पंडित.

# सामाजिक जाणिव : एक समाजशास्त्रीय संकल्पना

**डॉ. नलीनी बोरकर – भगत,** समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पे. पं. जवाहरनगर, जि. भंडारा.

'Consciousness' म्हणजे 'जाणीव', हा शब्द व्यवहारात वेगवेगळया अर्थाने वापरला जातो. Consciousnness हा शब्द मुळात लॅटीन भाषेतील आहे. ज्याचा अर्थ, (knowing things together) म्हणजेच 'अनेक गोष्टींना एकत्र करून माहित करून घेणे' असा होतो.[1] Consciousness या शब्दाचा सर्वप्रथम उपयोग फ्रान्सीस बेकन (1601) यांनी केला. त्यानंतर जॉन लॉक (1690) यांनी हा शब्द प्रचलित केला.[2] जॉन लॉक यांनी आपल्या "Essay Concerning Human Understanding" या ग्रंथात सर्वप्रथम हा शब्द वापरला.[3] जॉन लॉक च्या मते, 'जाणिवे व्दाराच व्यक्तीची एकरूपता किंवा व्यक्तीच्या एकतेची निर्मिती होते, कारण जाणीवच ती वस्तू आहे जी क्रियांना एका व्यक्तीत संघटीत करीत असते.'[4] 'Consciousness' हा शब्द समाजशास्त्र व मानसशास्त्रात 'एखाद्या गोष्टीविषयी माहित करून घेणे' किंवा 'एखाद्या गोष्टीची जाणीव असणे' या अर्थाने वापरला जातो.

'जाणीव' म्हणजे मानवी बुध्दीचा असा भाग जो 'स्व' ची जाणीव करून देतो. समाजशास्त्रात प्रामुख्याने 'जाणीव' ही संकल्पना निश्चितपणे परंतू प्रथमतः म्हणता येणार नाही अशाप्रकारे मार्क्सवाद्यांनी वापरली. समाज संरचनेतील विशिष्ट वर्गाच्या स्थितीची जाणीव स्पष्ट करण्यासाठी ही संकल्पना त्यांनी वापरली. पर्यावरणाशी संबंधीत ठिकाणाची माहिती करून झोणे आणि व्यक्तीच्या मेंदुअंतर्गत चाललेल्या क्रिया व एकूणच सृष्टीविषयीचे ज्ञान असणे असा ही जाणिवेचो अर्थ केला जातो. (Consciousness means that part of the human mind which is self-aware. In sociology, consciousness is used particularly, but not exclusively, by Marxists to indicate the individual's awareness of their position in the social structure of society. Consciousness also extends to awareness of place within the environment and with the internal workings of the individual's own mind. it is thus our knowledge about the world.)[5]

व्यावहारिक मराठी शब्दकोशानुसार, 'जाणीव म्हणजे आपल्या अवती भोवती घडणा–या गोष्टींचे भान, चेतना किंवा संवेदना होय.'[6]

उच्चत्तर समाजशास्त्रीय विश्वकोषानूसार, 'संवेदनशिलतेच्या एका विशिष्ट गुणाला किंवा लक्षणाला जाणीव असे म्हणतात.'[7]

जाणीव आणि संवेदनशिल क्रियांना वास्तविकतः एकाच घटनेच्या दोन बाजू म्हणता येईल. संवेदनशिल क्रियांव्दारा एका निश्चित प्रमाणात जटिलता प्राप्त करणे हा जाणिवेचा अनुभव आहे. जाणीव ही संकल्पना रैने देकार्ते (Raine Dekarte, 1596-1650) यांच्या काळापासून आधुनिक तत्वज्ञानाच्या अध्ययनाचा एक प्रमुख विषय राहिला आहे. देकार्ते चा हा विचार की, 'मी विचार करतो', म्हणजे 'मी आहे' ने जाणीव या संकल्पनेच्या विकासाला मदत केली. या विचाराने दार्शनिक गुरूत्वाच्या केंद्राला ब्रम्हांडापासून व्यक्ती, मानवप्राणी आणि त्या शक्तींना तिकडे वळविले की, ज्या मानवी व्यवहारांना नियंत्रित करतात. हया शक्ती मानवी प्राण्यात अधिकाधिक प्रमाणात असतात.[8]

'मी विचार करतो, म्हणून मी आहे'. रेने देकार्तेच्या तत्वज्ञानातील हे एक मौलिक विधान आहे. आधुनिक तत्वज्ञानाचा जनक मानण्यात आलेल्या देकार्तेने गणिती पध्दती तत्वज्ञानाला लागू करून तत्वज्ञानामध्ये एक प्रकारची क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तत्वज्ञानाकडे नव्या दृष्टीकोनातून पाहण्याचा त्याचा आग्रह होता. त्यासाठी त्याने जी पध्दती अनुसरली, ती 'सर्वस्पर्शी संशय पध्दती' म्हणून प्रचलित आहे. तत्वज्ञानाची नव्याने उभारणी करण्यासाठी त्याला असे मूलाधार हवे होते की, ज्याच्याबदद्ल संशय घेण्यास जागाच राहणार नाही. देकार्तेने आजपर्यंतच्या सर्व कल्पना, सर्व ज्ञान यांच्या विषयी संशय घेण्यास प्रारंभ केला. संशयाची ही रीत संशयीत ज्ञान प्राप्त होईपर्यंत सुरू ठेवली. इंद्रियाव्दारे प्राप्त होणा–या ज्ञानाच्या संशयापासून सर्व प्रकारच्या ज्ञानाबाबत संशय घेत–घेत शेवटी तो स्वतःपर्यत पोहचतो. स्वतःच्या अस्तित्वाविषयीच संशय घेवू लागतो. स्वतःच्या अस्तित्वाविषयी संशय घेताक्षणीच त्याला संशयीत ज्ञान होते. 'मी संशय घेतो, मी विचार करतो म्हणून मी आहे' असे त्याला जाणवते. अस्तित्वच नसेल तर विचार करण्याचा प्रश्नच येत नाही. असे त्याला वाटते. यावरूनच देकार्तने 'Cogito ergo sum' 'मी विचार करतो, म्हणून मी आहे' हे प्रसिध्द विधान मांडले.[9]

जॉन लॉक (John Lock 1632-1704) यांनी, 'जाणीव' हा शब्द व्यक्तीच्या स्वतःच्या मेंदूत जे काही होते, ज्या काही उलथापालथी होतात त्याचा 'बोध', या अर्थाने वापरला आहे. आधुनिक काळात मानवी व्यवहार, समाज, भाषा आणि ज्ञानाला समजण्यासाठी 'जाणिवेला' एक आधारभूत तत्व मानले जाते.[10]

सामाजिक विज्ञानांमधील संज्ञा–सिध्दांताचा स्पष्टीकरणात्मक कोशानूसार, 'स्वतःच्या मानसिक प्रक्रियांची जाणीव होणे किंवा ही जाणीव असण्याची अवस्था म्हणजे बोधावस्था किंवा जाणिवेची अवस्था होय.' असे म्हटले आहे.[11] या कोशानूसार, स्वतःच्या वेदना–संवेदना, विचार, भाव–भावना नाकारता येत नाही. पण त्यांची जाणीव करून घेणे, त्यांच्याबदद्ल सजग राहणे, त्यांचा अभ्यास करणे ही अतिशय अवघड बाब असते. या संज्ञेच्या संदर्भात मोठा प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे बोधावस्थेचे म्हणजेच जाणिवेचे काही विशिष्ट कार्य आहे, की वर्तनवादी मानतात त्याप्रमाणे वर्तनाची ही एक अनुषांगिक निर्मिती आहे. संरचनावादी मानसशास्त्रज्ञ बोधावस्थेवर एक मध्यवर्ती, मौलिक संकल्पना म्हणून लक्ष केंद्रित करतात तर शारीरिक हालचालीची एक त्याज्य निर्मिती मानून बोधावस्थेला मानसशास्त्रांच्या प्रांतातून काढून टाकतात. वैज्ञानिक मानसशास्त्रात आज बोधावस्थेच्या म्हणजेच जाणिवेच्या अभ्यासाला नव्याने प्रारंभ झाला आहे.

हिंदी विश्वकोषानूसार, 'जाणीव' ही सजीवामधील असे तत्व आहे जे त्यांना निर्जिव पदार्थापासून वेगळे करते.[12] दुस–या शब्दात आपण त्याला मानवाच्या जीवनक्रमाला चालविणारे तत्व म्हणू शकतो. जाणीव स्वतःला आणि आपल्या सभोवतालच्या वातावरणाला समजण्याची व त्याचे मूल्यमापन करण्याची शक्ती होय.

विज्ञानानूसार 'जाणीव' म्हणजे ती अनुभूती होय जी मेंदूपर्यंत पोहचणा–या सकारात्मक आवेगांपासून उत्पन्न होत असते. या आवेगांचा अर्थ ताबडतोब किंवा नंतरही लावला जातो.[13]

(According to Encyclopeaidia of Americana, "The term consciousness has been used with a varity of meanings. The two more technical applications are as follows; 1. A person is conscious as long as his mental processes are going on, and he is unconscious. When these feelings, ideas, thoughts, desires and the like are suspended. In this sense, consciousness has the same meaning as experience and awareness. 2. Consciousness also denotes a person's awareness of his mental processes. By introspection, he can have some knowledge of what he is sensing, thinking, and feeling.)[14]

Encyclopeaidia of Americana, नुसार, जाणीव ही संकल्पना विविध अर्थाने वापरली जाते.

1. एखादी व्यक्ती तोपर्यंत जागृत असते, जोपर्यंत त्याच्या मानसिक क्रिया सुरू असतात. आणि जेंव्हा त्याच्या भावना, कल्पना, विचार, इच्छा या मानसिक क्रिया बंद पडतात तेंव्हा तो अचेत असतो किंवा जागृत नसतो. या अर्थाने जाणीव म्हणजे अनुभव आणि जागृतता होय.

2.जाणीव एखाद्या व्यक्तीमधील मानसिक क्रियेविषयीची जागृती होय. आंर्तक्रियेव्दारे त्याला सुध्दा काही ज्ञान असते की, तो काय अनुभवतो, जाणवून झोतो, विचार करतो आणि काय संवेदना देतो.

लेईबनीजीयन (Leibnizian) यांनी 'Definition Of Consciousness' या संशोधन निबंधात 'जाणिवेची' व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, 'व्यक्तीचे जाणीवपूर्वक होणारे वर्तन हे मृत व्यक्ती किंवा प्राण्याच्या तुलनेत सर्वसामान्य जागृत व्यक्ती सारखे असते. (Leibnizian - Conscious behavior is that more similar to average awake people than dead people or animals or computers etc.)[15]

याच शोधनिबंधात पियर्स ॲन्थोनी यांनी असे म्हटले आहे की, 'जाणीव म्हणजे स्वतःविषयी किंवा स्वतःला जी माहिती असते त्याचे प्रतिभरण होय. त्यांच्या मते स्वजाणीवेशिवाय जाणीव येत नाही. (Piers Anthony - Consciousness is the feedback of self-awareness. So without self-awareness, you don't have consciousness.)[16]

**जाणिवेचे स्थान** :– प्राचीन काळापासून प्रमस्तिष्क प्रांतस्था (cerebral cortex) प्रमुख मेंदूचा बाहय भाग जाणिवेचे मुख्य इंद्रिय किंवा प्रमुख स्थान मानले जाते. यातही कपाळाच्या पूर्वक्षेत्राला विशेष महत्व दिलेले आहे. परंतू पेनफील्ड आणि यास्पर्स हे विचारवंत जाणिवेला एका नविनच पध्दतीने समजावतात. त्यांच्या मते जाणिवेचे स्थान चेतक (thalamus), अर्धचेतक (hypothalamus) आणि मेंदूच्या वरील भागाच्या आसपास आहे. हे विचारवंत मेंदूच्या या भागांना आणि त्यांच्या संयुक्त स्नांयुच्या संघटनास सर्वोच्च स्तरावर मानतात.[17] पूर्वललाट क्षेत्र व अर्धचेतक दोन्हींच्या मध्ये बर्हिगामी नसांव्दारे संयोजन आहे. संयोजन प्रत्यक्ष किंवा परोक्ष आहे. परोक्ष संयोजन पृष्ठ केंद्रकाव्दारे होत असते.

जाणीव हे मानवांचे असे वैशिष्टय आहे जे त्याला जिवंत ठेवते आणि जे त्याला व्यक्तीगत स्वरूपाचे आणि आपल्या सभोवतालच्या वातावरणाचे ज्ञान करून देते. या ज्ञानालाच विचारशक्ती (बुध्दी) म्हटले जाते. हेच वैशिष्टय मानवांच्या संदर्भात असे कार्य करते की ज्यामुळे तो सजीव प्राणी समजला जातो. मानवप्राणी कोणतीच शारीरिक क्रिया तोपर्यंत करू शकत नाही जोपर्यंत त्याला हे ज्ञान असत नाही की तो ती क्रिया करू शकतो. कोणताही मनुष्य कोणत्याही विघातक घटनेपासून अथवा

पदार्थापासून वाचण्यासाठी तो आपल्या शरीराच्या अवयवाला तोपर्यंत हलवित नाही जोपर्यंत त्याला हे माहित होत नाही की एखादा घातक पदार्थ त्याच्या समोर आहे आणि त्यापासून वाचण्यासाठी तो आपल्या शरीराच्या अवयवांना कामाला लावू शकतो. उदा. आपण एका अशा व्यक्ती बदद्ल विचार करू की, जो नदी कडे जातो आहे. जर तो चालत चालत नदीजवळ पोहचला आणि नदीत घुसला तर तो बुडून मरून जाईल. तो आपले चालणे तोपर्यंत थांबवीत नाही आणि नदीत घुसण्यापासून स्वतःला तोपर्यंत वाचवू शकत नाही जोपर्यंत की त्याच्या जाणिवेत हे ज्ञान उत्पन्न होत नाही की त्याच्या समोर नदी आहे आणि तो जमीनीवर तर चालू शकतो पण पाण्यावर मात्र चालू शकत नाही.

मानवाच्या प्रत्येक क्रियेवर वरिल नियम लागू होत असतो. जरी यापैकी काही क्रिया पूर्वी कधीतरी झाल्या असोत वा भविष्यात घडणार असोत. मानव केवळ जाणिवेपासून उत्पन्न होणा–या प्रेरणांच्यामुळे कोणतेही काम करू शकतो.

जाणीव आणि मानवाचे चरित्र यात मौल्यवान असा संबध आहेत. जाणीव तो विशेष गुण आहे जो मानवास जीवंत व सजीव बनवितो आणि त्याचे चरित्र त्याचे असे संपूर्ण संघटन आहे ज्याव्दारा त्याच्या जीवंत असण्याची वास्तविकतः व्यक्त होत असते व ज्याव्दारा जीवनाचे विविध कार्य निरंतर सुरू राहते.[18]

एखाद्या व्यक्तीची जाणीव आणि त्याचे चरित्र केवळ त्याचीच व्यक्तीगत संपत्ती नसते. हे ब–याच दिवसापासून सुरू असलेल्या सामाजिक प्रक्रियांचे परिणाम असतात. प्रत्येक व्यक्ती आपला वंशानुक्रमास स्वतःमध्ये प्रस्तुत करित असतो. तो विशेष प्रकारचे संस्कार पैतृक संपत्तीच्या रूपात मिळवितो. तो इतिहासालासुध्दा स्वतःमध्ये निरूपीत करित असतो कारण त्याने विविध प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण जीवनात प्राप्त केलेले असते. या व्यतीरिक्तही तो दुस–या लोकांनाही आपल्या व्दारा निरूपीत करित असतो कारण त्यांचा प्रभाव त्याच्या जीवनावर त्यांची उदाहरणे, उपदेश आणि अनुभवाव्दारा पडत असतो.

जेंव्हा मानवाची जाणीव एकदा विकसित होत असते तेंव्हा त्याची नैसर्गिक स्वतंत्रता नष्ट होते. तो या अवस्थेतही विविध प्रेरणा आणि आंतरिय प्रवृत्तीपासून प्रेरीत होत असतो परंतू तो त्यांना स्वतंत्रपणे प्रकट करू शकत नाही. तो एकतर त्यांना कायमचे दाबून टाकतो ज्यामुळे समाजातील दुस–या लोकांच्या आवश्यकता आणि इच्छांच्या वाटेत त्या बाधक बनू नयेत किंवा त्यांना असे लपेटले जाते किंवा कृत्रिम बनविले जाते ज्यामध्ये त्यांचे प्रकटन समाजविरोधी होवू शकत नाही.

अशाप्रकारे मानवाचे जाणीव अथवा विवेक असलेले मन त्याच्या जाणीव विरहीत किंवा नैसर्गिक मनावर आपले नियंत्रण ठेवत असते. मानव आणि पशू यांच्यात हाच महत्वाचा फरक आहे. पशुंच्या जीवनात अशाप्रकारचे नियंत्रण राहत नाही म्हणून ते जसे वाटेल तसे वागतात. मानव जाणीवपूर्वक वागणारा प्राणी आहे म्हणूनच कोणतीही क्रिया करण्याआधी तो तिच्या परिणामांच्या बाबतीत चांगल्या प्रकारे विचार करून ठेवतो.

मनोवैज्ञानिक दृष्टिकोणातून 'जाणीव' मानवात उपस्थित असे तत्व आहे ज्यामुळे त्याला सर्व प्रकारची अनुभूती होत असते. जाणिवांमूळेच आपण पाहतो, ऐकतो, समजतो आणि अनेक विषयांवर चिंतन करतो. यामुळेच आम्हाला सुख–दुःखाची अनुभूती होत असते आणि आम्ही यामुळेच अनेक प्रकारचे निश्चय करतो व अनेक वस्तूंच्या प्राप्तीकरिता प्रयत्न सुध्दा करीत असतो.[19]

**जाणिवेची वैशिष्टये** :– मानवी जाणिवेची तीन वैशिष्टये आहेत.

1. ज्ञानात्मक,
2. भावात्मक
3. क्रियात्मक.

भारतीय तत्ववेत्यांनी याला सच्चिदानंद स्वरूप असे म्हटले आहे. आधुनिक मनोवैज्ञानिकांव्दारे याची पुष्टी होते. जाणीव ते तत्व आहे ज्यात ज्ञानाची, भावाची आणि व्यक्तीच्या क्रियाशिलतेची अनुभूती असते. जेंव्हा आपण एखाद्या पदार्थाला जाणतो, तेंव्हा त्याच्या स्वरूपाचे ज्ञान आपल्याला होत असते. त्या पदार्थाप्रती आपली आवड–निवड विषयक भाव निर्माण होतात आणि त्याच्याप्रती इच्छा निर्माण होत असते ज्यामुळे एकतर त्या पदार्थाला आपण जवळ करतो किंवा दूर लोटत असतो.[20]

जाणिवेला तत्वज्ञानात 'स्वंयप्रकाशतत्व' मानले गेले आहे. मनोविज्ञान अजूनही जाणिवेच्या संबधात पुढे गेलेले नाही. जाणीवच सर्व पदार्थांना जड–चेतन, शरीर–मन, निर्जिव–सजिव, मेंदू–स्नायू सर्वांना बनवत असते. त्यांचे स्वरूप निश्चित करते. त्यामुळे यांच्या व्दारा जाणिवेला समजणे अश्यकच असते.

मॅकडूगल या विचारवंताच्या मते, ज्याप्रकारे भोतिक विज्ञानाचे विचार करण्याची पध्दती व विशिष्ट प्रकारचे नियम आहेत तसेच जाणिवेच्या विषयी चिंतन करण्याच्या वेगळया पध्दती व नियम आहेत.[21]

एकूण काय तर जाणिवेविषयी भौतिक विज्ञानाच्या पध्दतीप्रमाणे विचार करता येत नाही किंवा त्याचे नियमही

इथे कामी पडत नाही. भौतिक विज्ञान स्वतःही आपल्या अंतिम घटकासंबधी व त्याच्या स्वरूपासंबधी निश्चित मत प्रकाशित करू शकले नाही, जे विज्ञानाचे आधार आहेत. पदार्थ, शक्ती, गती इत्यादींच्या विषयी आतापर्यंत कामापूरते ज्ञान प्राप्त करता आले आहे. अजूनही त्यांच्या स्वरूपाबाबत अंतिम निर्णय झाला नाही. म्हणजेच जाणिवेच्या संदर्भात अंतिम निर्णयाची आशा करणे युक्तीसंगत ठरणार नाही. जाणिवेला किंवा चेतनेला अचेतन तत्वासोबत समजणे अर्थात त्यांच्यात कार्यकारण संबध जोडणे सर्वथा अविवेकपूर्ण आहे.

जाणिवेला ज्या मनोवैज्ञानिकांनी जड् पदार्थाच्या कियांच्या परिणामाच्या रूपात समजाविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात ज्यांनी तिला शारीरिक कियांचा, स्नांयुच्या स्पंदनाचा परिणाम आहे असे मानले, त्यांनी जाणिवेच्या उपस्थितीलाच समाप्त केले आहे. पैवलाफ आणि वाटसन या विचारवंताच्या चिंतनाचा हाच परिणाम झाला आहे. त्यांच्या मते, मन किंवा जाणिवेच्या संदर्भात मानसशास्त्रात विचार करणेच व्यर्थ आहे. त्यांच्या मते, मानसशास्त्राचा अभ्यास विषय मानवाचे दृश्य वर्तन हेच असायला पाहीजे.

जाणिवेचे शरीराशी असलेले संबध या विषयावर मानसशास्त्रज्ञात वेगवेगळी मते आढळतात. काहींच्या मते, 'मानवाच्या मोठया मेंदूतील होणा—या किया म्हणजेच काही नसांच्या (नाडी) स्पंदनांचा परिणाम म्हणजे जाणीव होय.' तर काही मानसशास्त्रज्ञांच्या मते, 'जाणीव एक स्वंय तत्व आहे आणि त्याचा शरिराशी आपसात संबध आहे.'[22]

म्हणजेच जाणिवेमध्ये होणा—या किया शरीरास प्रभावित करतात. कधी—कधी जाणिवेच्या कियामुळे शरीर प्रभावीत होत नाही. एका मतानूसार, शरीर जाणिवेचे कार्य करण्याचे एक यंत्र मात्र आहे, ज्याला ती कधी उपयोगात आणते व कधी उपयोगात आणतही नाही. परंतू जर हे यंत्र बिघडले तर जाणीव आपल्या कामात अपंग होत असते. काही चिकित्सक मानसशास्त्रज्ञांच्या मते, विज्ञानाच्या वर्तमान प्रगतीच्या अवस्थेमध्ये वरील मतच सर्वोत्तम मानले गेले आहे.

**जाणिवेचे स्तर** :— जाणिवेचे तीन स्तर मानले गेले आहेत. 1. चेतन, 2. अर्धचेतन आणि 3. अचेतन.[23]

1. **चेतन** (Consious):- चेतन स्तरावर त्या सर्व गोष्टी राहतात ज्यांच्याव्दारे आम्ही विचार करतो, समजतो आणि कार्य करतो. चेतनेतच मानसाचा अहंभाव राहतो आणि हेच विचारांचे संघटन असते.

2. **अर्धचेतन** (Half Consious):- अर्धचेतन स्तरात त्या गोष्टी राहतात ज्यांचे ज्ञान आम्हाला त्याक्षणी राहत नाही परंतू वेळेवर आठवता येत असते.

3. **अचेतन** (Unconsious):- अचेतन स्तरावर त्या गोष्टी असतात ज्या आम्ही पूर्णपणे विसरलेलो असतो आणि ज्या आम्हाला प्रयत्न करूनही आठवत नाही. फक्त विशेष प्रकियेव्दारे ज्यांना आठवले जावू शकते. जे अनुभव एक वेळ चेतनेत असतात तेच कधी—कधी अर्धचेतन व अचेतन मनातही गेलेले असतात. या अनुभूती किंवा अनुभव सर्वथा निष्क्रिय नसतात तर ते मानवास माहीतही न करता प्रभावीत करीत असतात.

वर्तनाच्या मानसशास्त्रानुसार, 'साधारणतः सजीवाच्या वागण्याच्या पध्दतीसाठी जाणीव ही संकल्पना वापरली जाते. जी त्याला विशेषत्वाने प्रतिसाद आणि जागरूकतेबाबत इतरांपेक्षा किंवा ज्यांना प्रतिसादक्षमता व त्या संबधीत जागरूकता नाही अशा कोमा मध्ये गेलेल्या व्यक्तीपासून भिन्न करते. दोन अंतिम प्रतीकुल अशा स्तरांमधून जाणिवेचो विकास होतो. एक व्यक्ती जास्त जागृत असतो जेंव्हा तो डुलकी घेत असतो किंवा गाढ झोपेत असतो. परंतू जेंव्हा तो डोळे उघडे ठेवून जागतेपणी एखादे गणिताचे उदाहरण सोडवित असतो तेंव्हा तो कमी जागृत असतो. अशाप्रकारे जाणीव म्हणजे एखाद्या सजीवाची अशी अवस्था होय जी तत्परता आणि वेगवेगळया वर्तनाची सुविधा दर्शविते.

(In behaviourist psychology, consciousness is a concept refferring in a general way to the behaviour of organisms characterized by alert awareness and responsiveness as contrasted with the lack of awareness and relative unresponsiveness of deep sleep or anesthetic coma. Between these extremes are varying degrees or levels of consciousness. A person is more conscious then he is dozing than he is in deep sleep but less conscious than he is when wide-awake solving a mathematical problem. Thus, consciousness describes a state of an organism in terms of the readiness and facility of discriminative behaviour.)[24]

मानसशास्त्रज्ञ जे. बी. वॅटसन यांच्या मते, 'जाणीव पध्दतीशास्त्राप्रमाणे होणारे मानवी वर्तन व त्यानंतर उत्पन्न होणारी त्याची प्रवृत्ती होय.'[25] वॅटसन यांच्या मते, 'जाणीव म्हणजे सबंधीत तत्परता आणि ताबडतोब येणारे अनुभवाचे घटक आणि मेंदूची प्रकिया होय. जाणिवेचे निरिक्षण करण्याची पध्दती म्हणजे अंतरावलोकन किंवा स्वनिरिक्षण होय. स्वनिरिक्षण करणारे मानसशास्त्रज्ञ हे मान्य करतात की, जाणीव म्हणजेच मेंदुचा वैज्ञानिक अभ्यास होय. स्वनिरिक्षक मानसशास्त्रज्ञ जाणिवे विषयी असेही म्हणतात

की, जाणीव ही जरी वैयक्तिक घटना असेल तरी दोन निरिक्षक सारख्याच जाणिवेचे वर्णन करू शकत नाही.

वर्तनशास्त्र 'जाणीव' या घटकाचा विचार करतांनां तिच्यातील मानवी वर्तनावर विशेष भर देते. ज्यामुळे मानवाचे वर्तन इतर प्राण्यांच्या वर्तनापेक्षा भिन्न आहे. मानव हा केवळ विभिन्न वर्तनप्रकारांची गुंतागुंत लाभलेला प्राणीच नाही तर तो सोबतच विभिन्न प्रतिसाद क्षमताही शिकू शकतो, ज्या त्यांच्या वेगवेगळया वर्तनावर म्हणजेच जास्तीत जास्त प्रमाणात भाषिक प्रतिसादाच्या सांकेतिक पध्दतीला शिकू शकतो. मानवाला केवळ जागृतता (awareness) आहे असे नाही तर त्याला हे माहित आहे की, त्याला जागृती किंवा अनुभूती आहे. तो, 'मी जागृत आहे' असे म्हणतो हे त्याच्या शाब्दिक, क्रियावाचक जाणिवेचे प्रदर्शित ज्ञान होय. हे जागृतपणाचे ज्ञान विश्वसनियता आणि सिध्दता किंवा प्रबलतेच्या सर्व पातळयावर निर्माण होते. हे ज्ञान क्रियात्मक वर्तनाचे विषयवार संदर्भ आणि वागणूकीच्या मोठया पातळीवरील प्रतिमान या दोहोंमधील नातेसंबधावरून ठराविक पातळीवर मोजले जाते. आम्ही दृष्टीला दिसणा–या व संवेदना निर्माण करणा–या वर्णनात्मक घटना शिकत असतो आणि शारीरिक संवेदनशिलतेहून जास्त लवकर व सोप्या पध्दतीने ऐकू येणा–या घटनांपासून जागृत होत असतो. क्रियात्मक प्रतिसादात भावना आणि भावनिक अनुभवांचा सामान्यपणे संदिग्ध आणि अस्थिर म्हणून अंर्तभाव केला जातो. तथापी जाणीव म्हणजेच माहित करून घेणे किंवा माहिती असणे अशी व्याख्या मानसशास्त्रात केली जाते.

व्यक्तीची जाणीव सामाजिक वातावरणाच्या संपर्कात विकसित होत असते. सामाजिक वातावरणाच्या प्रभावाने मनुष्य नैतिकता, औचित्य आणि व्यवहारकुशलता प्राप्त करीत असतो. आणि हाच जाणिवेचा विकास म्हटला जातो. विकासाच्या चरम सीमेवर जाणीव स्वतंत्रतेची अनुभूती करीत असते. ती सामाजिक गोष्टींना प्रभावीत करू शकते आणि त्यापासून प्रभावीत होत असते. परंतू या प्रभावापासून स्वतःला अलगही करू शकते. जाणिवेच्या या प्रकारच्या अनुभूतीस शुध्द चैतन्य संबोधले जाते.

**सामाजिक जाणिवेची संकल्पना** :– 'Consciousness' या शब्दाचा समाजशास्त्रात व मानसशास्त्रात सर्वप्रथम उपयोग जे. बी. वॅटसन यांनी केला. त्यांनी मानवाच्या वर्तनाच्या संदर्भात मानसशास्त्रीय पध्दतीशास्त्रीय दृष्टिकोनातून या शब्दाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, 'जाणीव म्हणजे व्यक्तीची प्रत्यक्ष तत्परता किंवा मेंदूची लवकर दखल घेण्याची प्रयोगशीलता होय. ही दखल म्हणजेच ही 'जाणीव' सामाजिक घटकाविषयी असेल तर त्या जाणिवेला 'सामाजिक जाणीव' (Social Consciousness) असे म्हणतात.'[25]

जे. बी. वॅटसनच्या मते, 'जाणीव' असलेले मानवी वर्तन हा एकमात्र घटक आहे, जो हे सिध्द करतो की, मानवी वर्तन हे इतर प्राणीमात्रांच्या तुलनेत वेगळे आहे.[26]

उच्चत्तर समाजशास्त्रीय विश्वकोषात सामाजिक जाणिवेची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, ''व्यक्ती–व्यक्ती मधील आपल्या संबधाच्या बाबतीत जागृततेची भावना सामाजिक जाणिवेला व्यक्त करते. म्हणजेच जेंव्हा व्यक्ती एकसमान अनुभवासाठी आपल्याला भागीदार समजतात तेंव्हा ही स्थिती सामाजिक जाणिवेला स्पष्ट करते. एखाद्या सामाजिक समस्येचे समाधान करण्यासाठी उचलण्यात आलेली पावले किंवा करण्यात आलेले प्रयत्न, व्यक्तींच्या सामाजिक जाणिवांचे द्योतक आहे.''[27]

Charles Horton Cooley यांनी 'American Sociological Society' मध्ये सादर केलेल्या "Social Consciousness' या शोध निबंधातही हे स्पष्ट केले आहे की, 'व्यक्तीच्या वैयक्तिक जाणिवा सामूहिक जाणिवांमध्ये विलीन होत असतात. सामूहिकतेची दृष्टी जिथे सर्व मते एकत्र येवून एक मर्मस्थान, चेतनवाद बनवितात तेथून वैयक्तिक मत वेगळे करणे अगदी अशक्य असते. प्रवाह हा तिकडे वाहतो जिथे ज्ञान, वंशपरंपरा आणि सूचना या वाढत जातात, की ज्यामुळे आपला प्रत्येक विचार हा आपल्या पूर्वजांसोबत आणि सहका–यासोबत मिळत मिसळत असतो आणि त्यातून भव्य अशा समाजाची निर्मिती होत असते. (The view that all mind hangs together in a vital whole, from which the individual is never really separate, flows natuarally from our growing knowledge of heredity and suggestion, which makes it increasingly clear that every thought we have is linked with the thought of our ancestors and associates, and through them with that of society at large. It is also the only view consistent with the general standpoint of modern science, which admits nothing isolate in nature.)[28]

**जाणिवेची सामाजिक व वैयक्तिक बाजू** :– चार्लस कुले यांनी जाणीव या संकल्पने विषयी भाष्य करतांना जाणिवेची सामाजिक व वैयक्तीक बाजू स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. कुलेंच्या मते, सामाजिक मनाचे दोन भाग आहेत. 1. चेतन संबध व 2. अचेतन संबध. अचेतन म्हणजे जे आपल्याला जाणवत नाही किंवा कदाचित आपल्या जाणीवमर्मातून सूटत असते. अशाप्रकारच्या व्यक्तीच्या कार्याचा परिणाम अजाणता आजूबाजुस पडत

असतो. आपली भाषा, आपले तांत्रिक कौशल्य, आपले शासन आणि इतर संस्था या सर्व ठिकाणी असे अनेक अचेतन वर्गातील लोक कार्य करीत असतात ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आपल्याशी संबध येत असतो. समाजातील एक मोठी चळवळ म्हणजे देशाची प्रगती किंवा अधोगती, संस्था आणि त्यांची स्पर्धा, हया जर चेतना किंवा जाणिवेच्या अंगाने विचारात घेतल्या गेल्या तर जिवंत राहतील नाहीतर त्या भूतकाळात जमा होतील. आणि जरी सामाजिक जाणिवेची वाढ ही इतिहासकालीन गोष्ट असेल तरी सतत परंतू संथ गतीने ती मानवी जीवनाची भ्रमीत पकड घेत आहे.

"Social Consciousness" या शोध निबंधात चार्लस कुले पुढे असेही स्पष्ट करतात की, सामाजिक जाणीव किंवा समाजाप्रती जागृतता ही वैयक्तिक जाणीवेपासून वेगळी करणे अशक्य आहे. कारण आम्ही स्वतःबद्द्ल अधिक विचार करतो परंतू त्या विचाराला सामाजिक समूहाचे संदर्भ असतात किंवा समूहाशिवाय आपला संदर्भच देणे चूकीचे समजतो. या दोन गोष्टी सोबत दिसतात. आणि खरेच आपण कशाबद्द्ल जागरूक आहोत. स्वतःप्रती, समाजाप्रती किंवा दोन्हींच्या संयुक्ततेप्रती असा प्रश्न पडतो. आणि यामधूनच सार्वजनिक, सामाजिक असा दृष्टिकोन पुढे येतो. (Social consciousness, or awareness of society, is inseparable from self-consciousness, because we can hardly think of ourselves excepting with reference to a social group of some sort, nor of the group except with reference to ourselves. The two things go together, and what we are aware of is a more or less complex personal or social whole, of which now the particular, now the general aspect is emphasized.)[29]

कुलेंच्या मते सामाजिक जाणीव किंवा समाजाविषयीची माहिती ही 'स्व' च्या जाणिवेमूळे निर्माण होते. कारण जेव्हा आपण आपला स्वतःचा विचार करतो तेंव्हा आपण समाजातील कोणत्यातरी समूहाचे सदस्य आहोत हे गृहीत धरतो. आमच्यासाठी आमच्या समूहा व्यतीरीक्त कोणताही संदर्भ समूह नाही असेही आम्ही गृहीत धरीत असतो.

पुढे, कुले असे म्हणतात की, साधारणपणे, आपली परावर्तीत किंवा प्रतिबिंबित जाणीव आपल्या पूर्ण जागृत मनाची बाजू आहे. म्हणजेच आमच्या मनाच्या दृष्टीने विचारांच्या रूंदावलेल्या कक्षा आहेत ज्याला सामाजिक जाणीव असे म्हणता येईल. कारण आपले दुस–यांशी असलेल्या संबधाचे स्वरूप किंवा दूस–यांच्या इतरांशी असलेल्या सबंधाना त्यापासून वेगळे करता येत नाही. 'समाज' आणि 'स्व' ही जुळी भांवडे आहेत. एकाला जाणले तर दुसरे आपोआप कळते. म्हणजेच आपण ज्याप्रमाणे स्व विषयक जसे जागृत असतो तसेच समाजाविषयीही जागृत असतो. याचाच अर्थ व्यक्तीमध्ये जेंव्हा स्व जाणीव असते तेंव्हाच त्याच्या ठिकाणी सामाजिक जाणीवही असते. (In general, then, most of our reflective consciousness of our wide-awake state of mind is social consciousness, because a sense of our relation to other persons, or of other persons to one another, can hardly fail to be a part of it. Self and society are twin-born, and we know one as immediately as we know the other.)[30]

कुलेच्या मते, जाणिवेविषयीची ही दृष्टी, त्यांनी जिथवर संशोधन केले त्यांना सर्वत्र हीच दृष्टी आढळली. त्यांच्या मतानूसार, समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ सुध्दा या जाणिवे पासून प्रभावीत आहेत. सामाजिक जाणिवेची ही प्राथमिक पायरी असावी असे त्यांना वाटते. अनेक विचारवंताच्या मते, व्यक्तीमध्ये प्रथम स्व विषयक जाणीव निर्माण होते व त्यानंतर त्याच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते.

प्रसिध्द विचारवंत देर्काते यांच्या मते, मुलांमध्ये निरिक्षण आणि त्याच्यांत होणारी सामाजिक विचारांची वाढ हया दोन्ही गोष्टी बालकांमध्ये किंवा व्यक्तीमध्ये सामाजिक जाणिवांची निर्मिती करतात. देर्काते असे म्हणतो की, 'मी विचार करतो' म्हणून 'मी आहे'. त्यांच्या मते व्यक्तीमध्ये सर्वप्रथम मी (I) निर्माण झाला आणि त्यानंतर आपण किंवा आम्ही (We) हे निर्माण झालेत.

कुले असे म्हणतात की, स्वनिरिक्षण (Introspection) किंवा स्वपरिक्षण ही मानसशास्त्रीय दृष्टी आहे. परंतू देर्काते चे स्वनिरिक्षण मर्यादित आहे. कारण एक तत्वज्ञानी माणूस स्वतःला व स्वतःच्या स्थितीला इतरांपेक्षा वेगळे करतो. ज्याकडे तो पाहतो ती तांत्रिक बाजू असते, जी मानवी जाणिवेची दृष्टी देत असते.

एखादा मानसशास्त्रज्ञ एखाद्याकडे पूर्णपणे पाहतो तेंव्हा तो आंशिक जाणिवेकडेही लक्ष देत असतो आणि अनुभवातूनही शिकतो. ज्या मानसिक, भावनिक साधारण बोजड असे सर्व अनुभव असतात. हे सर्व तो पाहतो, अभ्यासतो आणि त्यांची नोंद घेतो. यालाच आपण भावनात्मक स्वनिरिक्षण असे म्हणतो. भावनात्मक स्वनिरिक्षणात तो स्वतःला सर्व लोकांशी जोडतो आणि त्यांना जागृत करतो. आणि त्यांच्या आयुष्याला, जीवनाला इतरांशी जुळवून घेतो. ज्यानंतर त्याच्या क्षमतेनूसार तो आठवतो आणि वर्णन करतो. यात तो काही समजतो व काही समजतही नाही. तो मुलांचे, मूर्खांचे, गुन्हेगारांचे, गरीब–श्रीमंताचे, श्रमिकांचे या सर्वांचे अध्ययन करून

पाहतो की तो त्यांच्यापेक्षा वेगळा नाही. कुलेंच्या मते, हीच सामाजिक मानसशास्त्राची मुख्य अध्ययन पध्दती असावी.

'मी' (I) ही जाणीव म्हणजेच स्वः ची जाणीव मुलगा दोन वर्षाचा होईपर्यंत जाणवत नाही. परंतू तो जेंव्हा समूहातील इतर लोंकांच्या संपर्कात येतो तेंव्हा त्याच्यात 'स्व' ची जाणीव (Self consciousnesss) निर्माण होते. समूहासोबतचे त्याचे हे संबध जसजसे दृढ होत जातात तसतशी त्याची 'स्व' जाणीव वृध्दींगत होत जाते आणि या सोबतच त्याची सामाजिक जाणीव सुध्दा वाढत जाते. एखाद्या नवजात मुलाचे मानसिक अनुभव हे प्रभावांवर अवलंबून असतात जे इतरांपेक्षा वेगळे राहू शकतात. कारण अनुवंशिक निर्णयावर जी सामाजिक जाणीव निर्माण होत असते. पण ती स्वतःही नाही किंवा समाजामधूनही नाही. पण लवकरच मेंदू वैयक्तिक प्रभावांना आणि स्व जाणिवेला सामाजिक जाणिवेपासून जसे मूल अप्रभावीत मार्गाने स्वतःला जोडतो तशाच पध्दतीने ते मूल 'मी' म्हणत नाही किंवा 'आई' म्हणत नाही. तर त्याच्याकडे काही प्रतिके आणि भावना मधून याची निर्मिती होत असते. नंतर जास्त प्रतिबिंबीत जाणीव निर्माण होते ज्याच्यात तो स्वतःचे आणि इतरांचे संबंध समजू शकतो आणि त्याच्या छोटयाशा जगाबददल भावना सुरू होतात. आणि अशाप्रकारे महतप्रयासाने 'स्व' जाणीव आणि सामाजिक जाणिवेचे अध्ययन करता अध्यात्मवादी ज्याला 'इगो' असे म्हणतात किंवा सामाजिक विचारवंत ज्याला सामाजिक 'प्राणी' असे म्हणतात तेच होय असे दिसते. 'स्व' आणि समाज या दोन्ही गोष्टी सोबतच असतात. दोन्ही मिळून संपूर्णतः प्राप्त होत असते. मी ज्या सामाजिक समूहात राहतो त्या समूहाविषयी मला माहिती आहे व मी सुध्दा स्वतःपूरता जागृत आहे. आणि म्हणूनच देकार्ते असे म्हणतो की, 'तुम्ही विचार करता' (You think) किंवा 'आम्ही विचार करतो' (We think) आणि तितकेच सत्य विचारामध्ये आहे. परंतू हे ही म्हणता येईल की, ही जाणीव म्हणजे तुम्ही निश्चित केलेली किंवा एखाद्या विशिष्ट व्यक्तिमधील सामान्य जाणीव जी आपण पाहू शकतो. परंतू जेंव्हा तार्किक दृष्टीने विचार करतो तेंव्हा ती केवळ वैयक्तिक गुणांपैकी एक आढळते. तरीही हया वैयक्तिक गुणांना सामाजिक समजले जाते. सामान्यतः सर्व लोक हाच विचार करतात की, एक व्यक्ती ही जीवनाचे पहिले सत्य आहे. जर साधारणतः ज्या बाजूने विचार करता जो परंपरागत बाजूने वस्तूंना बघण्याचा व दुस—या बाजूने विचार न करण्याचा प्रघात आहे. त्यानूसार एकक म्हणजे संपूर्णतेचा एक भाग होय. हे वांशिक नाही तर आंतरक्रिया आणि दळणवळणातून आणि आम्ही किती जवळून एकमेकांना निरखतो त्यावरून ठरत असते. एकूण काय तर वेगळेपणा हा दृष्टीचा भ्रम आहे. परंतू शेवटी समाज हेच सत्य आहे. सामाजिक संस्था म्हणजे तांत्रिक अर्थ न घेता केवळ मानवी जीवनातील जीवनासंबधीचे एकत्रिकरण होय. हेच सत्य शेवटी एकक आणि वैयक्तिक समजूतीच्या मंथनातून निर्मित होते.

कुलेंच्या मते, आता सामाजिक जाणिवेबददल काहीही रहस्यमय राहिलेले नाही. परंतू अजूनही काही गुप्त असावे जे अध्यात्मासारखे खणले, उकरले जाईल आणि पुढे काढले जाईल जे कल्पनेच्या खोलीपेक्षा जास्त पुढे असेल. उच्च जाणिवेची जी पकड पूर्ण रूपाने सामाजिक निसर्गावर आहे ती वसंत आणेल. आपणास यात फक्त सत्य आणि समान मान्यताप्राप्त सिध्दांत मानावयास पाहिजेत. त्यासाठीच प्रथम सामाजिक कल्पनांची व जाणिवांची व्यक्ती मधील वाढ या विषयी संशोधन करणे आवश्यक आहे.

**सामाजिक जाणिवांची व्याप्ती व स्वरूप :—** 'Journal of Consciousness Studies' यामध्ये प्रसिध्द झालेल्या 'An Integral Theory Of Consciousness' या शोधनिबंधात केन विल्बर (Ken Wilber)[31] यांनी जाणिवेच्या स्वरूपाविषयी व व्याप्ती विषयी बरीच चर्चा केली आहे. विल्बरच्या मते, जाणिवेच्या विज्ञानाचा विकास अनेक संशोधनातून झालेला आहे, तरी वर्तमानकालीन मुख्यतः एक डझन संप्रदायामध्ये अजूनही जाणिवेच्या सिध्दांतावर संशोधन सुरू आहे. विल्बरच्या दृष्टीकोणातून, जाणिवेचे अध्ययन हे मुख्यतः याच तत्वावर असावे की ज्या या संप्रदायांनी महत्वपूर्ण मानले आणि अशाप्रकारे काय महत्वाचे आहे हे मॉडेल रूपात जुळवून सांगण्याचे काम ज्या संप्रदायांनी केले आहे ती खालीलप्रमाणे आहेत.

1. अनुभवासंबधीच्या विज्ञानाच्या (Cognitive Science) मते, जाणीव ही मेंदूच्या क्रियांच्या प्रणालीपैकी एक आहे. ते साध्या स्वतःला प्रस्तूत करण्याच्या फॅशनसंबधी असू शकते. जसे— जॅकेनडॉफचा गनन करणारा मेंदू किंवा जास्तच गुंतागुंतीचे असेल तर जाणीव म्हणजे पूरोहितांच्या विस्तारीत जाणा—या जाळयाप्रमाणे आहे असे म्हणता येईल. या मुद्यावर नवीन cognitive विज्ञान कदाचित सहमत असेल आणि याचा सारांश Alayan Scott us Stairway to the mind (1995) मध्ये दिलेला आहे. जाणिवेच्या नवकल्पनांना या संप्रदायात सामावून झोतले आहे.

2. अंतरावलोकनवादाच्या (Introspectionism) मते, जाणीव अधिक चांगल्याप्रकारे समजावून घेता येईल ती या पध्दतीने. प्रथम पुरूषांच्या संबधीत इच्छाशक्तीचे प्रबलन,

ताबडतोब येणा–या गोष्टीबद्दलची चेतना आणि जगण्यातील अनुभवाचे निरीक्षण व वर्तन होय, आणि तिस–या पुरूषांच्या किंवा तृतीय पुरूषासंबधी वस्तूनिष्ठ स्वरूपातील अनुभव, ते वैज्ञानिकदृष्टया बरोबर आहेत अथवा नाही हे बघणे गरजेचे नसावे. त्यांची वैशिष्टयपूर्ण विविधता लक्षात न घेता हे बोर्ड सर्वच गोष्टींना तात्विक, ऐच्छिक स्वरूपातील स्वविचाराचे मानसशास्त्र, वर्तमानवाद आणि घटनाविज्ञान यामध्ये अंतर्भूत केलेले आहे.

3. Neuropsychology च्या दृष्टीकोणातून जाणीव म्हणजे नाडी मंडल, नाडीव्दारा पाठविले जाणारे व मेंदुच्या घडणीतील ऑरगॅनीक तत्व होय. अनुभवाच्या विज्ञानाप्रमाणे जाणीव ही कम्प्यूटर सांयन्स आणि केवळ ऑरगॅनीक ब्रेन स्ट्रक्चरवर आधारीत आहे असे नाडीमानसशास्त्र म्हणत नाही तर त्याचा अधिक विस्तृत असा जीवशास्त्रीय पाया ते प्रस्तुत करतात. कंम्प्यूटर सांयन्स पेक्षा पुढे जावून ते म्हणतात जाणीव ही एक नाडीसंबंधी प्रक्रियेतील क्लिष्ट परंतू समाधानकारक असे ऑरगॅनीक सत्य आहे.

4. Individual Psychotherapy वैयक्तिक मानसशास्त्रीय पध्दती स्वविचारसंबधी आणि व्याख्यात्मक मानसशास्त्राचा वापर करून मानसिक नैराश्याच्या समस्या आणि भावनात्मक समस्या सोडवत असते. अशाप्रकारे जाणीव म्हणजे प्राथमिकतः व्यक्तीची वैयक्तिक ग्रहणक्षमता होय असे ते म्हणतात. जास्तीत जास्त Psychotherapy संप्रदाय हे जाणिवेच्या सिध्दांताला मान्यता देतात कारण मानवी गरजांचा विचार करता अर्थ आणि अभिप्राय यामधील तालमेल बिघडल्यास त्याचा परिणाम वेदनामय मानसिक लक्षणांमध्ये आणि भावनिक तणावामध्ये होत असतो. याचे पुढचे विकसित रूप म्हणजे Jungian होय. हा दृष्टीकोण जाणिवेच्या एकत्रीकरणात्मक संरचनेला रेखांकित करतो. हे सर्व एकत्रित केले तर त्याचा मानसशास्त्राला फायदा होत असतो.

5. सामाजिक मानसशास्त्राच्या मते, जाणीव म्हणजे सांस्कृतिक अर्थपूर्णता व सामाजिक परिस्थितीचे उत्पादन होय. यात जे दृष्टिकोन येतात त्यात कार्ल मार्क्सचा अर्थविषयक दृष्टिकोण, संगठन आणि सांस्कृतिक दृढता इत्यादी होत. या सर्वांचा एकाच बाजूने अंगुलीनिर्देश आहे की, जाणीव ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती प्रामुख्याने सामाजिक आहे.

6. रोगीसंबधीचे मानसशास्त्र फोकस करतांना Psychopathology वर्तनासंबधीत घडामोडी आणि मानसऔषधी विज्ञान यातील सहसंबध पाहाते. मागील अर्धशतकापासून मानसतज्ञ Freudian Metapsychology चे अध्ययन करीत आहेत. परंतू आता हे क्षेत्र विस्तारित झाले ते जाणिवेच्या संकल्पनेने, कारण ही संकल्पना नाडीमानसशास्त्र आणि जीवशास्त्रीय Term शी संबधीत आहे. या संप्रदायाच्या मते जाणीव ही Neuronal System शी संबधीत आहे म्हणून सध्या ही समस्या नाही परंतू जर नंतरच्या स्टेजवर आरोग्याशी सांगड घातली तर या ताळमेळ न बसलेल्या परिस्थितीत ही समस्या म्हणून उद्‌भवू शकते.

7. विकासाच्या मानसविज्ञानानूसार, जाणीव ही एक वैयक्तिक बाब नसून ती विकसित होणारी, उघड दिसणारी प्रत्येक पायरीवर वाढत जाणारी अशी एक वेगवेगळया स्वरूपातील architecture आहे. म्हणजेच जाणिवेस समजून घ्यायचे असेल तर तीचे प्रत्येक पायरीवरचे unfold architecture उलगडून पाहावयास पाहिजे. पुढच्या विकसित स्वरूपात हा दृष्टीकोण असे म्हणतो की, जाणीव म्हणजे प्रत्येक मानवात असलेले असे विकसित आणि वैविध्यपूर्ण कौशल्य आणि क्षमता होत ज्या त्याच्या विकासाकरीता आणि चांगल्या भविष्याकरीता उपयोगी पडतात. उदा. असाधारणपणा, असामान्यत्व इत्यादी क्षमता होत. यात अतिउच्च स्वरूपातील अनुभवसंपन्नता, परिणामकारकता, शारीरिक, तात्विक आणि स्व विकास होय.

8. Psychosomatic Medicine च्या दृष्टीकोणातून जाणीव म्हणजे organic शारीरिक प्रक्रिया आहे जी मुख्यतः आंतरवर्तनात्मक असते. या संप्रदायाच्या मते जाणिवेचा पुरावा म्हणजे psychoneuro-immunology and biofeedback या क्षेत्रात ही प्रक्रिया घडून येत असते. त्याचे अधिक व्यापक स्वरूपातील विश्लेषण करतांना ते म्हणतात जाणीव आणि विस्मयकारक आरोग्यकारक, आरोग्यवर्धक वर्तनात प्रार्थनेचा प्रभाव हा वैशिष्टयपूर्ण पूर्ण रोग बरा करण्यास मदत करतो. तसेच प्रकाश किंवा आवाज हे ही आरोग्यवर्धक सिध्द होतात. तसेच उत्स्फूर्त प्रायश्चित आणि अशाच प्रकारचे इतर. यात अशाही दृष्टीकोणाचा समावेश होतो जे संशोधन करीत आहेत की आरोग्यवर्धनासाठी ते therapy पासून ते दृष्टीक्षेप संबंधी (Visualization) ते Psychotherapy आणि meditation पर्यत जाता येते.

9. जाणिवेच्या असाधारण पाय–या :– स्वप्नापासून ते स्वसंबधापर्यंत जाणिवेच्या असाधारण पाय–या एक अध्ययन क्षेत्र निर्माण करतात. या जाणिवेच्या साधारण भूमिकेबद्दल समर्थन करीत नाही तर अधिक छानबीन करून जाणिवेची पकड मजबूत करतात. जरी काही स्व संबधीत उदाहरणे ही विवादास्पद असली व निसंशय त्यांचे परिणाम विषारी किंवा वाईट असले तरी या क्षेत्रात होऊ

घातलेल्या संशोधनावरून त्यांची भूमिका (nonspecific amplifier of experience) अनुभवाचे विस्तारीत स्वरूप असे आहे. अशाप्रकारे ते उपकरणशील ठरते. जाणिवेच्या प्रगतीच्या दृष्टीने आणि प्रतिबंधात्मक दृष्टीने जाणीव ही अध्ययन करण्यास उपयुक्त ठरते.

10. पूर्वीय आणि जाणिवेस वाहून घेतलेल्या प्रवाहानूसार – सामान्य जाणीव म्हणजे एक संकुचित आणि अरूंद असे अत्युच्च आणि गहन (deeper) चेतनेचे रूप होय. आणि योगा किंवा मेडीटेशन सारखे इंजेक्शन हे या सामर्थ्याला जागृत करण्यासाठी घेणे आवश्यक आहे. अर्थात हे सर्व सांगतात की, जाणिवेची आवश्यक अंगे याच अतिउच्च, असामान्य, अशा अवस्थामधून विकसित होतात.

11. जाणिवेचे परिणाम काय असावे ? – या जाणिवेच्या दृष्टिकोनातून, जाणीव म्हणजे वास्तविक जाणीव ही इतरांशी आंतरिक क्रिया साधतांना या भौतिक जगात जाणिवेच्या परिमाणाचा वापर होत असतो. मानवी शरिरात आंतरपेशीय स्तरावर उदा. microrubules आणि भौतिक जगातही मोठया प्रमाणात या दृष्टीकोणातून जाणिवेच्या खूप सा–या विभिन्न प्रवाहांना भौतिकीय जगाशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला. आणि त्यात अनेक physical थेअरीज जसे bootstramjing hyperspace string चा वापर करण्यात आला आहे.

12. अतीसुक्ष्म शारीरिकबल (Subtle energies) च्या संशोधनाने हे स्वीकृत केले आहे की, भौतिकशास्त्राच्या चार शक्तींच्या (Strong and weak nuclear, electromagnetic, gravitational) मिळून पुढे एक सुक्ष्म शक्ती बनते. जीला bio-energy म्हणतात. आणि हीच शक्ती एक महत्वपूर्ण आणि वास्तविक भूमिका जाणिवेच्या संदर्भात साकारत असते. संस्कृतीवादी याला 'प्राणी', 'की' आणि 'ची' या नावाने ओळखतात. आणि याच शक्तीला ते माणसाच्या एकूण वर्तनास जबाबदार मानतात. उदा. या शक्तीमूळे भौतिक शरीर आणि अदृश्य मेंदू किंवा मन यांच्यामध्ये एक न दिसणारी साखळी बनत असते. तीला missing link असे म्हणतात. जगातील सर्व मोठे सैध्दांतिक ते पूर्वेचे असोत किंवा पश्चिमेचे सर्व हे मानतात की या बायोइनर्जीला दुहेरी पट्टयाप्रमाणे कार्य करावे लागते. परिस्थितीचा प्रभाव मेंदूप्रत पोचविणे आणि मेंदूची त्यावर प्रतिक्रिया निर्माण करणे असे दुहेरी काम या शक्तीला करावे लागते.

विल्बर चा स्वतःचा दृष्टिकोन वरील प्रत्येक दृष्टिकोनाशी संबंधित मजबूत बाजूला स्पष्ट रूपात अधोरेखीत करतो. त्यातील अव्यावसायिक आणि व्यापक, आवश्यक बाबींचा विचार करतो. परंतू या प्रतिमानाला किंवा मॉडेलला समजून घेण्यासाठी काही पूर्वपीठिका जाणणे गरजेचे आहे. यात काय आहे हे जाणून घेण्यासाठी या थोडक्यातील सारांशाचे वर्णन मोठया स्वरूपात डझनभर पुस्तकात आढळेल. त्यात मुख्यतः Transformation of Consciousness (Wilberet al, 1986) 'A History of Everything' (1996) आणि 'The eye of spirit' (1997) यांचा समावेश होतो. यात रस असणा–या वाचकांनी अधिक माहितीकरीता आणि अधिक संदर्भाकरीता या पुस्तकांचा आढावा घ्यावा. परंतू विल्बरच्या मते जाणिवेचे स्वरूप समजून घेण्यासाठी खालील सारांशही उपयोगी ठरू शकतो. थोडक्यात, विविध प्रकारच्या विकसित आणि उत्क्रांतीवादी प्रणालीच्या सद्य परिस्थितीतील माहितीच्या आकडेवारीवरून नजर फिरविल्यास चार प्रकारच्या जाणिवेचा विकास झाल्याचे दिसून येते. ऐच्छिक, वर्तनात्मक, सांस्कृतिक आणि सामाजिक हे ते चार प्रकार होत. यापैकी प्रत्येक बाजूने विचार करता जाणिवेच्या उपरोक्त बारा प्रमुख पाय–या किंवा पातळया आहेत. प्रत्येक प्रकारच्या जाणिवेच्या या बारा पाय–यांच्या अनुषंगाने विचार करता प्रत्येक प्रकारच्या जाणिवेचे वेगळे स्वरूप आणि विस्तार आढळून येतो. हे प्रतिमान तेंव्हा वापरले जाते जेंव्हा प्रभावी संप्रदायाकडून जाणिवेचे संकलन आणि एकत्रिकरण करतांना या बारा पाय–यांच्या वापर करून अध्ययन अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि भविष्यातील काही विशिष्ट संशोधनावर प्रकाश टाकला जातो. सारांश असा आहे की, 'सर्व भाग किंवा प्रकार अथवा सर्व पाय–या' या दृष्टीने म्हटले आहे की त्या वादानुवादाच्या (sofistication) च्या सर्व अंशातून कमीतकमी तपासून पाहिल्यास आपण प्रामाणिकपणे आणि सामान्यतः जाणिवेचा एकत्रित मांडलेला सिध्दांत सुरक्षित राखून ठेवू शकतो.

**जाणिवेचे आधार** :– जाणिवेला प्रभावित करणारे, जाणिवेची संयत आणि लवचिक कार्यप्रवणता पाहणा–या पातळयांचा विचार करता, जाणिवेच्या आधारांचे वर्गीकरण तीन गटात केले जाते. या प्रकारांचे विश्लेषण खालीलप्रमाणे –

1. **जाणिवेचा भौतिक किंवा शारीरिक आधार** :– काही तत्वज्ञानी समजतात की मेंदू किंवा बुध्दी आणि शरीर या दोन्ही एकच आहेत. जरी दोहोंमध्ये आवश्यक असे चेतनतत्व एकच आहे तरी मुखलक्षण–निरूपण (चेहरा पाहूनद्ध मानवाचे चरित्रवर्णन करणे आणि मस्तिष्क विज्ञान ज्यात शारीरिक हालचालीचा वापर वर्तनासंबंधीत तर्क काढण्यासाठी केला जातो. म्हणजेच व्यक्तीच्या शारीरिक हालचाली त्याच्या जाणिवा निश्चित करीत

असतात. शरीराच्या वेगवेगळया अवयवांचे परस्परांशी घनिष्ट संबध असतात. शरीरातील काही ग्रंथी व मेंदू या जाणिवेच्या उच्च पातळीवरील शारीरिक बदलाशी सबंधित असतात. व्यक्तीची शुध्द जाणीव ही तेव्हांच अनुभवावयास मिळते जेंव्हा मेंदू आराम करण्याच्या अवस्थेत असतो. आणि जेव्हा तो उत्तेजना देतो आणि कृतीस मनाई करतो. या प्रक्रिया सतत चालू असतात. शरीरातील जीन्स मध्ये असलेल्या हार्मोन्स च्या कार्यप्रवण व कार्यमुक्त होण्यामूळे जीन्स आपल्या जागा बदलतात, आपली वैशिष्टये बदलतात आणि जाणिवेच्या उच्च पातळीवर लक्ष केंद्रित करतात. व्यक्तीच्या मेंदुचे दोन अर्धवर्तुळे काही प्रमाणात स्वतंत्रपणे कार्य करतात. उजव्या हातांनी काम करणा–या लोकांसाठी डावा अर्धवर्तुळ अधिक प्रमाणात काम करतो तर डाव्या हातांनी काम करणा–यांचा उजवा अर्धवर्तुळ काम करीत असतो. व्यक्तीच्या मेंदूचा उजवा अर्धवर्तुळ मध्यवर्ती भूमिकेने धार्मिक, कृत्रिम आणि अंतर्ज्ञानाने प्राप्त क्रिया करीत असतो. उदा. भाषण आणि वाचन, लेखन, विचारांचे संकलन, गणिती क्रिया आणि आक्रमक, कुशलतापूर्वक हालचाली च्या समस्या सोडविणे इ. या डाव्या अर्धवर्तुळाच्या क्रिया असतात, तर याच वेळी उजवा अर्धवर्तुळ दाखवितो की तो, गाण्यातील शब्द, कला, हस्तकौशल्य, ओळख, प्रभावी अनुभव, शरीर प्रतिमा, स्वप्न इ. हे संशोधनाअंती सिध्द झाले आहे की 'ध्यान' लावण्यासारख्या ज्या क्रिया असतात त्यात मेंदूच्या दोन्ही अर्धवर्तुळांना एकत्र जोडण्याचे कार्य करीत असतात. आणि जाणिवेच्या उच्च पातळीवर पोहचण्यास हीच अवस्था आवश्यक आहे. थोडक्यात, जाणिवेच्या शारीरिक आधारात व्यक्तीचा मेंदू व त्याच्या शारीरिक हालचाली महत्वाच्या असतात.

2. **जाणिवेचे सामाजिक आधार** :– जाणिवेचे सामाजिक आधार म्हणून मुख्यतः संस्कृती व सामाजिक संबधाचा उल्लेख केला जातो. हे आधार खालीलप्रमाणे–

अ) **संस्कृती व वास्तविकता** :– संस्कृतीमूळे आपल्याला भाषिक ज्ञान, वागणूक व वास्तविकतेची जाणीव होते. संस्कृतीच मुख्यतः मानवाचे जगणे ठरवित असते किंवा मानवाच्या जीवनाचा एक आराखडा तयार करून देत असते. एक व्यक्ती एखाद्या संस्कृतीमध्ये लहानाचा मोठा होत असतो. तेंव्हा त्या संस्कृतीची वैशिष्टये पूर्ण सत्यतेसह आपलीशी करतो. संस्कृतीमध्ये भाषा हे महत्वपूर्ण माध्यम आहे. जे व्यक्तीच्या जाणिवेच्या प्रकाराला परावर्तीत करू शकते. व्यक्ती जी भाषा बोलतो ती भाषा त्याच्या बुध्दीवर लवकर प्रभाव टाकते. आणि त्यानूसार त्या व्यक्तीची जाणीव निश्चित होते.

ब) **सामाजिक संबध** :– व्यक्तीची स्वतः विषयीची संकल्पना ही त्याच्या बदद्लच्या इतरांच्या ज्ञानाशी संबधीत असते. व्यक्तीला दुस–या विषयी असलेली माहिती, ज्ञान तसेच व्यक्ती दुस–यांशी कसा वागतो यावरून व्यक्तीचा स्वतःचा दृष्टीकोन स्वतःप्रती स्पष्ट होत असतो. व्यक्तीचा दृष्टीकोण प्रेम, तिरस्कार, शत्रू, मित्र यांच्याप्रती किती व्यापक आहे त्यावरून व्यक्तीचे कार्य दिसते. परिस्थितीजन्य उदिद्ष्टे आणि सामाजिक परिस्थिती, तणावमुक्तीच्या पध्दती यावरून व्यक्तीची कार्यप्रवणता दिसते. व्यक्तीचे सहजीवन हे सहकार्यावर आणि स्पर्धेवर अवलंबून असते. आणि या सर्वामधूनही व्यक्तीच्या जाणिवा निश्चित होत जातात.

3. **जाणिवेचा मानसशास्त्रीय आधार** :– जाणिवेच्या संदर्भात मानसशास्त्रीय घटकांचे विशेष महत्व आहे. व्यक्तीची मानसिक स्थिती त्याची जाणीव व त्याच्या संदर्भात असलेल्या निर्जिव घटकांना जोडण्याचे कार्य करीत असते. अंतर्दृष्टीने प्राप्त झालेली जाणीव ही स्वतःच्या स्विकारावर अवलंबून असते. जाणीव, विलगता, आणि अंतर्प्रेरणेने प्राप्त झालेले ज्ञान यामुळे स्वातंत्र्य, मनाची दोलायमान अवस्था, ग्रह, व्देष, एकटेपणा, असुरक्षितता, अनिश्चितता, अस्वस्थता यामधून 'स्व' प्रेम, 'स्व' महत्व आणि 'स्व' चा जन्म होतो. दुस–या शब्दात बुध्दीची शांत स्थिर अवस्था आणि 'स्व' चा विकास यामुळे एकतेची भावना वाढीस लागते व व्यक्तीची स्व जाणीव व सामाजिक जाणीव निश्चित होत असते.

अशाप्रकारे जाणिवेचे प्रकार म्हणून वरील प्रकारांचा उल्लेख करता येतो. प्रत्येकच व्यक्तीच्या स्व जाणिवेत व सामाजिक जाणिवेत हे प्रकार आढळून येतात.

---

References:-


1. Encyclopaedia Britannica, William Benton, Publisher, Chicago, 1969. P. No.369.
2. Ibid. P. No.369.
3. Dr. Dayakrushana, Pachyatya Darshan Ka Itihas, Part-2, Rajasthan Hindi Granth Akadami, Jaipur - 4th edition, 2004 Page No. 142.
4. Ibid. Page No. 151.
5. Complet A-Z sociology handbook, Tony Lawson & Joan Garrod, 3rd edition, 2003, Hodder & Stoughton Educational, a division of Hodder Headline plc, 338 Eustaon Road, London NW1 3BH, by The Bath Press Ltd. page no. 47.
6. Rajhans Vyavharik Marathi Sabdarth Kosh, M.V.Bhatwadekar, Rajhans Prakashan, Pune, First Eadition, 2007 page no. 247.
7. Advanced Encyclopaedia of Sociology, Harikrushna

Rawat, Rawat Publications, Jaipur & New Delhi Ist Eadition, 2006. Page no. 75
8. Ibid. Page no. 75.
9. Samajik shastramadhil sadnya- sidhantacha spastikarnatmak kosh, Philosophy, Edited by Dr. B.R.Joshi, Diamond Publications Pune, First edition 2007, Page no. 59.
10. Advanced Encyclopaedia of Sociology, Harikrushna Rawat, Rawat Publications, Jaipur & New Delhi I'st Eadition, 2006. Page no. 75.
11. Samajik shastramadhil sadnya- sidhantacha spastikarnatmak kosh, Manasshastra, Edited by Dr. B.R.Joshi, Diamond Publications Pune, First edition 2007, Page no. 107.
12. Hindi Viswakosh, Khand 4, Nagripracharini Sabha, Waranasi, First edition, 1964 Page No. 282.
13. Ibid. Page No. 282.
14. The Encyclopedia Americana, Volume-07, International Edition, reprint - 1970. Page no. 610.
15. Leibnizian, DefinitionOfConsciousness, Research Paper Published on Internet Websight.
16. Ibid.
17. Hindi Viswakosh, Khand 4, Nagripracharini Sabha, Waranasi, First edition, 1964 Page No. 282.
18. Ibid. Page No. 282
19. Ibid. Page No. 282.
20. Ibid. Page No. 283.
21. Ibid. Page No. 283
22. Ibid. Page No. 283.
23. Ibid. Page No. 283.
24. Encyclopaedia Britannica, Volume 6, First published in 1768, William Benton, Publisher, 1969, Page No.370.
25. Ibid. Page No.370.
26. Ibid. Page No.370.
27. Harikrushna Rawat: Advanced Encyclopaedia of Sociology, Rawat Publication, Delhi, 2006.
28. Charles Horton Cooley, "Social Consciousness", Proceedings of the American Sociological Society, 1 (1907): 97–109. Source: Internet Website.
29. Ibid.
30. Ibid.
31. An Integral Theory of Consciousness, Ken Wilber, Journal of Consciousness Studies, 4 (1), February 1997, pp. 71-92.

# पुलंच्या लोकप्रियतेची मिमांसा

**प्रा. राजेश आर. दिपटे**, मराठी विभाग, एम. बी. पटेल महाविद्यालय साकोली जि. भंडारा.

पुलं महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तीमत्व, एक अष्टपैलू व्यक्तीमत्व. गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांची असलेली लोकप्रियता पाहिल्यास लक्षात येते. त्यांच्या लोकप्रियतेचे वर्णन अफाट या शब्दाने केले जाते. हा शब्दही दुबळा वाटावा असा या लोकप्रियतेचा विस्तार व खोली आहे. एका थोर पुरूषाने म्हटले होते असा माणूस 20 व्या शतकात होवून गेला यावर पुढच्या पिढयांचा विश्वास बसणार नाही. पुलंची लोकप्रियता किती अफाट तर पुढच्या पिढयांचा विश्वास बसणार नाही. म्हणूनच प्रा. ना. सी. फडके यांनी पुलंना'' सर्वात अधिक लोकप्रिय साहित्यिक ''या किताबावर गेली कित्येक वर्षे हक्क गाजवित आला आहात अशासारख्या शब्दात जी स्तुती केली आहे ती खरीच आहे.

आयुष्यभर या माणसाची लोकप्रियतेची श्रेणी उंचावतच गेली. पुलंनी आपल्या अंतर्मनातील रहस्य लेखणीच्याव्दारे जशीजशी प्रकट केली तसतशी लोकमाणसातील प्रतिमा उजाळत गेली. त्याची लोकप्रियता नागर–ग्रामीण, देश–विदेश, सर्ववयोगट, सर्वव्यावसायिक अशी या लोकप्रियतेची व्याप्ती आहे. वेगवेगळे मान सन्मान, पुरस्कार महत्वाची अध्यक्षपदे, स्मृतीचिन्हे, मानचिन्हे, पदकं, प्रतिकृति, प्रमाणपत्र, उद्घाटक, वक्ता, अतिथी अशा वेगवेगळया सन्मानांनी ज्याचं आदरतिथ्य केलं गेलं असेल त्यापैकी पुलं हे एकमेव व्दितीय असतील.

1965 साली नांदेड येथे पुलंची नाटयाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली तेव्हा विलेपार्ले सर्कलतर्फे (जानेवारी 1965 रोजी) त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचे वर्णन करतांना म.वि. राजाध्यक्ष म्हणतात '' ती सभाच विलक्षण होती विले–पारले या उपनगराने तसली सभा कधी पाहिली नव्हती. पुलंची ती सत्कारसभा घडली ती अघटितच चहूबाजूंनी माणसे असे लोटले होते की, सराईत आणि प्रामाणिक बातमीदारालाही मन मानेल त्या आकडयाची थाप मारण्याची पाळी आली. सभास्थान म्हणजे टिळक मंदिराबाहेरचे पटांगण. बेसुमार गर्दीच्या रेटारेटीने त्याला रणमैदानाची कळा आली होती. माणसांवर माणसांच्या थापी लावल्यांचा त्रास होत होता. पुढचे–मागचे रस्ते सभेत सामील झाले होते. ते रस्ते

राहिलचे नव्हते. मुळी नजरेच्या टप्प्यातील प्रत्येक घर गॅलरीमय झाले होते. टेस्ट मॅचच्या वेळी बेब्रॉर्न स्टेडियमजवळच्या अटी नशीबवान इमारतीचे होते तसे. झाडावर माणसे लटकली होती. ही सगळी अतिउत्साही जनता पार्ल्याचीच आणि ती स्थानिक अभिमानाने फुगून तेथे दाटली होती, असेही नव्हे. नवीजुनी उपनगरे पचवून आडमाप वाढलेल्या मुंबईच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे, तर विरार–कल्याणपर्यंतच्या भोवतालच्या गावांतून ही जत्रा लोटली होती. ती रात्रीची अवेळ आणि वाहनांची अडचण यांची तमा न बाळगता सभा सुरू व्हायला उशीर झाला तरी निषेधाचा आवाज नाही की ओहोटी नाही. असा तो वेडा सोहळा ''[1]

पुलंवरच्या लोकांच्या प्रेमात एक बोलकं जे निदर्शक त्यांना येणारी पत्र होतं सुनीताताई म्हणतात, ''भाईला येणारी पत्रे, फोन यांतले बहुसंख्य म्हणजे कृतज्ञतेच्या पावत्या असतात. तुमचा हा लेख किंवा हे पुस्तक फार आवडलं, तुम्ही आम्हाला सुखी केलंत, तुम्ही आमच्या जगण्याला प्रयोजन दिलं' वैगेरे कलावंताची हीच तर खरी गंमत असते. त्यांना एखादी जन्मजात देणगी लाभलेली असते. कुणाला शब्दांची, कुणाला रंग रेषाची, कुणाला सुरांची मग स्वतःच्या आनंदासाठी क्वचित ऐहिक लाभासाठीही ते कलानिर्मिती करतात. लोक मात्र त्या कलावंताने आपल्यावर केवढे उपकार केले असे वाटून कृतज्ञता व्यक्त करीत असतात. हा एकूण व्यवहार मोठा सुंदर असतो. त्यातून आपली संस्कृती समृध्द होते. पण हे सगळे छान असले, जरूर असले तरी कलावंताचे जरा जास्त लाड होतात, असे माझ्यासारख्याला वाटल्याशिवाय राहत नाही. पण ते आवश्यक मात्र नक्कीच आहे त्यातून माणूस उमलत जातो. सुदैवाने त्याला साहित्य,संगीत अभिनय वक्तृत्व बरेच काही मिळाले''[2]

पुलंना आजवर दोन लाखाच्या वर अभिनंदनपर पत्र आली. हे येणारे पत्र लहान मुलांपासून तर रस्त्यावर कपडे विकण्यापर्यंतची शेतकऱ्यांपासून तर साहित्याअंतापर्यंतचे असतात. ही खेडयावरून तसेच परदेशातूनही आलेली पत्रे असतात. पूर लोटावा तशी स्नेहाची अभिनंदनाची पत्रे पुलंना येत होती. ठवळे ग्रंथजत्रेच्या वेळी वाचकांची पाहणी करून त्यांचा सर्वात आवडता लेखक कोण हे त्यांना विचारण्यात आलं '' पुलंना अव्वल दर्जाचं स्थान मिळालं.''[3]

पुलंच्या लोकप्रियतेची सीमा कुठेही संपणारी नाही. एक प्रसंग ''मुलीला स्थळ पाहतांना पुलंच लिखाण आवडत असलं तर मुलगा पसंत करायला हरकत नाही. ही सीमा त्यांच्या लोकप्रियतेची होती. पुलं एका मुलाखतीत सांगतात'' मास्ती व्यंकटेश अयंगार यांच्याकडून मला फार मोठा प्राईझ मिळालेलं आहे. ........ ' तुझे आहे.......' चा कन्नड प्रयोग बंगलोरला होता. अध्यक्ष मास्ती नाटक पाहतांना सारखे हसत होते. नाटकाच्या मध्यंतरात सत्कार करतांना मला मिठी मारून त्यांनी माझा मुका घेतला सर्वांच्या समोर ! आजोबा नातवाचा घेतात तसा. मला एवढं मोठं अवार्ड दुसरं कुठलच मिळालं नाही. असे शाब्दीक व आशीर्वादपर अवार्ड पुलंना त्यच्या आयुष्यांत कितीतरी मिळाले असतील. पुलचा एखादा स्पर्श एखादा शब्दही, विसटतं दर्शनही यामुळेदेखील माणसं भारावून जात होती. पुलंनी आपलं कौतुक केल यातही माणसं स्वतःला धन्य समजत होती. कोणी पुलना आपल्याला केवढया एका घराची चौकशी केली यातच धन्यता मानत होती तर कोणी ट्रेनमध्ये पुलं आपल्या बाकावर बसले यात आनंद मानीत होती. पुलंच्या 70 व्या वाढदिवशीच्या दै. सकाळमध्ये ' जियो हजारो साल ' अश्या शिर्षकाखाली ''पुलं आपण आमच्या या भागात राहता याचा आम्हाला अभिमान वाटतो''[4] अश्या भावना व्यक्त केल्या गेल्या होत्या.

एखादी राष्ट्रीय बॅक तिथे लोकांचे तासनं तास रांगेत लागणे तिथल्या कर्मचाऱ्यांचे ग्राहकांशी चिडण्याचे व्यवहार, पण पुलं मात्र इथेही अपवाद आहेत. बॅकेतून पुलंना पत्र आले ''आम्ही आपलं आमच्या शाखेतलं खातं आम्ही पैशाचं मानतच नाही. ते आमच्या आनंदाचं खातं आहे. आपण बॅकेत भेट देवून सातत्यानं भरच टाकीत असता '' पुलं आता स्वतःचे राहिलेच नव्हते. ते जनमानसातले पुलं झाले होते. साधना आमटे त्यांना दिलेल्या दानाबदद्ल पुलंचे आभार मानले होते. पुलं विश्वासाचे, श्रध्देचे सगळे ओतून टाकण्याचे स्थान झाले होते. कुणी त्यांना सांभाळून असा, विश्रांती घ्या, आरोग्याची काळजी घ्या, कुणी मीठ मोवऱ्या आणीत तर गुडघेदुखीच्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी महिमस्तोत्र म्हणायचे कबुल करीत.

जून 1999 मध्ये जयवंत दळवी याच्या 'पुलं – एक साठवण ' या पुस्तकाची पाचवी आवृत्ती निघाली. प्रकाशक कोठावळे यांना हे पुस्तक खपेल की नाही अशी शंका होती. म्हणून जास्तीत जास्त हजार प्रती काढण्याची त्यांची तयारी होती पण जयवंत दळवींनी पाच हजार प्रती काढायला लावल्या'' पण जाहीरात आल्याबरोबर चार दिवसांच्या आत पाच हजार प्रतींची नोंदणी झाली होती. ''

पुलं हे नुसते लेखकच नव्हते तर ते एक विचारवंत व लोकांच्या हृदयात स्थान मिळविलेले एक असामान्य जादूगर होते. त्यांच्या नावाचे वलय असं काही होतं की 1977 मध्ये लोकसभेच्या ऐतिहासिक निवडणूक आल्या

इंदिरा गांधीना शह देण्यासाठी पुलंनी जनता पक्षाच्या बाजूंने प्रचारात उडी घेतली. विनोदाची धारधार शस्त्र पुलंकडे असल्यामुळे पुलची भाषणे ऐकण्यासाठी लाखो लोक जमा झालेले असत. लोक जनता पक्षाच्या लाटेवर स्वार होण्यासाठी जमा झालेले नव्हते तर पुलंच्या व्यक्तीमत्वाची ती जादू होती म्हणून तासन्तास तिथे जमा राहत असत.


**संदर्भः–**

1. मं.वि. राजाध्यक्ष, पु.ल.देशपांडे : ''व्याप्ती आणि थोडिशी वल्ली '', विलेपार्ले म्युझिक सर्कल प्रकाशन 1965
2. सुनीता देशपांडे – ''आहे मनोहर तरी '' मौज प्रकाशन खरावदाडी गिरगांव मुंबई तिसरी आ. 1991 पृ. 107
3. शुभदा चंद्रचूड ' वाचकांच ज्ञानपीठ ' लोकसत्ता 16–05–1992
4. अनंत तोरो– पुलंची मुलाखत महाराष्ट्र टाईम्स 9–04–1989
5. सकाळ पूणे 10 नोव्हेंबर 1989.


# 'महिला विकास आणि भारतीय सामाजिक व्यवस्था'

**प्रा. संतोष मेंढेकर**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, रेणुका महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना** :– संयुक्त राष्ट्रांनी (युनोने) 1974 हे वर्ष 'जागतिक लोकसंख्या वर्ष' म्हणून साजरे करण्याचे घोषित केले. या निमित्ताने संकलित झालेल्या माहितीवरुन 'जागतिक समाजाचा अर्धा भाग अनेक बाबतीत अंधारात आहे. हे अधिक स्पष्ट झाले. जागतिक शांततेबरोबरच स्त्री–पुरुष समानता आणि स्त्रियांचा विकास घडवून आणण्यासाठी काही कृती योजना तयार करण्याची गरज भासू लागली. 1975 हे 'राष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले. मेक्सिको शहरात भरलेल्या जागतिक परीषदेत स्त्रियांच्या विकासासाठीची जागतिक कृती योजना मान्य करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्षाच्या निमित्ताने देशोदेशी स्त्री जीवनाबद्दल भरपूर बोलले गेले व लिहले गेले. स्त्री समस्यांवर आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंतची चर्चासत्रे व कार्यशाळा झाल्या. स्त्रीवादाच्या विचारांची व भावनांची शक्तिशाली लाट संपूर्ण जगभर पसरत गेली.

1975 ते 1985 या स्त्री दशकाच्या काळात विभिन्न देशामध्ये स्त्री अध्ययन केंद्राची (वुईमेन्स स्टडी सेंटर) स्थापना झाली. आंतरविद्याशास्त्रीय दृष्टीकोनातून स्त्रीविषयक प्रश्नांचा अध्ययन व संशोधन कार्याला विभिन्न देशांमध्ये चालना मिळाली. 1975 नंतरच्या विभिन्न देशांमध्ये स्त्रीमुक्ती चळवळीने जोर धरला. स्त्रीवादी भूमिकेचे कडवे समर्थक निर्माण झाले. तसेच काही विरोधकही समोर आले. 15–26 जुलै 1985 मध्ये नैरोबी (केनिया) येथे स्त्री दशकाच्या निमित्ताने 150 देशांच्या प्रतिनिधींची जागतिक परिषद झाली. त्यात "For-ward Looking Strategies (FLSAW) from 1986 to the year 2000'' नामक दस्ताऐवजास एकमताने मान्यता देण्यात आली. थोडक्यात गत 25–30 वर्षाच्या कालखंडात स्त्रीसमस्यांच्या अनुषंगाने विभिन्न देशांमध्ये वैचारीक मंथन झाले आहे. स्त्रियांच्या समस्या सोडविण्याचे वैयक्तिक व संस्थात्मक पातळयांवर प्रयत्न झाले आहेत व होत आहेत. त्याचाच परिणाम म्हणजे महिला विकासाचे नविन दालन निर्माण होत आहे.

संस्कृतिच्या उच्च नीतीचा मापदंड म्हणजे स्त्री, 'स्त्री ही संस्कृती रक्षक आणि संस्कृती वर्धक आहे'. म्हणून देशाच्या विकासात स्त्री वर्ग पिडीत, मागासलेला आणि परावलंबी असणे योग्य नाही. त्या दृष्टीने विकासाची नितांत गरज आहे. शासनाच्या विविध विकासात्मक योजनांमुळे महिलांच्या जीवणात गतिशीलता निर्माण होत असून त्या जिवणाच्या प्रत्येक क्षेत्रात समोर येत आहे.

आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्षाचा प्रभाव प्रत्येक देशाच्या समाजव्यवस्थेवर, पर्यायाने महिला विकासावर पडला. भारतीय समाजव्यवस्थेत सुध्दा बदलत्या परिस्थितीत उत्पन्न झालेल्या अनेक सामाजिक, आर्थिक व राजकिय प्रभावाने स्त्री जीवनात महत्वपूर्ण बदल घडून आलेत. केंद्रशासन संचालीत, महिला व बाल विकास मंत्रालयाच्या अनेक विकासात्मक योजना व श्रम मुल्याच्या बदलत्या संकल्पनेमुळे महिलांसाठी अनेक विकासाच्या संधी उपलब्ध झाली. परिणामतः महिलांच्या भुमिकेत व दर्जात आमुलाग्र बदल होण्यास सुरुवात झाली.

**भोध निबंधाचे उद्देश** :– 1. महिला विकासाची संकल्पना समजून घेणे. 2. विषेशतः भारातील महिलांचे जिवनातील गंभीरता समजून घेणे. 3. महिलांचे समस्यावर शासनाने केलेल्या योजनांची चर्चा करणे. 4. महिला विकास योजना मुळे त्यांच्या जिवनातील झालेला प्रभाव तपासणे. 5. महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची माहिती व स्वरुप जानूण घेणे.

**अध्ययन पद्धती** :– प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने वर्णनात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब करून दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्राप्त महितीच्या आधारे आशय विश्लेशण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पद्धती** :– संशोधन पद्धती हे संशोधन समस्येकडे जाणारा एक पदधतशिर व वस्तुनिष्ठ असा मार्ग आहे. यामुळे संशोधनाचे कार्य सत्यता पडताळुन प्रामाणिपणे पार पाडले जाते. प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न केला आहे. यामध्ये दुय्यम व तृतीय साधनांचा अवलंब करण्यात आला. केंद्राची महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची महत्वाच्या संदर्भ साधनांचा संदर्भ म्हणुन उपयोग केला गेला आहे. या वरुन ब–याच गोष्टी निरीक्षणाद्वारे व सामाजीक जाणिवेच्या मानसिकतेतून निवडल्या गेल्या आहेत. म्हणुनच हे संशोधन निबंध ख–या अर्थाने परीक्षणाच्या, निष्कर्षाच्या दृष्टीने अधिकच सार्थ ठरते. असे संशोधकाला वाटते.

**विषय निवडीचे उद्दिष्टे** :– महिला व बाल विकास विभागाच्या महिला विकास करीता असणा–या योजनांची आणि भारतीय सामाजिक व्यवस्था समाजातील महिलांचा जीवनातील अत्यंत महत्वाची योजना आहे. भारतातील महिला वर्ग अनेक वर्षापासून पीढीत आहे. परंतु शासनाने घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे महिलाचे अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. आणि म्हणूनच संशोधकाने हा विषयावर शोध निबंध तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला विकासाचा प्रश्न आणि भारतीय समाजव्यवस्था** :– महिला विकास या समस्येचा अध्ययन करण्याच्या दृष्टीने 'महिला विकास' या शब्दाला व्यापक स्वरुपाचा अर्थ प्राप्त होतो.

आर्थिक विकासासह विभिन्न समाजव्यवस्थेत बदल होत असतात. या बदलाची गती समाजाच्या सर्वच स्तरात सारखी नसते. उदा. समाजाच्या वरच्या स्तरामधील महिलांच्या जीवनात काही बदल होतात. तरी तसेच बदल समाजाच्या एक भाग असणा–या तळागळाच्या महिलांच्या जीवनात घडून येतीलच याची खात्री नसते. म्हणून कोणत्याही समाजात काही महिला डॉक्टर, वकील, प्राध्यापिका, शिक्षिका आदी. व्यवसायामध्ये. दिसत असल्या तरी त्यावरुन त्या संपूर्ण समाजातील स्त्रियांच्या दर्जाबाबत किंवा त्यांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी मिळण्याबाबत किंवा काही निश्चित स्वरुपाचे अनुमान काढणे पूर्णतः चुकीचे ठरते.

स्त्री व पुरुष हे दोघेही समाजाचे एकसारखे घटक आहेत. या दृष्टीने स्त्री व पुरुष या दोघांना समाजात सारख्याच सहजतेने विकासाच्या संधी व सोयी मिळायला पाहीजे. दुस–या शब्दात समाजात विकासाच्या प्रक्रियेत स्त्रियांना त्यांचे 'स्त्री पण' आड येऊ नये. स्त्रीपण म्हणजे 'मी स्त्री आहे' ही मनोवृत्ती होय.

शिक्षण, आर्थिक व्यवसाय, राजकारण, निर्णय प्रक्रिया अशा सार्वजनिक जीवनातील कोणत्याही स्तरावर एखाद्या पुरुषाजवळ जेवढी गुणवत्ता आणि पात्रता आहे तेवढीच गुणवत्ता व पात्रता एखाद्या स्त्री जवळ देखील आहे. असे असूनही केवळ ती स्त्री आहे म्हणून तिला संधी देण्यापासून वंचित केले जात असेल तर हा दोष कोणाचा? असा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी स्त्रियांना मिळण्यामध्ये 'पुरुषपण' आडवे येऊ शकते. पुरुषपण म्हणजे 'मी पुरुष आहे' ही मनोवृत्ती होय.

याच दृष्टीने संशोधकाला महिला विकासाचा विचार करावयाचा आहे. कारण स्त्रीवादी विचार, स्त्रीमुक्तीची चळवळ, या चळवळीच्या मागण्या या सर्वांच्या पाठीमागे हाच विचार आहे. म्हणून महिला विकास या महिला समस्येचे अध्ययन करतांना 'महिला विकास' या संज्ञेला 'महिलांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग' असा व्यापक अर्थ प्राप्त होतो. असे संशोधकाला वाटते.

**महिला विकासाचा प्रश्न आणि भारतीय कुटुंबव्यवस्था** :– महिला केवळ कुटुंबातीलच नव्हे तर कुटुंबाहेरची देखील कामे कोणती? पुरुषांची कामे कोणती? हे बालवयापासून मिळणा–या शिक्षणातून निश्चित होत असते. (सामाजिकरणाची प्रक्रिया) स्त्री व पुरुष यांच्या वर्तनकृतींच्या चौकट (भूमिका) याच पध्दतीने हजारो वर्षापासून जगात सर्वत्र निश्चित होत आहे. यामुळे स्त्रियांच्या सहभाग या प्रश्नांच्या संदर्भात काही गोष्टींचा सत्य म्हणून स्वीकारणे सर्वांना भाग पडते.

1) कुटुंबातील दैनंदिन कामे आणि घरगुती जबाबदा–या प्रामुख्याने फक्त स्त्रियांच्याच हा समज किंवा अशी शिकवण चुकीची आहे.

2) स्त्री–पुरुष यांच्यामधील अधिकारांचे वाटप हे कुटुंबाच्या स्तरापासून समाजाच्या स्तरापर्यंत सर्वत्र चुकीचे म्हणजे विषम स्वरुपाचे झाले आहे.

**कारणमीमांसा** : स्त्री–पुरुष यांच्या भूमिकांचे निर्धारण आणि त्यांच्यामधील अधिकारांचे विषम वाटप या दोन सत्यांचा स्वीकार केल्यानंतर ही स्थिती का निर्माण झाली? असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचे निश्चित असे उत्तर देण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासकांनी आपआपल्या परीने केला आहे. (यात कार्ल मार्क्सचा देखील समावेश होतो.)

या संदर्भात प्रमुख विचार प्रवाहांची नोंद पुढील प्रमाणे करता येईल.

अ) लिंगाधिष्ठित सामाजिक भूमिकांची निर्मिती हेच स्त्रीविषयक समस्यांचे मूळ कारण आहे. प्रत्येक समाजात लिंगाधिष्ठित भूमिका निश्चित केल्या जातात. लिंगाधिष्ठित संकल्पना या समाजनिर्मित आहेत. निसर्गनिर्मित नाहीत. शिकारी अवस्थेत लिंगाधिष्ठित भूमिका निर्धारणाचा प्रारंभ झाला, असे काही अभ्यासकाचे म्हणणे आहे.

ब)समाजविकासाच्या प्रारंभिक अवस्थेत मातृसत्ताक आणि पितृसत्ताक अशा दोन्ही कुटुंबपध्दत्ती होत्या या नंतर मातृसत्ताक कुटुंबपध्दतीचे प्राबल्य कमी झाले. व पितृसत्ताक कुटुंबपध्दती अधिक प्रमाणात सर्वत्र प्रचलित झाली. या ऐतिहासीक तथ्यांच्या आधार घेऊन एंगल्स् म्हणतात. ''मातृहक्काची उचलबांगडी हा स्त्रीजातीचा ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचा असा पराभव आहे. यानंतर पुरुषाने घरावर स्वतःचे अधिपत्य स्थापन केले. स्त्रीचे स्थान एवढया अधोगतीला गेले की ती कामवासना भागवणारी व प्रजोत्पादन करणारी एक बटीक बनली.'' कार्ल मार्क्स आणि एंगल्स् यांनी स्त्रियांच्या अमानुष पिळवणूकीसंबंधी बरेच लिहिले आहे. त्यांचाच आधार घेऊन लेनिन म्हणतात, '' भांडवलदारी समाज म्हणजेच जमीन व कारखाने ह्यांची खाजगी मालकी आहे व भांडवलाची सत्ता आहे, तेथे पुरुष आपले जादा हक्क सोडणार नाहीत.

3) आजची पुरुषप्रधान संस्कृती हीच स्त्रियांचे समाजातील दुर्बल घटक असे स्थान निर्माण करण्यास कारणीभूत आहे. असे स्त्रिवादी अभ्यासकांचे मत आहे.

कुटुंब आणि घर यांच्या बाहेर असणा–या सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी स्त्रियांना द्यावी की देण्यात येऊ नये? या प्रश्नासंबंधीचे विचारमंथन अतिप्राचीन काळापासून सुरु असल्याचे पुरावे विभिन्न राष्ट्रांमध्ये आढळून येतात. उदा. इसवी सनपूर्व काळात ॲरिसस्टॉटलसारखा पुरोगामी वा प्रगतीशील विचार मांडणारा विचारवंत स्त्रियांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी नाकारतो. आपल्या प्रतिगामी विचारांचे तात्विक समर्थन देखील करतो. या प्रश्नाबाबत ॲरिसस्टॉटलकालीन व त्यानंतरच्या काळातील लिखाणावरुन पुढील दोन गोष्टी स्पष्ट होतात.

अ) स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी करुन घेण्याची संधी देण्याचा प्रश्न कुटुंबाशी प्रामुख्याने कुटुंबप्रमुख या नात्याने पुरुषाशी संधंधित आहे.

ब) हा प्रश्न एखाद्या–दुस–या कुटुंबापूरता मर्यादित नसून संपूर्ण समाजव्यवस्थेशी निगडीत आहे.

कारण (1) स्त्री–पुरुष यांच्या वर्तनकृतींची चौकट (आकृतीबंध) (2) त्यांच्यामधील कामाची विभागणी आणि (3) त्यांच्यामधील परस्परसंबंधाचे स्वरुप या तीनही बाबी समाजाच्या संस्कृतीव्दारे निर्धारीत व निश्चित होत असतात. रितीरिवाज, प्रथा, परंपरा, नियम व कायदे. यांच्याव्दारे वर उल्लेखित तीनही बाबी निश्चित होत असतात. या बाबती समाजपरत्वे भिन्नता असते. म्हणून स्त्रीजीवन आणि स्त्री समस्यांचे स्वरुप सर्वत्र एकसारखे नसल्याचे दिसून येते.

21 व्या शतकातील समाजव्यवस्थेत 'सक्षम स्त्रीला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. परंपरागत चाली, रीती आणि रुढी नुसार तिची भुमिका व कार्यक्षेत्र फक्त गृहकार्याशी संबंधीत नाही. पुरुषप्रधान पगडा असलेल्या प्राचीन समाजात स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले होते. वैदिक काळातील अपवाद वगळता मध्ययुगीन कालखंड स्त्री वर्गाच्या दृष्टीने अतिशय भयानक होता. कुटुंबात स्त्रियांना कोणत्याही कामात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. 'चूल आणि मूल' पर्यंतच त्यांची भुमिका मर्यादीत समजली जात होती. पुरुष वर्ग स्त्रीला दुय्यम स्थान देतात यात वाद नाही परंतु स्त्रीने स्वतःलाच दुय्यम समजावे काय? ही गुलामगीरी तोडण्यासाठी शिक्षणाची द्वार उघडे करणे आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबन निर्णय प्रक्रीयेतील सहभाग आणि राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी स्त्री विकासाची आवश्यकता आहे.

भारतीय महिलांच्या विकासाच्या दृष्टीने शासनाच्या केंद्र, राज्य व जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना. शासनाव्दारे महिला जिल्हा ग्रामीण विकास मंडळ, ग्रामपंचायत वा पंचायत राज, शिक्षण विभाग, स्वंयसेवी संघटना इत्यादी विभागाअंतर्गत अनेक योजना कार्यान्वयीत आहेत. उदा. बहुद्देशिय महिला केंद्राची स्थापना, कामधेनू योजना, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, मोफत प्रवास योजना, व्यावसायीक शिक्षणासाठी विद्या वेतन, बालिका समृध्दी योजना, निराधार योजना इत्यादी. ज्यांच्या प्रभावाने महिलांच्या सामाजिक दर्जाची दशा आणि दिशा यात निश्चितच बदल होत आहे. आणि आर्थिक स्वावलंबनासोबत कौटुंबीक, राजकीय, आणि सामाजिक निर्णय प्रक्रीयेत भाग घेण्याची पात्रता निर्माण होत आहे.

भारतीय राज्यघटनेने स्त्री–पुरुष या दोघांना समान अधिकार दिले आहेत. दोघांच्याही भूमिका आणि दर्जा सारखा आहे. स्त्री–पुरुष या दोघांना समान दर्जा देण्यात आला असला तरी आजही भारतात स्त्रियांची भूमिका आणि

दर्जा सन्मान दर्शक नाही.भारतातील स्त्रियांच्या भूमिका आणि दर्जाचा अभ्यास करीत असतांना प्राचीन काळात स्त्रियांची भूमिका व दर्जा कशा प्रकारचा होता. याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण आजच्या अनेक समस्यांचे संदर्भ हे ऐतिहासीक काळात सापडतात. भारतातील स्त्रियांचा ऐतिहासीक दृष्टीकोणातून अभ्यास करण्यासाठी ऐतिहासीक आधारावरुन वेगवेगळे काळ पाडण्यात आले आहेत. त्या विशिष्ट काळानुसार स्त्रियांची भूमीका आणि दर्जाचा अभ्यास करणे सुलभ होते.

संदर्भ सूची :–

1. लोटे रा. ज., 'शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर
2. साळुंखे आ. ह., 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी मुंबई
3. भागवत विद्युत, 'भारतातील समकालीन कळीचे प्रश्न–स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा', परदेशी प्रतिमा 2000
4. देवगावकर एम. जी., 'सामाजिक चळवळी–परंपरागत आणि नवीन', साईनाथ प्रकाशन,
5. कवी माधवी, 'महिला कल्याण आणि विकास', विद्या प्रकाशन, नागपूर 2009,
6. कवी प्रा. सौ. माधवी, 'महिला कल्याण आणि विकास', विद्या प्रकाशन, नागपूर 2009,
7. सामंत मंगला, 'स्त्री पर्व', सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
8. गोहे शुभांगी, 'महिला सक्षमिकरण स्वरुप व समस्या ' वरद प्रकाशन –2004, पुणे
9. लवानिया डॉ. एम. एम.,शशी के. जैन, 'भारतीय सामाजिक व्यवस्था ' रिसर्च पब्लीकेशन, जयपूर, न्यू दिल्ली,
10. अग्रवाल डॉ. मधू, 'स्त्री आंदोलन : संर्घर्ष का पर्याय– समाजकल्याण केंद्रिय समाजकल्याण मंडळ, दिल्ली, मार्च 2003,

# आदिवासी हलबा जमात समस्या व उपाय

**प्रा. साधना मौंदेकर**, श्री. निकेतन कला वाणिज्य महाविद्यालय, नागपूर. Email : sadhanamoundekar@gmail.com

**प्रस्तावना** : भारतीय संविधान 1950 च्या अनुसूचित जमातीच्या मध्यप्रदेशच्या यादीमध्ये हलबा ही जमात अंतर्भूत होती. त्यानंतर 1956 च्या सुधारित आदेशान्वये ही जमात वेगळ्याने अंतर्भूत करण्यात आली. परंतु 1 मे 1960 ला जेव्हा महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्यानंतर 1962 मध्ये ओबीसी ची यादी तयार करण्यात आली, विदर्भाकरीता या यादीत अनुक्रमांक 28 वर भूलिया, अनुक्रमांक 114 वर कोष्टी, कोस्टी व कुष्टा अशाप्रकारे नोंद करण्यात आली. 1967 मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील ओबीसी ची यादी करण्यात आली, त्यात वरील अ.क्र. 28 व 114 ऐवजी अ. क्र. 79 मध्ये कोष्टी ही जात अंतर्भूत करण्यात आली. 1965 मध्ये हजारी नावाच्या सशोधकाकडून विदर्भातील विणकरीचा व्यवसाय करणाऱ्या हलबांसंबधिचा अभ्यास करविण्यात आला. यात हलबा जमातीला हलबा कोष्टी नाव दिले. हलबा जमातीतील सवलती देण्याचा प्रश्न पुढे आला तेव्हा शासनाने 1962 च्या यादीतील अ.क्र. 114 वरील ओबीसी ची सवलत देण्याचे ठरविले. यानंतर 1966 ते 1977 पर्यंत 10 वर्षाच्या काळात अनेकवेळा शासनाच्या ज्या विभागाने ओबीसी ची यादी जाहिर केली त्या विभागाने 'हलबा कोष्टी इज डिफ्रंट फ्राम कोष्टी कम्युनिटी' असे परिपत्रक काढले. याशिवाय 25 ऑक्टोबर 1975 ला राखीव जागाबाबत जी वेगवेगळ्या प्रवर्गाची यादी शासनाने जाहिर केली त्यात ओबीसींच्या यादीमध्ये अ.क्र. 79 वर कोष्टी ही जात तर अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये हलबा कोष्टी ही जमात होती, असे सांगितले.

यावरून हलबा हे कोष्टी नाही हे शासनाला मान्य आहे, हे स्पष्ट होते. तसेच फरेरा कमेटीने कोष्टी, हलबा कोष्टी, हलबा यांचा अभ्यास केलेला आहे. हलबांना कोष्टी म्हटलेले नाही व महाराष्ट्र शासनाने आता असे म्हटले की हलबा कोष्टी नावाची स्वतंत्र जातच अस्तित्वात नाही.

अधिनियम 108/1976 प्रमाणे महाराष्ट्रातील क्षेत्रबंधन रद्द झाले व महाराष्ट्रातील कोणत्याही भागात राहणाऱ्या हलबा, हलबींना अनुसूचित जमातीच्या सवलती देय झाल्या त्याचा फायदा हलबा, हलबी जमातीने घेतला. अनुसूचित जमात म्हणजे हलबा, हलबी हीच धारणा या समाजात रूढ झाली. पण कालांतराने हलबा जमातील सवलत देणे शासनाने बंद केले. हलबा जमातील 'हलबा' असल्याचे जमात प्रमाणपत्राची मागणी सरकारने केली. त्यावेळेस मात्र हलबा जमातीच्या लोकांना आपण हलबा आहोत हे सिद्ध करणे अतिशय कठिण गेले. कारण शासनाने 50 वर्षाच्या पूर्वीचा दाखला मागितला व या दाखल्यात हलबा ऐवजी हलबा कोष्टी असा उल्लेख करण्यात आला होता. याचे

मुख्य कारण म्हणजे हलबा जमातीने कोष्टी जातीचा व्यवसाय स्विकारला व आपली मूळ ओळख बाजूला ठेवून जातीत रूपांतरण करण्यात आले. तसेच संस्कृतीकरणामुळे हलबा संस्कृतीचे लोक कोष्टी जातीचे अनुकरण करू लागले व संस्कृतीकरणामुळेच हलबा जमातीचे कोष्टी जातीच्या लोकांमध्ये मिसळले. उदरनिर्वाहासाठी त्याचा व्यवसाय केला, त्याच्याप्रमाणे पूजा पाठ करू लागले, त्यांच्या परंपरा शिकले व आपली ओळख विसरले. पण आजही हलबी भाषा बोलणारे कुटुंब टिकून आहेत, हीच एकमेव त्यांची ओळख राहिलेली आहे.

**हलबा जमातीवर झालेला परिणाम** : फरेरा कमेटीचा अहवाल, मिलिंद कतवारे प्रकरण, माधुरी पाटील प्रकरण आणि जातीचा कायदा 23/2001 आणि 15 जून 1995 चे सरंक्षण यामुळे समाजापुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. समाजाची घडी पूर्णपणे विस्कळीत झालेली आहे, एकदुसऱ्याविषयी आपुलकी राहीलेली नाही, समाजाला नेतृत्व नाही, एकसंघ राहीलेला नाही. यामुळे समाज दुर्बल करणाऱ्या घटनाही समाजात घडत आहेत. समाजातील शिकलेली मुले व मुली हे आंतरजातीय विवाह करीत आहेत. वय वाढत असलेल्या मुली सुद्धा आंतरजातीय विवाहाकडे वळत चालला आहे. मुलींच्या शिक्षणाबरोबर शिक्षण घेणारा मुलगा तिच्याकरीता शोधून देणे कठिण झाले आहे व आईवडीलांना सुद्धा पर्याय राहत नाही अशाप्रकारे समाजावर परिणाम झालेला दिसून येत आहे.

**समस्या निर्माण होण्याची कारणे** : 1) समाजातील सुशिक्षित लोकांचे समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक बाबींवर पूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे. 2) स्वतःला गुन्हेगार समजून जगण्याची प्रवृत्ती निर्माण झाल्याने. 3) आपण कोण आहोत, याचा बाबीत अभ्यास नसणे (अभाव) 4) असंघटीतपणा 5) राजकीय बळ नसणे (शुन्य असणे)

याच 5 कारणामुळे हलबा जमातील अनुसूचित जमातीच्या मुख्य प्रवाहातून दूर करण्याचे कारस्थान यशस्वी झाले. शासनाने फरेरा कमेटीची नेमणूक करून हा समाज आदिवासी नाही म्हणून शिक्कामोर्तब करण्यात आले. मिलिंद कतवारे प्रकरणात सुडबुद्धीने समाजाला पार्टी करून लटकविण्यात आले व संपूर्ण चळवळ जवळजवळ 14 वर्ष मोडकळीस आणल्या गेली. तसेच 15 जून 1995 च्या नोकरी संरक्षणाचे आदेश काढून कर्मचाऱ्यांच्या चळवळीमध्ये फूट पाडण्यात आली व 23/2001 च्या अधिनियम काढून या समाजाला चारही बाजूने कायद्याच्या चौकटीत अडकविण्यात आले.

**हलबा समाजाची वर्तमान स्थिती** : हलबा समाजाची आजची स्थिती अशी आहे की, जे लोक नोकरीवर आहे, त्यांच्या डोक्यावर कायद्याची टांगती तलवार आहे. असे लोक आपल्या मुलबाळांना अशा परिस्थितीत शिकवू शकत नाही. कारण त्यांच्या पुढेही अनेक प्रश्न आहेत. कर्मचाऱ्यांना स्वतःची नोकरी सांभाळून कुटुंब चालविणे कठिण जात आहे. नोकरी नसणाऱ्यांना दिवसभर मजूरी करावी लागत आहे.

**संदर्भ सूची :**

1. हलबा समाज पारिवारीक मंडळ, स्मरणिका–2010.
2. आदिमपत्रिका.
3. नांदकर, दे.बा., हलबा हलबी Historical Evidences
4. डॉ. आगलावे प्रदीप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर

# 'शेतकरी कुटुंबाच्या संदर्भातील आजचे आणि उद्याचे चित्र'

डॉ. उल्हास रामजी राठोड, मॉडेल आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, कारंजा(घा), जि. वर्धा

'भारत हा कृषिप्रधान देश आहे. इथल्या प्रथा, परंपरा, सण, उत्सव, रितीरिवाज, श्रध्दा अंधश्रध्दा, भाषा, बोलीभाषा भौगोलिक, सामजिक, सांस्कृतिकदृष्टया, कृषिनिष्ठच आहे. भूमीला (धरणी) माता म्हणून गौरवितो. इथला प्रत्येक जण 'भुमीपुत्र' म्हणून स्वतःला धन्य मानतो. धरणी, धरती, जमीन, भूमी ही तर सर्वांच्या जगण्याची अस्मिताच ठरते. यात विदर्भ वेगळा कसा असणार?

विदर्भापुरता विचार करायचा झाल्यास बहुतांश कुटुंबाचे भरणपोषण हे ग्रामीण शेतीवरच निर्भर आहे. 21 व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या बाता आपण कितीही करत असू तरी पोटाची खळगी भरणारे 'अन्न हे पूर्णब्रहम' तर जमीनीतूनच उगवणार! परंतु सद्य परिस्थितीचा विचार करू जाता 'जगाचा पोशिंदा' म्हणून ज्याचा आपण उदोउदो करतो त्या बळीराजाचे काय खस्ताहाल होत आहे हे आपणासारख्या बुध्दिवंताना चांगलेच ठाऊक आहे. अस्मानी –सुलतानी संकटे, शासनाची धोरणे, बाजारातील मागणी–पुरवठा याबाबतचे राजकीय डावपेच, जागतिक मंदी आणि निर्यातीचे अस्पष्ट, उदासीन धोरण या अनेक कारणांमुळे शेती हा व्यवसाय डबघाईस येतो आहे. या सर्व बाबींचा विपरित परिणाम म्हणजे आजचा वैदर्भिय शेतकरी ताण–तणावास जगतो आहे.

शेतीचे, आपल्या बाजारदराचे हाल बघून आजची नवयुवकांची विभक्त कुटुंब पध्दतीमुळे कुटुंबसंस्थेचे काही प्रमाणात विघटन होत असले तरी होवू नये अशी व्यवस्था समाजात निर्माण करणे गरजेचे आहे. या व्यवसायापासून फारकत होत आहे. परिणामतः वारसा हक्काने प्राप्त झालेल्या या अचल संपत्तीचे, कुटुंबव्यवस्थेचे विघटन होऊन अविश्वासावर आधारित नातेसंबंध आणि त्यामुळे होणारे संस्कार यांचे फळ भोगित आहो. (विभक्त कुटुंब झाल्याने काहींचे प्रश्न सुटले तर काहींचे प्रश्न गुंतागुंतीचे झाले (विघटन होण्यात गैर न मानता त्यामुळे छोटया कुटूंबाच्या निवासी आणि मालमत्तेची व्यवस्था करण्याची कल्पकता दाखवून काही किमान मुदयांवर एकत्रितपणाची भावना टिकविण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे).

कुटुंबविघटनामुळे काही नातेवाईकांचे प्रश्न गंभीर झाले. वृध्दांची व्यवस्था, अपंगाची व्यवस्था, विधवा व त्यांची मुले आणि परित्यागता, माहेरवासींनी यांची सोय सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने व उपलब्ध असणाऱ्या योजनांचा फायदा घेऊन करावी लागेल. त्यांचा अडसर वाटणे किंवा न वाटणे हा मुद्दा ऐच्छिक पातळीवरचा आहे. त्यामुळे समाजशास्त्रीय चिंतनात फारसा लक्षणीय नसावा. या समस्या शहरी कुटुंबामध्ये आहेत त्यासाठी स्त्रीने आत्मनिर्भर होणे वृध्दांनीही आपल्या मर्यादा ओळखून व्यवस्थांशी जुळवून घेणे आवश्यक शेतीशिवाय उद्योगधंदा आणि व्यापार, व्यवसाय एकत्रित असल्यामुळे असणारी अनेक कुटुंबे आजही आहेत. त्यांचे कौटुंबिक प्रश्न अधिकतर दैनंदिन कुरबुरी मुलांवर पालकांनी करावयाचे संस्कार यातील तफावत आणि नव्या जुन्या पिढीतील सवयी आवडी निवडी यातील फरक यामुळे निर्माण होत आहेत. श्रीमंत कुटुबातील मुले सुखी जीवन, सुंदर पत्नी, परदेशागमन भरपूर पैशाने मिळणारी चैन असाच ध्यास घेऊन वाढत आहेत. त्यांची स्वप्ने वेगळी आहे. मध्यम व उच्च मध्यम वर्गातील मुले, मुलीही शिक्षणाचा स्पर्श झाल्याने आणि मित्रपरिवाराच्या संस्काराच्या प्रभावामुळे अशीच स्वप्ने पाहत आहेत. आणि पालकांनी खाललेल्या खस्ता, काढलेले निरस आणि साधे सरळ आयुष्य त्यांना नकोसे वाटत असल्याने पालकांबद्दल त्यांच्या मनात आदर, प्रेम, सहवेदना इत्यादी भावनांवर आधारीत वर्तनाचे दर्शन घडत नाही. पालक नीतीपुढे अनेक आव्हाने आहेत. मुलांवर कोणते संस्कार करावेत, कोणते योग्य, अयोग्य या संभ्रमात पालकच असल्यामुळे कुटुंबाबाहेरील करमणूक, झटपट श्रीमंत होण्याचे मार्ग गुन्हेगारी, आतंकवाद इत्यादी घटकांचा प्रभाव वाढत आहे. व प्राथमिक नियंत्रण कमी होत आहे.

एकीकडे कुटुंबावरील अवलंबन कमी होत जाते आणि कुटुंबाबाहेरील व्यवस्थांवर निर्भर राहण्याचे प्रमाण वाढणे व दुसरीकडे विकासाच्या परिवर्तनाच्या बाबतीत केवळ स्वतःच्या लाभाचाच विचार करणे आणि समाजाप्रती देणे लागतो. म्हणून अप्रगत समुहांसाठी काही करावे ही सहभावना निष्ठकृती करण्याची आवड न वाटणे हेही बहुसंख्य तरूणांमध्ये दिसून येत आहे. मानवतावादी, गांधीवादी, साम्यवादी, समाजवादी, भुतदयावादी यांचा पराभव झालेला दिसत आहे. विकासाला पूरक असलेल्या या वादांच्या प्रभावामुळे आजपर्यत अनेक संस्था आणि व्यक्ती निरपेक्ष वृत्तीने काम करीत होत्या त्यांनाही कार्यकर्ते मिळेनासे झाले आहे. गरजांची पूर्तता आणि व्यक्ती विकासाची स्वप्ने पूर्ण होऊनही सामाजिक परिवर्तनाबरोबर शांतता आणि उदारता हवी कां असा प्रश्न युवकांपुढे ठेवला असता ग्रामीण भागातील 40 टक्के आणि शहरी भागातील 41 टक्के युवकांनी पाठिंबा दर्शविला आहे.

गुटखा, तंबाखू सेवन करण्यावर सरकारने बंदी घालावी असे 91टक्के तरूणांनी सांगितले असले तरी कायद्याने बंद होईल तेव्हा पाहू सध्या तर सेवन करू, असे काही सध्या सेवन करणाऱ्याणी सांगितले. ही पाहणी युवा, युवतींची काही सामाजिक प्रश्नांवरची मानसिकता आजमावण्यासाठी केली आहे. या सर्वेक्षणावरून असे दिसते की, आजचे युवक आदर्शकल्पनांचे समर्थन करतात परंतु काही बाबतीत ते चिकित्सक वृत्तीने विचार करून निष्कर्षापर्यंत किंवा त्यानुसार वर्तन करण्यास कमी पडतात. आजची युवक मंडळी स्वतःच्या वैवाहिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या बदलत्या सामाजिक, राजकीय वातावरणात कितपत गंभीर पणे व अभ्यासु वृत्तीने ओळखू शकतील यावर पुढील 15 ते 20 वर्षातील कुटुंबाची वाटचाल अवलंबून आहे. असे माझे मत आहे.


संदर्भग्रथः–

1. विदर्भाची अर्थव्यवस्था, ए. बी. वैद्य (2003)
2. ग्रामीण विकासाच्या समस्या, प्रा. एच. यु. पेटकर.
3. विदर्भ विकास आणि अनुशेष, आ. क्र. उखडळकर.
4. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि इतर समस्या, बोकरे एम. जी.
5. शेतकऱ्यांच्या आत्महत्या – चिंता आणि चिंतन, डॉ. मार्तंड खुपसे.
6. विदर्भाचा ग्रामीण विकास, डॉ. पुष्पा तायडे (2008)
7. विदर्भ राज्य संकल्पना, श्रीनिवास खांदेवाले.
8. सामाजिक संशोधन पध्दती, प्रा. पु. ल. भांडारकर.



Dear Friends / Colleges,

It is Indeed pleasure to inform you that 'SOCIAL ISSUES AND PROBLEMS' (ISSN 2278-3199) National Research Journal of Department of Sociology, S. N. Mor Arts, Commerce & Smt. G. D. Saraf Science College, Tumsar Dist. Bhandara was Launched three issue (Vol. 1, Issues - 1, January-June 2012), (Vol. 1 Issue - 2, July-December 2012), and (Vol. 2, Issue 1, January-June 2013) This is fourth Issue - (Vol. 2, Issue - 2 July-December 2013).

Now we are calling papers for fifth issue Vol. 3, Issue - 1 (January-June 2014). The deadline for sending the manuscripts for fifth issue is 30 May 2014.

**About 'National Research Journal on Social Issues and Problems':-**

**'Social Issues and Problems'** is a Multylanguage peer-reviewed Interdisciplinary journal of the Department of Sociology, S. N. Mor College, Tumsar. It is published twice a year : January-June and July-December, focusing on theories, methods and applications in all social sciences, law, entrepreneurship development, Journalism and mass communication, Cross-Cultural studies, education, management and more in the field of social science etc.

Send your article/paper for the publication. We will be extremely pleased to work with you in such academic process.

With Best Regards

**Chief Editor**:

**Dr. C. B. Masram**

Principal, S. N. Mor Arts, Commerce & Smt. G. D. Saraf Science College, Tumsar

Dist. Bhandara - 441912

**Editor**:

**Dr. Rahul Bhagat**

Associate Professor, Department of Sociology

S. N. Mor Arts, Commerce & Smt. G. D. Saraf Science College, Tumsar

Dist. Bhandara - 441912

htpp//www.snmorcollege.org.in Email: rjbhagat1968@yahoo.co.in

Phone/Mobile: 07183-233300, 9420359657, 9422113067.

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &
SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657